मार्च २०१५ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य



## दुष्काळाकडून समृद्धीकडे ...

# कौतुक



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून महापौर चषक अखिल भारतीय खो-खो स्पर्धेतील विजेत्या संघाचे कौतुक.



शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्याकडून चित्रकला स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक.

वर्ष ६६ वे | अंक ९ | मार्च २०१५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके
- साहाय्य — विद्या कदम, नितीन कुटे

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२६१६९७६
email : lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग

## संकल्प दुष्काळमुक्तीचा



यंदाच्या वर्षात वातावरणातील बदलांचा कानोसा घेत राज्य सरकारने कायमस्वरूपी दुष्काळमुक्तीचा संकल्प सोडला आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून दरवर्षी पाच हजार गावे जलयुक्त होत आहेत. दुष्काळामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आपत्कालीन तात्पुरती मदत देताना दीर्घकालीन नियोजनातून दुष्काळमुक्तीकडील वाटचाल निश्चितपणे या संकटाला कायमस्वरूपी दूर करण्यात उपयोगी ठरणार आहे. **६**

## सार्वजनिक उद्योग घेणार नवी भरारी



अवजड उद्योग मंत्रालयाने देशाच्या औद्योगिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. देशाच्या पायाभूत विकासात या मंत्रालयाचा वाटा वाखाणण्याजोगा आहे. या सर्वांना ऊर्जितावस्था आणण्यासाठी या खात्याचे केंद्रीय मंत्री अनंत गिते यांनी लक्ष केंद्रित केले आहे. **१४**

## स्वयंपूर्ण गावे स्वयंसिद्ध गावे



ग्रामविकास, महिला व बालकल्याण विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवण्याचा संकल्प या खात्याच्या मंत्री पंकजा मुंडे-पालवे यांनी केला आहे. ग्रामस्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देऊन गावांना स्वयंपूर्ण करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. **१६**

## आपुलकी आणि लोकाभिमुखता



एक दिवस मंत्र्यासोबत या सदरासाठी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांच्या अत्यंत व्यस्त तरीही लोकाभिमुख दिनक्रमाचा आलेख **१८**

## गुंतवणुकीत महाराष्ट्रच अग्रेसर



जगाचे उद्योजक आदराने भारताकडे पाहतात. त्यांना महाराष्ट्राबाबत प्रचंड आकर्षण आहे. जगातले नामांकित उद्योग महाराष्ट्रात प्रचंड गुंतवणूक करू शकतात, असा विश्वास राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी व्यक्त केला आहे. **२२**

## आठवणीतले आबा



राज्याचे माजी गृहमंत्री व सर्वसामान्यांचे लाडके नेते आर आर पाटील ऊर्फ आबा यांचे ऐन उमेदीच्या काळात निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. **३६**

## जिद्द आणि परिश्रमाने ध्येय साध्य

नागरी सेवा परीक्षेत यश मिळवण्यासाठी जिद्द आणि परिश्रमाला पर्याय नसल्याचे सांगताहेत - या परीक्षेत यशस्वी ठरलेल्या व सध्या जालना जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी असलेल्या श्रीमती प्रेरणा देशभ्रतार. **४६**

## स्वाइन फ्लू घाबरू नका

निरामय

स्वाइन फ्लू होऊ न देणे, झाला तर वेळीच योग्य उपचार घेणे आणि प्रतिकारशक्ती वाढविणे हेच उपाय आहेत. **४८**

## याशिवाय

- **मुंबई नेक्स्ट :** नवे पर्व गतिमानतेचे
- ओझे नको बालपण जपू या
- सन्मान विकास पत्रकारितेचा
- सिंहस्थाची तयारी
- **भ्रमंती :** घारापुरी लेणी
- दिल्लीतील महाराष्ट्र









**समृद्धीची आशा पल्लवित**

'महाराष्ट्राची ग्लोबल भरारी' यावर आधारित लोकराज्यचा फेब्रुवारी २०१५ चा अंक महाराष्ट्राच्या आशा पल्लवित करणारा आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदीचा निर्णय, जलयुक्त शिवार योजना तसेच इतर महत्त्वपूर्ण निर्णयावरील लेख आवडले. शिवाय पर्यटन व स्पर्धापरीक्षाविषयक प्रेरणादायी मार्गदर्शन मोलाचे आहे. आरोग्यावरील माहितीदेखील उपयुक्त आहे..

– **वंदना पवार,** कल्याण

**ग्लोबल महाराष्ट्र**


लोकराज्यचा फेब्रुवारी २०१५ चा अंक महाराष्ट्राचे ग्लोबल दर्शन घडवणारा आहे. मुख्यमंत्र्यांनी दाव्होस येथील जागतिक आर्थिक परिषदेत केलेले प्रभावी प्रतिनिधित्व भावले. महाराष्ट्राची विकासाच्या दृष्टीने सुरू असलेल्या घोडदौडची ही नांदीच म्हणावी लागेल. लोकराज्य हे मासिक आम्हाला नेहमीच कमी दरात उपयुक्त माहितीचा खजिना पुरवत आले आहे. यात सातत्य राहील असा ठाम विश्वास आहे.

– **शिवनाथ नागवे,** खामखेडा, जालना

**अचूक माहिती**

जानेवारी २०१५ चा अंक आवडला. 'महाराष्ट्र अहेड'बद्दलची माहिती समजली. केळकर समितीचा अहवाल, नवे प्रकल्प, गौरव व्यासंगमूर्तीचा, सांभाळा आपल्या हृदयाला, देशपातळीवर हवे थिंक टँक, सौरऊर्जेची किमया अशी अनेक सदरे/लेख उत्तम व वाचनीय आहेत.

– **अश्विन गंजीवार,** यवतमाळ




**शासनाची ब्ल्यूप्रिंट**

लोकराज्यचा जानेवारीचा अंक म्हणजे महाराष्ट्र शासनाची वर्ष २०१५ ची ब्ल्यूप्रिंट आहे. 'घडत आहे महाराष्ट्र माझा' या समर्पक ओळींमध्ये महाराष्ट्राच्या प्रगतीचे द्योतक आहे. लोकराज्यने सुरू केलेले एक दिवस मंत्रिमहोदयांसोबत हे सदर अत्यंत वाचनीय आहे.

– **अभिषेक कारंजकर,** अकोला.

**उपयुक्त माहिती**

जानेवारी २०१५ लोकराज्यचा अंक आवडला. लोकराज्यचा प्रत्येक अंक संग्रहणीय आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी अधिक उपयुक्त आहे. शासनाच्या विविध योजनांची इत्थंभूत माहिती या मासिकाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहचते. दिवंगत माजी मुख्यमंत्री बॅ. अब्दुल रहेमान अंतुले यांना अंकात वाहण्यात आलेली श्रद्धांजली लक्षवेधी आहे.

– **सय्यद शकील हाश्मी,** बीड

**'भारतरत्नां'वर चांगला लेख**

जानेवारी २०१५ च्या लोकराज्य अंकातून भारतरत्न माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी व पंडित मदनमोहन मालवीय यांच्यावरील लेख चांगला आहे.

– **के. एन. राऊत,** अमरावती




**सर्वसमावेशक मासिक**

लोकराज्यचा डिसेंबर २०१४ चा अंक संग्राह्य आहे. सर्वसमावेशक असलेले हे मासिक अत्यल्प किंमतीत मिळते याचा आनंद आहे. संपादन कौशल्य उत्तम.

– **शिवशंकर स्वामी ईटोलीकर,** परभणी

**प्रतिक्रियांचे स्वागत**

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया अवश्य पाठवा. **पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, पाचवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी**

http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# दुष्काळाकडून समृद्धीकडे

गेल्या काही वर्षात लहरी हवामानाचा फटका महाराष्ट्राला बसत आहे. राज्याच्या काही भागात भरपूर पाऊस तर बऱ्याच मोठ्या भागात पाणीटंचाई व दुष्काळी स्थिती असे चित्र दिसून येते. या परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्याचा निर्धार नव्या सरकारने केला असून त्यासाठी विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत.

महाराष्ट्राला दुष्काळाकडून समृद्धीकडे नेण्यासाठी शाश्वत पाण्याचा साठा निर्माण व्हावा यासाठी **जलयुक्त शिवार** ही महत्त्वाकांक्षी योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत दरवर्षी पाच हजार गावे जलयुक्त केली जाणार आहेत. हे पाणी शेतीला योग्य वेळी नियमितपणे देता यावे म्हणून **सौर कृषिपंपाची योजना** राबवली जाणार आहे. पुढील पाच वर्षात पाच लाख सौर कृषिपंप शेतकऱ्यांना दिले जातील. या उपायांमुळे शेतीचे उत्पादन वाढणार आहे. या उत्पादनास उच्च भाव मिळावे यासाठी **मूल्य साखळी योजना (व्हॅल्यू चेन)** टप्प्याटप्प्याने राबवली जाणार आहे. दुष्काळावर मात करत शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी येण्यासाठी या आणि अशा सारख्या महत्त्वाच्या योजना उपयुक्त ठरणार आहेत.

महाराष्ट्र हे औद्योगिक विकास आणि थेट परकीय गुंतवणुकीत नेहमीच अग्रेसर राहिले आहे. ही बाब दाव्होस येथे नुकत्याच पार पडलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये ठळकपणे दिसून आल्याचे **मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय** यांनी या अंकातील विशेष मुलाखतीत नमूद केली आहे. महाराष्ट्रात आणखी गुंतवणूकदार कसे आकर्षित होतील, यासाठी शासन राबवत असलेल्या नावीन्यपूर्ण योजना व उपक्रमांचा त्यांनी या मुलाखतीत ऊहापोह केला आहे.

**'लोकराज्य'**च्या अंकात आम्ही केंद्र आणि राज्य शासनातील विविध खात्यांच्या मंत्रिमहोदयांच्या मुलाखती देत असतो. यामध्ये आतापर्यंत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सुरेश प्रभू, प्रकाश जावेडकर यांच्या तसेच राज्यातील मंत्री एकनाथ खडसे, सुधीर मुनगंटीवार, विष्णू सवरा यांच्या मुलाखती प्रकाशित झाल्या आहेत. या मुलाखतींमधून संबंधित विभागाला अधिकाधिक विकासाभिमुख करण्यासाठीचे मंत्रिमहोदयांचे व्हिजन वाचकांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली आहे.

महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते आर. आर. पाटील यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. वेगवेगळ्या शासकीय मोहिमा आणि योजनांच्या प्रसिद्धीसाठी त्यांचा आणि महासंचालनालयाचा निकटचा संबंध आला होता. त्या स्मृती कायम स्मरणात राहतील. त्यांना महासंचालनालय आणि लोकराज्य परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

नवीन शासनाला १०० दिवस पूर्ण झाल्याबद्दल **'महान्यूज'** या वेबपोर्टलवर विशेष लेखमालिका सुरू करण्यात आली. **'दिलखुलास'** आणि **'जय महाराष्ट्र'**मध्ये विशेष कार्यक्रम सादर केले गेले. महासंचालनालयाची सर्व माध्यमे दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होत असून त्याद्वारे शासनाच्या विविध उपक्रमांची माहिती प्रभावीपणे व तत्काळ सर्वदूर पोहोचत आहे, ही बाब विशेषत्वाने नमूद करावीशी वाटते.

लोकराज्यमधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

# संकल्प दुष्काळमुक्तीचा

महाराष्ट्राच्या शेतीसमस्यांचे वर्णन करताना शेतीच्या समस्या म्हणजे 'शंभर तोंडी रावण' असे केले जाते. प्रतिकूल अशा भौगोलिक परिस्थितीमुळे महाराष्ट्राला सातत्याने दुष्काळी संकटाला सामोरे जावे लागते. प्रतिकूलतेतून अनुकूलता निर्माण करणे हा या राज्याच्या मातीचा गुणधर्म. त्यातूनच १९७२ च्या दुष्काळाच्या झळा सोसताना याच राज्याने रोजगार हमी योजनेची निर्मिती केली.

कालांतराने हीच योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या रूपाने (मनरेगा) देशभर राबवली गेली. महाराष्ट्राला केवळ दुष्काळानेच नव्हे तर वातावरणातील बदलांमुळे (ग्लोबल वार्मिंग) अनिश्चित अशा कृषीकेंद्रित आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. गतवर्षीच्या अभूतपूर्व दुष्काळी परिस्थितीनंतर यंदाही दुष्काळाने राज्याची पाठ सोडली नाही. दुष्काळात तेरावा महिना या म्हणीप्रमाणे डिसेंबर – २०१४ व फेब्रुवारी २०१५ च्या अखेरीस आलेल्या अवकाळीबरोबरच गारपिटीच्या संकटाने राज्यातील शेतीची अर्थव्यवस्था कोलमडली. परंतु प्रत्येक संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहिले.

### दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनातच राज्यातील दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत देण्यासाठी राज्य सरकारने ७ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. फळबागा आणि शेती पिकांच्या नुकसानभरपाई पोटी ३ हजार ९२५ कोटी रुपयांची घोषणा झाली. त्याशिवाय दीर्घकालीन दुष्काळी उपाययोजनांसाठी पाच वर्षात ३५ हजार ५०० कोटी रुपये खर्च करण्याची अत्यंत महत्त्वपूर्ण घोषणा झाली.

राज्यात प्रथमच खासगी सावकारांकडून पाच लाख शेतकऱ्यांनी घेतलेले कर्जदेखील राज्य सरकारने फेडले. त्याशिवाय शेतीवरील पीक कर्जावरील व्याजाची जबाबदारी सरकारने उचलली. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचे तीन महिन्यांच्या वीजबिल माफीची घोषणा आणि त्यानंतर अंमलबजावणीची कार्यवाही झाली आहे.

> यंदाच्या वर्षात वातावरणातील बदलांचा कानोसा घेत राज्य सरकारने कायमस्वरूपी दुष्काळमुक्तीचा संकल्प सोडला आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून दरवर्षी पाच हजार गावे जलसमृद्ध होत आहेत. दुष्काळामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आपत्कालीन तात्पुरती मदत देताना दीर्घकालीन नियोजन करण्यात आले आहे. त्याचा फायदा कायमस्वरूपी दुष्काळ निवारण्यासाठी होणार आहे.

### आकस्मिक निधीची मर्यादा २१५० कोटी रुपयांवर

राज्यातील दुष्काळी परीस्थितीचा मुकाबला करण्यासाठी राज्याच्या आकस्मिकता निधीची मर्यादा १५० कोटी रुपयांवरून २,१५० कोटी रुपये इतकी वाढविण्यात आली. अपुरा पाऊस पडल्याने अनेक भागांतील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यामुळे मदत व पुनर्वसन विभागासाठी पुरवणी मागण्यांद्वारे २ हजार कोटी रुपयांची तरतूददेखील केली होती. त्याशिवाय तातडीच्या व अनपेक्षित खर्चासाठी अतिरिक्त निधीची गरज होती. आकस्मिकता निधीची मर्यादा केवळ १५० कोटी रुपये असल्याने त्याचप्रमाणे सध्या विधिमंडळाचे अधिवेशन सुरू नसल्याने तातडीची बाब म्हणून हा खर्च करणे आवश्यक आहे आणि



यामुळेच हा अध्यादेश देखील निर्गमित करण्यात आला आहे.

### ५ लाख सोलर पंप

दुष्काळाबरोबरच राज्यातील कृषिपंपाच्या जोडणीचा विषयदेखील

गंभीर आहे. ऊर्जेचा तुटवडा आणि उभारणीतील विलंब टाळण्यासाठी प्रथमच राज्यात अपारंपरिक ऊर्जा स्रोतांकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. धोरणात्मक निर्णयानुसार राज्यात जवळपास ५ लाख सोलर पंप देणार येणार असून त्यात प्रामुख्याने वीज पंपाच्या प्रतीक्षा यादीतील शेतकऱ्यांना सहभागी करून घेतले जात आहे.

### सूक्ष्म सिंचनाला प्राधान्य

कायमस्वरूपी दुष्काळामुक्तीकडे वाटचाल करताना पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी राज्य सरकारने सूक्ष्म सिंचनाला प्राधान्य दिले आहे.

हे अनुदान तीन वर्षे थकीत असल्याने शेतकरी वर्गात नाराजी होती. सूक्ष्म सिंचनासारख्या शेतकरीहिताच्या योजनांना आर्थिक पाठबळ देण्याचे सरकारने निश्चित केले आहे. मुख्यमंत्र्यांनी घोषित केल्याप्रमाणे थकीत ठिबक सिंचनाचे ४५० कोटी रुपये अदा करून यंदाच्या



वर्षात सूक्ष्मसिंचनापोटी ३२५ कोटी रुपये प्रस्तावित आहेत. त्यातून राज्यातील १० लाख हेक्टर क्षेत्र ठिबकाखाली आणले जाणार आहे. जादा पाणी लागणारे ऊस पिकाचे जास्तीत जास्त क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणण्याचे सरकारचे धोरण आहे.

**''प्रत्येक नैसर्गिक संकटात राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. वातावरणातील बदलांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र दुष्काळमुक्त होऊन शेतकऱ्यांना शाश्वत शेती करता आली पाहिजे.''**



**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

### ५० हजार सामूहिक शेततळी

पुढील ५ वर्षात ५० हजार सामूहिक शेततळी उभारण्यात येणार आहेत.

कोरडवाहू शेती अभियानांतर्गत मृदा संवर्धन, जलसंवर्धन आणि पेरणीसाठी उपयुक्त ठरणारी १० हजार बीबीएफ यंत्रे (रुंद वरंबा सरी यंत्र). प्रत्येक गावाला १ बीबीएफ भाड्याने देण्यात येईल. ५ हजार कोटी एकात्मिक जलसंधारणासाठी खर्च, १० लाख हेक्टरवर सूक्ष्म सिंचन, सामूहिक शेततळ्यांसाठी ५०० कोटी, महात्मा फुले जलसंधारण अभियानासाठी २५० कोटी, कोरडवाहू अभियानासाठी २००० कोटी खर्चण्यात येतील. पुढील पाच वर्षात शेतीच्या पायाभूत विकासासाठी ३४ हजार ५०० कोटी रुपये खर्चण्यात येणार आहेत.

खऱ्या अर्थाने ही गुंतवणूक राज्याच्या उभारणीत योगदान देईल अशी अपेक्षा आहे. संकटातील शेतकऱ्याला तात्पुरती मदत देताना दीर्घकालीन उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या ठरत आहेत.

### शेतीच्या पायाभूत सुविधांवरील खर्च वाढविणार

सूक्ष्म सिंचन, सिंचन सुविधांवरील खर्च वाढला पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाने हवामानाचा अंदाज व्यक्त झाला पाहिजे. इस्त्रायलसारखे राज्य ओलाव्याच्या सुरक्षेवर भर देते, ते तंत्र राज्याने आत्मसात करण्याची गरज आहे. गेल्या पाच वर्षात राज्यसरकारने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ८३७७ कोटी दिले. त्याची वार्षिक सरासरी १६०० कोटी रुपये इतकी आहे. याच काळात शेती विकासावर फक्त २६९२ कोटी खर्च झालेत ही गोष्ट चिंतेची आहे. त्यामुळे शेतीसाठीच्या पायाभूत सुविधांवर भविष्यात खर्च वाढला पाहिजे. त्याशिवाय आपत्तीतून शेतकरी बाहेर पडू शकणार नाही ही वस्तुस्थिती राज्याच्या नेतृत्वाने स्वीकारली आहे.

## विजय गायकवाड

### मदतीचे सुधारित धोरण

३ फेब्रुवारी २०१५ रोजी झालेल्या राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळी आणि अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी द्यावयाची मदत निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मृत्युमुखी पडलेल्या कर्त्या व्यक्तीस अडीच लाखांची मदत दिली जाणार असून कोरडवाहू शेतीसाठी दोन हेक्टर मर्यादेत प्रतिहेक्टरी १० हजार, बागायतीसाठी १५ हजार तर फळपिकांसाठी प्रतिहेक्टरी २५ हजार रुपये दिले जातील असे राज्य सरकारने जाहीर केले आहे. मृतांसाठीचे दीड लाख रुपये शासन तर एक लाख रुपये मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून दिले जातील. इतर मृत्यू झालेल्या व्यक्तींना दीड लाख रुपये दिले जाणार आहेत.

मृत जनावरांच्या मालकांच्या मोठ्या जनावरांना एका जनावरासाठी २५ हजार, दोन मध्यम जनावरांसाठी प्रत्येकी १० हजार, दोन लहान जनावरांसाठी प्रत्येकी ५ हजार रुपये तर चार लहान जनावरांसाठी प्रत्येकी साडेतीन हजार रुपये इतकी मदत मिळणार आहे. पिकांच्या नुकसान भरपाईपोटी कोरडवाहू पिकांसाठी प्रतिहेक्टरी १० हजार रुपये, बागायती

शेतीसाठी प्रतिहेक्टरी १५ हजार तर फळपिकांसाठी प्रतिहेक्टरी २५ हजार (दोन हेक्टरच्या मर्यादेत) मदत दिली जाईल. खरडून गेलेल्या जमिनीसाठी प्रतिहेक्टरी २० हजार रुपयांचा आणि वाहून गेलेल्या जमिनीसाठी प्रतिहेक्टरी २५ हजार रुपये इतकी मदत सरकार देणार आहे. त्याशिवाय स्थायी मदतीचे आदेश कायम ठेवण्यात आले असून जमीन महसुलात सवलत, सहकारी कर्जांचे पुनर्गठन, शेतीकर्जवसुलीस १ वर्षाची स्थगिती, कर्जावरील व्याज तीन महिन्यांसाठी माफ, तिमाही वीजबिलात माफी, १०वी व १२वीच्या परीक्षा शुल्काची आणि फी माफीची अंमलबजावणी करण्यात आली आहे.



### २०१९ पर्यंत दुष्काळमुक्ती

२०१९ पर्यंत महाराष्ट्राला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याची योजना राबवली जात आहे. यामध्ये तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश आहे. दुष्काळमुक्तीसाठी जलयुक्त शिवार योजनेतून विविध योजनांचे सुसूत्रीकरण केले गेले आहे. विशेष म्हणजे उपलब्ध पाण्याचे ऑडिट करून सिंचन आणि बिगर सिंचन पाण्याचा समावेश करण्यात आला आहे.

एकात्मिक जलसंधारणासह, सीएसआर निधीचा समावेश त्याचबरोबर लोकसहभाग आणि लोकप्रतिनिधींचा समावेश आहे.



### दुष्काळी उपाययोजनांतील ठळक बाबी

- दुष्काळग्रस्तांना ३९२५ कोटी रुपयांची थेट शेतकरी मदत, एकूण दुष्काळी मदत ७ हजार कोटी रुपयांची
- अडीच लाख हेक्टर फळबागांसाठी ८८४ कोटी रुपयांचा प्रस्ताव, प्रतीहेक्टर ३५ हजार रुपये मदत देणार
- फळबागा पुनरुज्जीवनासाठी प्रतिहेक्टर २० हजार रुपये देणार
- शेततळ्यांच्या प्लॅस्टिक मल्चींगसाठी १६ हजार रुपये प्रति हेक्टर
- पिण्याच्या पाण्यासाठी ४२६ कोटी रुपयांचा आराखडा
- तीन हजार टँकरमार्फत पाणी पुरवठ्याचे अधिकार तहसीलदारांना
- १३ लाख हवामान आधारित विमा- ११ लाख शेतकऱ्यांना विम्याची मदत देणार
- ४५ कोटी रुपये शासनाकडून आणि २३० कोटी रुपये वीमा कंपनीकडून दिले जातील
- नदीजोड प्रकल्पाच्या आराखड्यात बदल, त्यात राज्यातील तीन नद्यांचा समावेश
- १५ मार्च २०१५ पर्यंत कृषी संजीवनी योजनेला मुदतवाढ
- जलशिवार योजनेत लोकप्रतिनिधींचा समावेश.

### दुष्काळावर मात करण्याकरिता कायमस्वरूपी उपाययोजना :-

- एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम ५० लक्ष हेक्टर क्षेत्रावर, प्रकल्पांची अंदाजित किंमत रुपये ६४३७ कोटी, पुढील एका वर्षात किमान ५००० गावांना दुष्काळमुक्त करण्याचा शासनाचा निर्धार.
- पुढील ५ वर्षात २.५० लक्ष शेततळी व ५०००० सिमेंट नाला बांध घेण्याचा शासनाचा मानस, विकेंद्रित साठ्यांद्वारे १० लक्ष हेक्टर शेतजमीन ओलिताखाली येणार.
- पुढील काळात ५ लक्ष सोलर पंप शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याकरिता धोरणात्मक निर्णय, प्रतीक्षाधीन असलेल्या सर्व शेतकरी या योजनेंतर्गत समाविष्ट.
- मागील तीन वर्षापासून सूक्ष्म सिंचनाकरिता थकलेले अनुदान पूर्णपणे उपलब्ध करून देण्याचा निर्णय, वर्ष २०१२- २०१३ साठी रु ३३२ कोटी करिता आर्थिक तरतूद उपलब्ध, नाबार्ड कडून RIDF अंतर्गत रु ४५० कोटी कर्ज, वर्ष २०१३-२०१४ मध्ये प्रलंबित सर्व अनुदान अदा करण्यात येत आहे, चालू वर्षाकरिता रु ३०० कोटी सूक्ष्म सिंचनाकरिता उपलब्ध, पुढील ५ वर्षात किमान १० लक्ष हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याचा निर्णय.
- पाण्याच्या साठ्यासाठी गाळ काढण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घेतला जाणार, रुपये ५० कोटी अधिकची तरतूद.
- राज्यात कोरडवाहू शेती अभियान, सध्या ५०० गावांना दुष्काळमुक्त करण्याकरिता रुपये ३०० कोटी निधी उपलब्ध, चालू वर्षाकरिता या कामाकरिता रुपये १५० कोटी उपलब्ध, १००० गावांचा समावेश करून रुपये ५०० कोटी उपलब्ध करून दिले जाणार.

(लेखक हे दै.सकाळ ॲग्रोवनचे मुंबईतील प्रतिनिधी आहेत.)
**संपर्क :** ०९८७०४४७७५०

# दुष्काळमुक्ती आणि शेतकऱ्यांना दिलासा

**राज्यातील शेती आणि शेतकरी यांना दिलासा मिळावा म्हणून तसेच गेली ३ वर्षे दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, नापिकी इत्यादी संकटप्रसंगी शेतक-यांना भरीव स्वरूपाची मदत मिळावी म्हणून नवीन सरकारने अनेक तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपाययोजना हाती घेतल्या आहेत. सांगताहेत महसूल, कृषी आणि मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथ खडसे**

नवीन शासन सत्तेवर आल्यानंतर विदर्भ आणि मराठवाड्याच्या शाश्वत कृषी विकासाकरिता ३४,५०० कोटी रुपये खर्चाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. हवामानाची शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी तालुका पातळीवर २,००० हवामान केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना ५ लाख कृषी सौरपंप देण्याची कार्यवाही करण्यात येईल. नगदी पिकांकरिता कृषिमूल्य साखळ्यांची निर्मिती केली जाईल. या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात १० लाख शेतकरी आणि पुढच्या टप्प्यात किमान २५ लाख शेतकरी समाविष्ट करण्यात येतील. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे २१५ कोटी रुपये वीजबिल सरकार भरणार तसेच दुष्काळी भागातील ५ लाख शेतकऱ्यांचे कर्ज आणि विद्यार्थ्यांचे दहावी/बारावीचे शुल्क माफ केले जाईल.

### दीर्घकालीन उपाययोजना

दुष्काळ निवारणाच्या दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी ७००० कोटी रुपयांच्या पॅकेजचा निर्णय, पीक कर्जाचे पुनर्गठन आणि कर्जमाफी, अपूर्ण विहिरी पूर्ण करणे, गरजेनुसार टँकर्स पुरविण्याचे अधिकार तहसीलदारांना प्रदान, खरीप २०१४ मध्ये ५० पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या २३,८११ गावातील शेतकऱ्यांच्या सावकारी कर्जाची शासनाकडून परतफेड त्यामुळे हे शेतकरी पुन्हा नवीन कर्जास पात्र ठरणार आहेत.

मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय कृषी सचिवांशी दूरध्वनीवरून केंद्राकडून अपेक्षित असलेल्या मदतीबाबत चर्चा केली आहे. सातत्याने भेडसावत असलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर



केंद्राने राज्याला किमान ६,००० कोटी रुपयांची तातडीची मदत करावी, अशी मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी केंद्रीय कृषिमंत्री राधामोहन सिंग यांच्या उपस्थितीत मुंबई येथे राज्यातील सर्वपक्षीय खासदारांची बैठक घेण्यात आली. राज्याला यापूर्वी कधीही मिळालेला नाही इतका निधी केंद्राकडून देण्यात येईल, असे श्री. सिंग यांनी यावेळी आश्वासन दिले. मला आशा आहे की केंद्राकडून निधी प्राप्त झाल्यानंतर त्याचे तातडीने वितरण आपत्तिग्रस्त शेतकऱ्यांना करण्यात येईल. नव्याने सुरू होणाऱ्या पंतप्रधानमंत्री सिंचन योजनेसाठी प्रस्ताव तयार करण्यामध्ये महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे.

### सिंचनाच्या सुविधांमध्ये वाढ

हवामानातील बदल आणि जागतिक तापमान वाढीमुळे या सर्व आपत्ती येत आहेत. या आपत्तीमुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सिंचनाच्या सुविधांमध्ये वाढ करणे, सूक्ष्म सिंचनावर भर देणे व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हवामानाचा अचूक अंदाज बांधून त्याप्रमाणे पिकांचे नियोजन करणे आवश्यक झाले आहे. राज्य शासनाने अशा नैसर्गिक आपत्तीमधून शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजनांबरोबरच दीर्घकालीन उपाययोजनाही तयार केल्या आहेत.

### जलयुक्त शिवार

जलसंवर्धनासाठी जलयुक्त शिवार ही योजना अमलात आणण्यात येत असून यावर्षाअखेरीस ५ हजार गावे दुष्काळमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रजासत्ताक दिनी सुमारे २८०० कामांचा एकाच दिवशी शुभारंभ करण्यात आला आहे. या योजनेत २०१५-१६ मध्ये १० हजार सिमेंट नालाबांध बांधण्यात येणार आहेत.

**शब्दांकन : अजय जाधव**

### आपदग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

**दुष्काळ, गारपीट, अवकाळी पावसाला सामोरे जावे लागल्याने मोठ्या प्रमाणावर शेतीचे आणि पशुधनाचे नुकसान झाले. या आपदग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाने तातडीने ४,००० कोटी रुपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे. या तातडीच्या उपायांबरोबरच शाश्वत शेतीसाठी राज्य दुष्काळमुक्त करण्याचे कार्य हाती घेतले आहे. कोरडवाहू जमिनीवरील शाश्वत सिंचनासाठी शासनाने शेतकऱ्यांना सौरपंप देण्याचेदेखील ठरविले आहे. आजवर वाटप करण्यात आलेल्या निधीच्या तपशिलानुसार सर्वाधिक ५८१ कोटी रुपये औरंगाबाद विभागात देण्यात आले आहेत. त्या खालोखाल ४९५ कोटी रुपयांचे वाटप अमरावती विभागात करण्यात आले आहे.**

# मुंबई नेक्स्ट

आला. मुख्यमंत्र्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी आवश्यक बाबींचा ऊहापोह चर्चासत्रात सहभागी झालेल्या तज्ज्ञ व विचारवंतांनी केला. गतिमान निर्णय, वित्तीय उपलब्धता आणि गतिमान कार्यान्वयन या काही प्रमुख बाबींवर प्राधान्याने चर्चा करण्यात आली.

# नवे पर्व गतिमानतेचे

**'मुंबई नेक्स्ट' या चर्चासत्रात राज्यातील आर्थिक विकासाच्या विविध क्षेत्रांचा साकल्याने विचार करण्यात आला. या चर्चासत्रात अतिशय महत्त्वाचे आणि नवे मुद्दे चर्चेसाठी येत राहिल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे संपूर्ण वेळ चर्चासत्राला हजर राहिले. आशिया खंडातील कोणत्याही जागतिक दर्जाच्या वित्तीय केंद्राशी स्पर्धा करू शकेल अशा वित्तीय केंद्रात मुंबईला रूपांतरित करण्याचा निर्धार मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केला.**




मुंबई हे राहण्यायोग्य सर्वोत्कृष्ट ठिकाण करणे या गोष्टीला प्राधान्य देण्याचे शहराच्या मान्यवरांनी ठरवले आहे. तसेच मुंबईला जागतिक व्यापार केंद्र (ग्लोबल बिझिनेस हब) करण्याची प्राथमिकता केंद्राने दिली आहे.

मुंबई महानगर प्रदेशाचे जागतिक दर्जाच्या, वित्तीय, वाणिज्यिक आणि मनोरंजन केंद्रात रूपांतरण (ट्रान्सफॉर्मिंग एमएमआर इनटू अ ग्लोबल, फायनांशियल, कमर्शिअल अँड एंटरटेनमेंट हब) या विषयावरील एक महत्त्वाचे चर्चासत्र मुंबईत नुकतेच आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात राजकीय, सामाजिक, आर्थिक, मनोरंजन, वाणिज्य या क्षेत्रांतील गणमान्य व्यक्ती सहभागी झाल्या होत्या. यामध्ये मुख्यमंत्र्यांसमवेत केंद्रीय नगरविकास मंत्री व्यंकय्या नायडू, केंद्रीय अर्थराज्यमंत्री जयंत सिन्हा, खा.पूनम महाजन, उद्योगपती जमशेद गोदरेज, मुकेश अंबानी, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अध्यक्षा अरुंधती भट्टाचार्य, अभिनेते अमिताभ बच्चन, चित्रपट व दूरचित्रवाणी कार्यक्रम निर्माती एकता कपूर आदींचा समावेश होता. मुंबईला विकासाच्या पुढच्या टप्प्यावर नेण्याविषयी या सर्वांनी आपली मते यावेळी व्यक्त केली.

मुंबई महानगर प्रदेशाचे रूपांतरण जागतिक दर्जाच्या वित्तीय केंद्रात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला असून मुंबईच्या सुधारणेसाठी प्रयत्नशील असलेली 'मुंबई फर्स्ट' ही संस्था त्यासाठी सहकार्य करणार आहे.

सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेशाच्या विविध समस्या आणि प्रश्नांवर या चर्चासत्रात व्यापक विचारविनिमय करण्यात

पायाभूत सुविधांच्या कामांना गती आणि लोकांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी अचूक नियोजन व कार्यान्वयन या बाबींवर मुख्यमंत्र्यांनी भर दिला.

या चर्चासत्राला शुभेच्छा देणारा संदेश केंद्रीय वित्तमंत्री अरुण जेटली यांनी पाठवला होता. त्यात त्यांनी नमूद केले की, मुंबई हे भारताच्या विकासाचे इंजिन आहे. जेव्हा मुंबईचा विकास होतो तेव्हा भारताच्याही विकासाला चालना मिळते.

आरोग्य, स्वच्छ पेयजल, स्वच्छता, दारिद्र्य, गृहनिर्माण यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. श्री. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आपल्या देशाकडे गुंतवणूकदारांचा ओढा वाढला आहे. याच कालावधीत इतर राष्ट्रांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. चीन, युरोपिअन युनियन, रशिया, ब्राझील या देशांना आर्थिक समस्यांनी ग्रासले आहे. ही मुंबईच्या



आर्थिक विकासासाठी सुवर्णसंधी आहे. केंद्र सरकारने आर्थिक विकासाला चालना देण्याचा निर्धार केला आहे. विकास प्रक्रियेला चालना देणाऱ्या प्रत्येक राज्यासोबत केंद्र सहभागी होऊ इच्छिते. केंद्राची सुधारणावादी धोरणे, स्मार्ट सिटीच्या निर्मितीला प्राधान्य, यांनी अर्थव्यवस्थेला गतिमानता प्रदान केली आहे. सरकारने कर प्रणालित सुधारणा अंमलात आणल्या असून यामुळे गुंतवणूकदार भारतात गुंतवणूक करण्यासाठी आकर्षित होत आहेत. पायाभूत सुविधांच्या निर्मितीला केंद्राने सर्वोच्च प्राधान्य दिले असून वित्तीय तूट भरून काढण्यावर केंद्राने लक्ष केंद्रित केले आहे. महाराष्ट्रात अशी अनेक क्षेत्रे




आहेत की जिथे विकासकामांना गती देता येणे शक्य आहे. नव्या बंदरांचा विकास, औद्योगिक कॉरिडॉर्स, पर्यटन ही काही विकासाची प्रमुख क्षेत्रे आहेत. पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक कमी झाली असली तरी वित्तीय उपलब्धतेला सुलभ करण्याची गरज आहे. निर्णय गतीने व्हायला हवेत. पायाभूत सुविधांमध्ये वित्तीय गुंतवणुकीच्या सगळ्या मॉडेल्सचा विचार व्हायला हवा. आपल्या घरगुती बचतीचे रूपांतर या प्रकल्पांच्या वित्तीय पुरवठ्यासाठी करणे गरजेचे आहे. सध्या केंद्र या काही क्षेत्रावर प्राधान्याने लक्ष ठेवून आहे.

या प्रसंगी बोलताना मुंबई महानगर प्रदेशाचे आयुक्त यू.पी.एस. मदान म्हणाले, मुंबईतील सार्वजनिक व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. सध्या सहा मेट्रो कॉरिडॉरचे बांधकाम सुरू आहे. ११६ किलोमीटरचे हे काम साधारणत: पुढील सात वर्षात पूर्ण होईल. नियोजनबद्धरीत्या ज्या बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्सची उभारणी करण्यात

### अशी होईल मुंबई फास्ट

- **२२ कि.मी.चा ट्रान्स हार्बर लिंक रोड -** शिवडी-न्हावाशेवा लिंक रोडचे काम यंदा सुरू होण्याची शक्यता. २२ किलोमीटर लांबीच्या या रोडमुळे मुंबई आणि नवी मुंबई या दोन शहरातील अंतर कमी होऊन प्रवासाचा वेग वाढेल. मुंबईशी थेट जोडल्या गेल्यामुळे बांधकाम क्षेत्राला ऊर्जितावस्था येऊ शकेल.
- **सागरी पथ -** मुंबईच्या वाहतूक समस्येवर मात करण्यासाठी नरिमन पॉइंट, मालाड-कांदिवली या मार्गावर दोन वर्षात सागरी पथाची निर्मिती केली जाईल. मुख्यमंत्र्यांनी यावर लक्ष केंद्रित केले आहे. पर्यावरणीय मंजुरी तत्काळ मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
- **विकास आराखड्यास मंजुरी -** मुंबईच्या बृहत विकास आराखडा जनतेच्या सूचना आणि तक्रारींसाठी खुला करण्यात आला आहे.
- **फिल्मसिटीला ग्लोबल रूप -** चित्रपट उद्योगाच्या सर्व गरजा पूर्ण करू शकेल अशी जागतिक दर्जाची चित्रपटनगरी उभारण्यात येणार आहे. मुंबईत येणाऱ्या पर्यटकांसाठी हे नवे आकर्षणाचे केंद्र ठरेल.
- **नवे पर्यटन धोरण -** या धोरणावर काम सुरू झाले आहे. सर्व संबंधितांशी व्यापक चर्चा सुरू आहे. महाराष्ट्रात २ कोटी पर्यटक येतात ही बाब लक्षात घेऊन या धोरणाचा आराखडा तयार केला जात आहे.
- **प्रकल्पांना तत्काळ मंजुरी -** मोठ्या कालावधीपासून प्रलंबित असणाऱ्या प्रकल्पांना तत्काळ मंजुरी देण्याचा सरकार विचार करत आहे. परवान्यांची संख्या कमी करून २० वर आणण्यात येणार आहे.
- **बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स -** नवे वित्तीय केंद्र होण्यासाठी गतिमान निर्णय घेतले जातील. उद्योगजगताने बीकेसीवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले आहे. या ठिकाणी जाण्यायेण्यासाठी अनेक उड्डाणपूल बांधले जाणार आहेत. या ठिकाणी हॉटेल्स, निवासी टॉवर्स, मॉल्सची उभारणी प्रस्तावित आहे. पूर्व द्रुतगती मार्गाला जोडणाऱ्या बीकेसी कनेक्टरचे काम लवकरच सुरू केले जाणार आहे.



आली, त्याकडे बघितले असता काही समस्या ठळकपणे दिसून येतात. उदा. प्रवेश आणि निर्गमन. त्यासाठी ३ उड्डाणपुलांचा विचार शासनस्तरावर होत आहे. यामुळे कलानगरमधून सुलभरीत्या प्रवेश आणि निर्गमन होईल. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्सला स्मार्टसिटी करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सीसीटीव्ही लावणे, इलेक्ट्रॉनिक पार्किंग या काही बाबी लवकरच हाती घेत आहोत. कामकाज संपल्यानंतर रात्रीचे सामाजिक आयुष्य जगण्यासाठी या भागात सध्या विशेष अशा सोयी-सुविधा नाहीत. त्यामुळे या भागात शहरातील रेस्टॉरेन्टसनी त्यांच्या शाखा उघडाव्यात अशी विनंती करण्यात आली आहे. पुढील ३-४ वर्षात कल्याण भिवंडीसारख्या मल्टी नोडल कॉरिडॉर्सच्या निर्मितीचाही विचार करण्यात येत आहे. मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबईच्या विकासासाठी १५ हजार ते २० हजार कोटी रुपये खर्चाच्या विकास योजना राबवण्यात येतील, असे महापालिका आयुक्त सीताराम कुंटे यांनी सांगितले. वित्तीय वर्ष २०१६ मध्ये ११ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे.

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातील सर्वात मोठे हरित विमानतळ असेल अशी माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय भाटिया यांनी दिली. जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे विस्तारीकरण, मेट्रो हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प सिडकोमार्फत राबवण्यात येणार आहेत. यामुळे नवी मुंबईतील विकास प्रक्रिया अधिक गतिमान होण्यास चालना मिळेल. २०१९ पर्यंत नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावरून हवाई वाहतूक सुरू करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

राज्यात अनेक स्वायत्त संस्था असल्याने त्यांच्यामार्फत होणाऱ्या विकास प्रक्रियेत समन्वय व एकसूत्रीपणा आवश्यक असल्याचे मत गोदरेजचे अध्यक्ष जमशेद गोदरेज यांनी व्यक्त केले. आपल्या प्रकल्पांसाठी वित्त पुरवठा ही समस्या ठरू शकत नाही असा आपल्याला विश्वास वाटत असल्याचे ते म्हणाले. आपण कशा तऱ्हेने कार्यरत होतो, ही बाब महत्त्वाची ठरते.

जागतिक बँकेच्या मनिंदर गील यांनी मुंबई विकासाच्या बृहद आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी एकात्मिक यंत्रणेच्या गरजेवर भर दिला. मुंबईला खऱ्या अर्थाने जागतिक दर्जाचे शहर करावयाचे असल्यास, परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीमध्ये युवकांचा मोठा सहभाग घेतला जावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पायाभूत सुविधांचा अभाव हा मुंबईसाठी काळजीचा विषय असल्याचे मत स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अध्यक्षा अरुंधती भट्टाचार्य यांनी व्यक्त केले. संपूर्णपणे रूपांतरीत होऊ शकणारे चलन,'मेक इन इंडिया' उपक्रमास गती देऊ शकते. चीनने त्यांच्या चलनाबाबत अशाप्रकारची मोठी झेप घेतली आहे. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये पायाभूत सुविधांची मोठी समस्या आहे. सिंगापूरसारख्या देशांमध्ये स्थिरावलेल्या वित्तीय व्यवस्थापकांना आपणास आकर्षित करावे लागेल.

इझ ऑफ डुईंग बिझिनेस, कर निर्धारण, नियमन या काही समस्यांना तत्काळ भिडणे आवश्यक असल्याचे मत आयसीआयसीआय बँकेचे कार्यकारी संचालक एन. एस. कन्नन यांनी व्यक्त केले. मुंबईला आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रामध्ये रूपांतरित करताना इथे काही करांमध्ये सूट मिळणे आवश्यक ठरेल, ही बाब ध्यानात घ्यायला हवी. जपानमध्ये भाषेचा मोठा अडथळा असूनही सक्षम पायाभूत सुविधा आणि गुंतवणूकदारांसाठी सुलभ ठरणारी करचना असल्याने त्या देशाकडे मोठी गुंतवणूक आकर्षित होत आहे. ❑ ❑

ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांनी मुख्यमंत्र्यांच्या, 'मुंबई व्हिजन'चे कौतुक केले. मुंबईमध्ये अधिक चांगली जीवनशैली आणि चांगले उत्पन्न शक्य असल्याने अधिकाधिक लोक आकर्षित होतात, याकडे श्री.बच्चन यांनी लक्ष वेधले. मात्र मुंबईची सांस्कृतिक महत्ता दाखवणारी वस्तुसंग्रहालये, नाट्यगृहे आदींची या शहरात कमतरता आहे. मराठी नाट्यसृष्टीला मोठा इतिहास आहे, याची जाणीव अनेकांना नाही. महाराष्ट्राचा इतिहास नेत्रदीपक असून इथे अनेक प्राचीन अवशेष आहेत, ठिकाणे आहेत. महाराष्ट्राची सांस्कृतिक महत्ता ठळकपणे लोकांच्या लक्षात येईल, अशाप्रकारचे उपक्रम राबवण्याची गरज आहे. या शहरात येणाऱ्या पर्यटकांना थांबून विश्रांती घेता यावी अशी ठिकाणे, कलावंतांना आपली कला सादर करता येतील अशा सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील.

बीकेसी सारखी ५ नवी केंद्रे येणाऱ्या काळात कांजूरमार्ग, कळवा, भिवंडी, वसई-विरार आणि कल्याण येथे विकसित केली जातील. यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराची निर्मिती होईल. गुंतवणूक वाढेल. त्यामुळे मुंबईवरील भार कमी होईल.

# पोलीस अकादमीत मुख्यमंत्री

**महाराष्ट्र पोलीस प्रशिक्षण अकादमीत प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. ११ चे दीक्षांत संचलन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच पार पडले. या उत्साही आणि आनंददायी सोहळ्यात मुख्यमंत्र्यांनी नव्याने पोलीस दलात सामील होणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकांच्या मनात कर्तव्याबाबत नवी ऊर्जा चेतवली. हा सोहळा संस्मरणीय ठरला.**

स्थळ महाराष्ट्र पोलीस अकादमीचे कवायत मैदान.. वेळ सकाळची.. अनेक पावले उत्साहाने या मैदानाकडे वळत होती..सर्वांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वहात होता. कारण पोलीस दलात अधिकारी होण्याचे स्वप्न एक वर्षाच्या कठोर प्रशिक्षणानंतर पूर्ण होणार होते.

महाराष्ट्र पोलीस प्रशिक्षण अकादमीत प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. ११ चे दीक्षांत संचलन पोलीस दलाचे पालकत्व ज्यांच्याकडे आहे असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणे, हे या उत्साहाचे आणखी एक कारण होते. त्यांच्यासोबत गृहराज्यमंत्री राम शिंदे आणि पोलीस महासंचालक संजीव दयालही होते. दीक्षांत संचलनात सहभागी प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे टाळ्यांच्या कडकडाटात मैदानावर आगमन झाले.

प्रमुख अतिथींचे आगमन होताच त्यांना मानवंदना देण्यात आली. मुख्यमंत्री महोदयांनी संचलनाचे निरीक्षण केल्यानंतर ऐटदार चालीतील निशाणटोळीचे आगमन झाले. निशाणटोळी परतल्यानंतर अकादमीचे संचालक नवल बजाज यांनी प्रशिक्षणार्थींना शपथ दिली. त्यानंतर दीक्षांत संचलनाच्या मुख्य सोहळ्याला सुरुवात झाली. संचलनाचे नेतृत्व निलेश दाबेराव आणि मंगला खाडे यांनी केले. आत्मविश्वासाने पूर्ण असलेले एकेक पाऊल टाळ्यांच्या गजरात मंचाच्या दिशेने पडत होते. प्रशिक्षणार्थींच्या स्वप्नपूर्तीचा तो क्षण होता. त्यात चूक होऊ नये म्हणून त्यांनी किती परिश्रम घेतले असणार!.... महिला प्रशिक्षणार्थींदेखील पुरुषांच्या तोडीने दमदार पावले टाकीत शिस्त आणि अभ्यासाचे सुंदर प्रदर्शन घडवीत संचलनात सहभागी झाल्या.

संचलनानंतर यशस्वी प्रशिक्षणार्थींना मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थीचा 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' पुरस्कार यशवंत विश्वनाथ बोरसे यांना प्रदान करण्यात आला. एकता पवार या महिला प्रशिक्षणार्थीने एकूण सहा पारितोषिके पटकावीत महिला पुरुषांच्या बरोबरीने पुढे जात असल्याचे दाखवून दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात त्यांच्या नावाचा विशेष उल्लेख करीत अशा अधिकाऱ्यांमुळे महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यात पोलीस दल यशस्वी ठरेल,असा विश्वास व्यक्त केला.



**सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थीचा 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' पुरस्कार यशवंत विश्वनाथ बोरसे यांना मिळाला.**



**सहा पारितोषिके पटकावणाऱ्या उपनिरीक्षक एकता पवार यांचे मुख्यमंत्र्यांकडून विशेष कौतुक**

मुख्यमंत्र्यांचे भाषण प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करणारे होतेच, त्याचबरोबर पोलीस दलाची पुढची दिशा स्पष्ट करणारे होते. पोलीस अकादमीला स्वायत्तता देण्याची घोषणा करतांना पोलिसांना ई-प्रशिक्षण देण्याचा विचारही त्यांनी मांडला. पोलीस दलासमोरील नव्या आव्हानांचा उल्लेख करताना गुन्हेगारांपेक्षा पोलिसांनी एक पाऊल पुढे राहावे यासाठी आधुनिक प्रणालीचा अभ्यास करण्याचे आवाहन देखील त्यांनी प्रशिक्षणार्थींना केले.

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये १३२ महिला प्रशिक्षणार्थी असल्याबाबत समाधान व्यक्त करीत अशा महिला अधिकाऱ्यांमुळे पोलीस दलाला शक्ती आणि मानवतेचा चेहरा प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जनतेचे रक्षक म्हणून समाजात वावरताना पीडितांना आणि वंचितांना न्याय देण्याचे कार्य करावे. सेवाभावनेतून कार्य करताना मानवतेच्या भावनेने समाजाकडे पाहावे आणि सतत कर्तव्यदक्ष राहावे, हा त्यांचा संदेश प्रशिक्षणार्थींसाठी प्रेरक आणि तेवढाच मार्गदर्शकही होता.

कार्यक्रमानंतर यशस्वी प्रशिक्षणार्थींच्या खांद्यावर स्टार्स लावण्याच्या वेळी प्रत्येकाशी हसतमुखाने संवाद साधत मुख्यमंत्र्यांनी त्यांचा उत्साह वाढविला.

**- डॉ. किरण मोघे**

# सार्वजनिक उद्योग घेणार नवी भरारी

**नवरत्न, महारत्न, मिनीरत्न अशा शासकीय कंपन्या व उद्योगांचा कारभार चालवणाऱ्या अवजड उद्योग मंत्रालयाने देशाच्या औद्योगिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. देशाच्या पायाभूत विकासात या मंत्रालयाचा वाटा वाखाणण्याजोगा आहे. या मंत्रालयांतर्गत येणाऱ्या उद्योगांद्वारे देशाच्या राजकोषात १ लाख ६२ कोटी रुपयांची रक्कम भरली जाते. या मंत्रालयाकडे असणाऱ्या ३२ सार्वजनिक उद्योगांपैकी १० ते १२ उद्योग तोट्यात आहेत किंवा बंद आहेत. या सर्वांना ऊर्जितावस्था आणण्यासाठी या खात्याचे केंद्रीय मंत्री अनंत गिते यांनी लक्ष केंद्रित केले आहे.**



**अवजड उद्योग हे बिनकामाचे मंत्रालय म्हणून ओळखले जाते. या मंत्रालयाची नेमकी ओळख आपण काय द्याल?**

हा ग्रह पूर्ण चुकीचा आहे हे मी गेल्या ९ महिन्यांच्या स्वानुभवावरून सांगतो. मुळात हे बीमारू मंत्रालय नाही. केंद्रीय राजकोषात जे मंत्रालय दरवर्षी १ लाख ६२ हजार ७६५ कोटींइतकी रक्कम भरते, जेथे किमान २ लाख इतके मनुष्यबळ आहे, ते मंत्रालय आजारी असूच कसे शकते? मुक्त अथर्व्यवस्थेच्या काळात सावर्जनिक उद्योगांकडे पाहण्याची दृष्टी बदलल्याने या मंत्रालयाबद्दल तशी भावना झाली असावी. वस्तुस्थिती तशी नाही. मिनीरत्न, नवरत्न, महारत्न अशा कंपन्यांचा उद्योगांचा व्यवहार जेथून चालतो ते मंत्रालय आजारी कसे असेल. अर्थात. सामान्य जनतेशी थेट निगडित कामे या मंत्रालयाच्या कक्षेत नसल्याने इतर मंत्रालयांच्या तुलनेत हे काहीसे उपेक्षित मंत्रालय असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. कारण येथे चमकोगिरीला फारसा वाव नसून प्रत्यक्ष काम करून दाखवायचे असते. मी मंत्री असेपर्यंत तेच काम करून दाखविण्यास माझे प्राधान्य राहील.

**या मंत्रालयाबद्दल काही सांगा?**

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यकर्त्यांनी विकासाचे जे प्रारूप अंगीकारले ते रशियाशी मिळतेजुळते होते. खुल्या अथर्व्यवस्थेच्या मुक्तपणाच्या काळात आपण ३६० अंशांत उलट फिरलो आहोत हा भाग सोडा. पण स्वातंत्र्यानंतर जेव्हा नवभारताची उभारणी

**मंगेश वैशंपायन**

करायची होती तेव्हा देशात टाटा, बिर्ला, बजाज, फिरोदिया, गोयंका अशी निवडक उद्योगघराणीच होती. त्या काळात सामान्यांच्या हाताला काम देणे हा राज्यकर्त्यांचा प्राधान्यक्रम राहिला. त्यातून सार्वजनिक उद्योगांची स्थापना झाली. पायाभूत सुविधांच्या विकासाची देशाला प्रचंड गरज होती. त्यातून वस्त्रोद्योग, जहाजबांधणी, वीजनिर्मिती, बंदरविकास असे सार्वजनिक उद्योग उभे राहिले. खासगीकरणाच्या काळात खासगी उद्योग वाढले. त्यानंतर सार्वजनिक उद्योगांना फारसे चांगले दिवस राहिले नसल्याचे चित्र उभे झाले.



**देशातील सार्वजनिक उद्योगांविषयी काय सांगाल?**

यात ८ लाख ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आहे व एकूण उद्योगांची उलाढाल १९ लाख ४५ हजार ७७७ कोटी रुपये आहे. या मंत्रालयाकडे ३२ सार्वजनिक उद्योग आहेत त्यातील किमान १० ते ११ उद्योग तोट्यात आहेत वा बंद आहेत. त्यांना ऊर्जितावस्था आणण्यासाठी वा त्यांचे स्वरूप बदलण्यासाठी केंद्राचे प्रयत्न सुरू आहेत व माझी त्यात सक्रिय भूमिका आहे व राहील. २७७ उद्योगांपैकी ७७ कंपन्या आजारी आहेत. हे तोट्याचे चित्र बदलण्यासाठी नॅशनल ऑटोमोटिव्ह बोर्डच्या स्थापनेच्या रेंगाळलेल्या प्रस्तावाला कॅबीनेटने नुकतीच मंजुरी दिली. याशिवाय रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट विभाग नुकतेच सुरू झाले आहे.

**तोट्यातील उद्योग फायद्यात आणणे व मंत्रालयाकडील सध्याच्या उद्योगांपेक्षा वेगळी कंपनी स्थापन करण्याच्या प्रस्तावाचे काय झाले?**

आजारी सार्वजनिक उद्योग फायद्यात आणणे हा मोठा प्रकल्प आहे. याबाबतचा एक मेगा प्लॅन केंद्रीय मंत्रिमंडळासमोर आम्ही नुकताच सादर केला आहे. याबाबत लवकरच पंतप्रधानांनसोमर पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनही होणार आहे. देशात एनटीपीसी, इंडियन आईल, भेल, आदी ७ महारत्न कंपन्या आहेत. त्यांच्याकडे सुमारे २ लाख कोटी इतका सरप्लस निधी आहे. त्यातून एक नवी कंपनी सुरू करण्याचा केंद्राचा प्रस्ताव आहे. ही ८ वी कंपनीही सार्वजनिक क्षेत्रातच काम करेल. मात्र तिची कार्यपद्धती व कार्यसंस्कृती नव्या युगाची असेल.



## ॲक्शन प्लॅन

- अवजड उद्योग मंत्रालयाकडे ३२ सार्वजनिक उद्योगातील १० ते ११ आजारी उद्योगांना ऊर्जितावस्था आणण्यासाठी केंद्राचे प्रयत्न सुरू.
- सध्याच्या ७ महारत्न कंपन्यांच्या सरप्लस निधीतून एक नवी कंपनी सुरू करणार. ही ८ वी कंपनीही सार्वजनिक क्षेत्रातच काम करेल.
- एनईएमएम-२०२० हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. दिल्ली व मुंबईसह सर्व महानगरांतील सार्वजनिक बससेवा बॅटरीवर चालविणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट.
- हा एकूण १४ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प. त्यातील प्राथमिक टप्प्यासाठीचे सुमारे ८०० कोटी रूपये केंद्राने नुकतेच दिले.
- यात सार्वजनिक बससेवांकडील सध्याच्या बसेस लगेच बाद केल्या जाणार नाहीत. मात्र ज्या नव्या बसेस येतील त्या बॅटरीवर चालणाऱ्याच असतील.

**नॅशनल इलेक्ट्रिक मोबिलिटी मिशनची (एनईएमएम) प्रगती कुठवर आली**

एनईएमएम-२०२० हा अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. देशाच्या महानगरांतील सार्वजनिक बससेवा बॅटरीवर चालविणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट असेल.

शहरातील प्रदूषण कमी करणे, इंधनाची लक्षणीय बचत हे त्याचे ठळक फायदे असतील. हा एकूण १४ हजार कोटी रूपयांचा प्रकल्प आहे. त्यातील प्राथमिक टप्प्यासाठीचे सुमारे ८०० कोटी रूपये केंद्राने नुकतेच दिले आहेत. बॅटरीवर चालणाऱ्या देशी वाहननिमिर्तीला चालना देणे, राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षा, शहरांत बसेसच्या प्रदूषणाला पायबंद घालणे या त्रिसूत्रीवर ही योजना आधारित राहील. यामुळे महानगरांतील सार्वजनिक वाहतुकीवर खर्च होणारे सुमारे २५ लाख लीटर इंधन दरवर्षी वाचेल, यात सार्वजनिक बससेवांकडील सध्याच्या बसेस लगेच बाद केल्या जाणार नाहीत. मात्र ज्या नव्या बसेस येतील त्या बॅटरीवर चालणाऱ्याच असतील. दिल्लीपासून ही योजना सुरू होणार आहे. यासाठी महाराष्ट्राने स्वारस्य दाखविले आहे. राज्याचे परिवहनमंत्री दिवाकर रावते यांच्याशी माझी चर्चाही झाली आहे. त्यामुळे दिल्ली पाठोपाठ मुंबई व महाराष्ट्रातील इतर मोठ्या शहरांसाठीही ही योजना राबवली जाईल.




**यापूर्वी वाजपेयी सरकारमध्ये व आताच्या मोदी सरकारमध्ये शिवसेनेकडे अवजड उद्योग हेच मंत्रालय आले आहे. याबद्दल आपले काय मत आहे?**

शिवसेना हा जनताभिमुख पक्ष आहे. या मंत्रालयात काही कामच नाही असे नव्हे पण थेट जनतेचे प्रश्न सोडविणे हे जे शिवसेनेचे ब्रीद आहे त्याच्याशी या मंत्रालयाचा तसा संबंध येत नाही. मात्र या मंत्रालयाला सेनेचा विरोध होता असे म्हणणे चुकीचे ठरेल. यापूर्वी मनोहर जोशी, सुबोध मोहिते असोत की आता मी, आमच्यापैकी कोणी हे मंत्रालय सोडून पळून गेलेले नाही. ही जबाबदारी सेनेने तेवढ्याच नेटाने पार पाडली आहेत. आम्ही येथे कामे केलेली आहेत व त्या कामाची पदचिन्हे आजही येथे दिसतात. मात्र मंत्रालयाची प्रतिमाच बिनकामाचे मंत्रालय, अशी बनवून ठेवली आहे की येथे येणे नको रे बाबा, असा काहीसा ग्रह होतो.

आताचे म्हणाल तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सर्वच मंत्रालयांकडे व्यक्तिशः लक्ष आहे. त्यात या मंत्रालयाच्या नावातच उद्योग व विकास अंतर्भूत असल्याने या मंत्रालयात काम करणे आता आव्हानात्मक झाले आहे. शिवसेना अध्यक्ष उध्दव ठाकरे यांच्या मागर्दशर्नाने मी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडतो आहे, यापुढेही पार पाडेन.

(लेखक हे सकाळचे नवी दिल्लीतील ज्येष्ठ प्रतिनिधी आहेत.)
**संपर्क :** ०९९५८३४८४३७

विशेष मुलाखत

# स्वयंपूर्ण गावे स्वयंसिद्ध गावे

**ग्रामविकास, महिला व बालकल्याण विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवण्याचा संकल्प या खात्याच्या मंत्री पंकजा मुंडे-पालवे यांनी केला आहे. ग्रामस्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देऊन गावांना स्वयंपूर्ण करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. महिलांच्या सुरक्षिततेची समस्या सोडविण्यासाठी गती दिली आहे. जलयुक्त शिवार योजनेद्वारे पाणीटंचाई दूर करून सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला आहे.**



**महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून सर्वप्रथम कोणत्या योजना, निर्णय घेणार?**

मुलांच्याबाबत बोलायचे तर मी अनाथाश्रमातल्या मुलांसाठी बालआधार कार्ड सुरू केले आहे. त्यावर त्यांची संपूर्ण माहिती असेल आणि त्यांच्या नावावर कोणीही अधिकचे पैसे उचलू शकणार नाही अशी तरतूद त्यामधून करण्यात आली आहे. अंगणवाडी सेविका खूप मोठी भूमिका या विभागासाठी पार पाडत असतात. त्यांना मदत व्हावी आणि हे काम उत्तम रीतीने पार पाडण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून काही गोष्टी करायच्या ठरवल्या आहेत. बालकांना योग्य आहार मिळावा, त्यातील पोषणमूल्ये उत्तम असावीत यासाठी विभागातर्फे विशेष प्रयत्न आम्ही करणार आहोत. त्यांच्या आहारामध्ये प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स आणि इतर पोषक गोष्टींचाही समावेश असायला हवा.

**महिला व मुलांमधील कुपोषणाच्या प्रश्नावर कशी मात करणार?**

कुपोषणाचा प्रश्न हा गुंतागुंतीचा असून त्याला अनेक सामाजिक, आर्थिक बाजू आहेत. त्यावर एकच ठोस असा उपाय असू शकत नाही. विविध उपाय सातत्याने राबवून कुपोषण कमी करता येऊ शकते. अनेकदा अज्ञान, खाण्यापिण्याच्या चुकीच्या पद्धती, कुपोषित आईच्या पोटी जन्माला

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारताचा मूलमंत्र दिला आहे. तोच राज्याच्या प्रत्येक गावागावामध्ये घेऊन जाण्याची जबाबदारी माझ्या विभागाची आहे. त्यासाठी गावात शौचालय बांधणे, परिसर स्वच्छ ठेवणे असे अनेक उपाय राबवण्याचे आदेश मी दिले आहेत. आमच्या सरकारच्या पाच वर्षांच्या काळात जर हे स्वच्छतेचे अभियान आम्ही यशस्वी करू शकलो तर येत्या पिढ्यांसाठी ती एक चांगली वातावरणनिर्मिती असेल.**



येणारी मुले, लहान वयात होणारी लग्नं आणि त्यानंतर मुले, आईचा सर्वांगीण विकास न होताना जन्माला येणारी मुले अशा अनेक गोष्टी कुपोषणासाठी कारणीभूत ठरत असतात. त्यांना सुविधा देण्याबरोबरच जास्तीत जास्त प्रबोधन करणे हे आमचे प्रमुख काम आहे.

**आपल्याकडे असणाऱ्या विविध विभागांना गतिशील करण्यासाठी नवे धोरण काय असेल?**

महिला व बालकल्याण विभाग गेले अनेक वर्षे महिला व बालकांच्या कल्याणासाठी काम करत आहे. त्यासाठी विभागातील अधिकाऱ्यांमध्ये परस्पर समन्वयाचे वातावरण असणे गरजेचे आहे. मला तशा वातावरणामध्ये काम करायला आवडेल. त्यांना आपल्या योजना, करायचे काम याबाबत स्पष्टता हवी आणि कामात पारदर्शकता हवी. त्यामुळे कामाला गती येईल. जो निधी केंद्र सरकारकडून किंवा राज्य सरकारकडून मिळतो तो शेवटच्या माणसापर्यंत जाईल याची खात्री विभागातल्या अधिकाऱ्यांनी घ्यायला हवी.

**महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांची संख्या वाढत आहे. त्यासाठी विभागाचा सहभाग काय असेल?**

महिला सुरक्षेबाबत खूपसा भाग हा गृहविभागाशी निगडित आहे. तरीही त्यांचे मनोधैर्य वाढवणे, काही दुर्दैवी घटना घडल्यानंतर त्यांना परत एकदा समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे, त्यांना सामाजिकदृष्ट्या सक्षम बनवणे अशा काही गोष्टी माझ्या विभागामार्फत केल्या जाऊ शकतात. दोन्ही विभागांच्या सहकार्यांने विविध योजना राबवल्यास अनेक प्रश्न मार्गी लागू शकतील.

**महिला कर्मचाऱ्यांसंदर्भात विभागामार्फत काय प्रयत्न करणार?**

नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्यांकडेही सहानुभूतीने पाहण्याचा आमचा दृष्टिकोन आहे. शहरी भागांमध्ये नोकरी करणाऱ्या महिलांच्या मुलांना पाळणाघरे, तिथे योग्य सुविधा असेही काही प्रयत्न आमच्या विभागातर्फे करण्यात येतील.

**ग्रामविकास विभागांतर्गत खेड्यांना स्वयंपूर्ण करण्यासाठी काय योजना आहेत?**

माझ्याकडे ग्रामविकास हा महत्त्वाचा विभाग आहे. त्यामध्ये स्वच्छता हा एक महत्त्वाचा भाग आहे. मला संगीता आव्हाळे भेटली होती जिने शौचालय बांधण्यासाठी आपले मंगळसूत्र विकले होते. तिचा मी मुंबईत बोलावून सत्कारही केला. अशा स्वच्छतेसाठी झगडणाऱ्या अनेक संगीता आव्हाळे गावागावातून तयार व्हायल्या हव्या आहेत तरच आपण चांगल्या पद्धतीने हा स्वच्छतेचा संदेश पुढे नेऊ शकू आणि मोठ्या प्रमाणावर राबवू शकू. गावांना स्वयंपूर्ण करताना रोजगार निर्मिती गावातच व्हावी. चांगल्या शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, यंत्रणा राबवणारे नियमित कर्मचारी आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करण्यावरही या विभागाचा भर आहे. प्रत्येक गावामध्ये रस्ते, स्वच्छता, नाले, स्वच्छ पिण्याचे पाणी, शौचालये हवे. गावामध्ये बस यायला हवी जेणेकरून ते इतर भागांशी जोडलेले राहतील. आशा कर्मचारी त्या गावामध्ये वेळेवर जायला हव्यात. अंगणसेविका हव्यात. मुलांच्या शिणक्षाची सोय, वीज, शेतीसाठी पुरेशा प्रमाणात पाणी हवं. पावसाचं पाणी अडवण्याची योजना त्यांच्याकडे हवी. जलसंधारणाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पाण्याची पातळी वाढवून शेतीसाठी पाण्याचा उपयोग व्हावा, यासाठीही प्रयत्न केले जातील. सौरऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात व्हायला हवा. गाव केवळ परिपूर्ण नव्हे तर ते स्वयंपूर्ण असायला हवे तरच ग्रामीण भागातील लोकांचे जीवन सुकर होऊ शकेल.


## श्रुती गणपत्ये

(लेखिका या एशियन एजच्या प्रिंसिपल करस्पॉडेन्ट आहेत.)

**संपर्क :** ०९९३०९५५३९२


- अनाथाश्रमातील मुलांसाठी बालआधार कार्ड
- कुपोषण दूर करण्यासाठी सुविधा व प्रबोधन कार्यक्रम
- महिलांना सामाजिकदृष्टया सक्षम बनवण्यास प्राधान्य
- महिला सुरक्षा संदर्भात गृहविभागाशी समन्वय
- महिला कर्मचारी मुलांसाठी आवश्यकतेनुसार पाळणाघर
- तृतीयपंथीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न
- स्वच्छ भारत उपक्रम गावागावांत राबवणार
- नरेगाच्या माध्यमातून गरिबांना रोजगार उपलब्धी
- गावांमध्ये प्राथमिक सुविधा मिळण्यासाठी प्रयत्न
- स्वयंरोजगाराला चालना देणारे उपक्रम राबवणार
- आदर्श ग्रामनिर्माण योजनेला बळकटी देणार

# आपुलकी आणि लोकाभिमुखता

**मार्च महिन्याच्या 'लोकराज्य' अंकासाठी एक दिवस मंत्र्यांसोबत या सदरासाठी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांच्यावर लिहिण्याचे ठरले. मंत्रिमहोदयांना मी याबाबतची कल्पना दिली. त्यांनी याबाबत उत्सुकता दाखविली. श्री. कदम यांचे खासगी सचिव आणि स्वीय साहाय्यकांकडून मंगळवार २४ फेब्रुवारीची वेळ मला मिळाली आणि माझ्यासोबतचे माझे सहकारी यासाठी सज्ज झालो.**

मंगळवारी मंत्रिमंडळाची बैठक असल्याने सोमवारी रात्रीच ते त्यांच्या शासकीय निवासस्थानी शिवगिरी येथे पोहोचले होते. सोमवारी रात्री मंत्रिमहोदयांनी त्यांच्या स्वीय साहाय्यकांकडून आम्ही मंगळवारी किती वाजता पोहोचणार आहोत आणि कशाप्रकारे या सदराचे कव्हरेज होणार आहे याची माझ्याकडे विचारणा केली. श्री. कदम यांच्या स्वीय साहाय्यकांनी आम्हाला मंगळवारी सकाळी ९.३० वाजता शिवगिरी बंगल्यावर यायला सांगितले होते.

मंगळवार २४ फेब्रुवारी रोजी माझ्यासह माझे सहकारी सकाळी ९.३० वाजता श्री. कदम यांच्या शिवगिरी बंगल्यावर पोहोचलो. मला वाटले अजून मंत्रिमहोदय त्यांच्या कार्यालयात आले नसतील. पण त्यांच्या खासगी सचिवांनी सांगितले की, साहेबांचा दिवस सकाळी ६ वाजता सुरू होतो. वृत्तपत्र वाचन, मग स्वत:चे आवरणे, देवपूजा आणि



सकाळचा नाश्ता असा नित्यनियम आटोपून ते बंगल्यावरील कार्यालयात सकाळी ९ वाजताच येऊन बसतात. मंत्रिमहोदय कार्यालयात येण्याआधीच खरे तर त्यांना भेटायला लोक येऊन थांबलेले असतात. विविध विषय घेऊन लोक भेटत असतात आणि मंत्रिमहोदयसुद्धा अचानक, वेळ न घेता आलेल्या लोकांनाही भेटतात, त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत असतात. आम्ही जेव्हा सकाळी



९.३० वाजता बंगल्यावर गेलो, तेव्हा श्री. कदम यांचे काम सुरू झाले होते. ते लोकांना भेटत होते, त्यांची गाऱ्हाणी ऐकत होते, त्यांच्याशी बोलत होते, मध्येच ते घडाळ्याकडे बघून स्वीय साहाय्यकांना सांगत होते, 'आपल्याला निघायचे आहे रे मंत्रालयात...' मंत्रिमंडळ बैठकीची ते आठवण करून देत होते. आम्ही त्यांच्या कार्यालयात त्यांच्यासमोर जाऊन उभे राहिलो. गेल्या गेल्या त्यांनी सूचना केल्या, 'ताई आलात आता बिनधास्त राहा... तुम्ही चहा घेतला का ?' तोपर्यंत त्यांनी बंगल्यावरील त्यांच्या माणसाला आमच्यासाठी चहा आणायलाही सांगितले... थोड्या वेळात चहा आला. चहा घेत घेतच त्यांनी मला त्यांचा आजचा दिवस कसा असणार आहे, काय बैठका आहेत ते सांगितले. ते म्हणाले, 'आज सकाळी ११ वाजता मंत्रिमंडळ बैठक आहे. त्यानंतर १ वाजता मी पर्यावरण विभागाची बैठक बोलावली आहे. प्लॅस्टिक पिशव्यांवर जी बंदी घातली आहे, त्याबाबत विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत मी बोलणार आहे. आज मंत्रिमंडळ बैठक असल्याने अनेक मंत्री मंत्रालयातच असतात. तसेच अनेक आमदार आपापल्या मतदारसंघाची कामे घेऊन येतात. तेव्हा त्यांना वेळ देणे, त्यांची निवेदने स्वीकारणे, असे काम मी आज करणार

**वर्षा फडके**

आहे. त्यांनतर जेवण आणि मग पुन्हा ३ वाजता मी औरंगाबाद जिल्हयाचा पालकमंत्री या नात्याने औरंगाबाद जिल्हा विकास आराखड्यासंदर्भात बैठक बोलवली आहे. त्यांनतर ४ वाजता मी मंत्रालयात पत्रकारांशी वार्तालाप करणार आहे. त्यांनी काही मिनिटातच दिवसभराचे त्यांच्या कामाचे नियोजन सांगितले. पुन्हा एकदा घडयाळाकडे पाहुन म्हणाले, 'चला आता निघू या मंत्रालयात... नाहीतर ट्रॅफिक लागेल...' असे म्हणून आम्ही मंत्रालयाकडे निघालो.

मंत्रालयात प्रवेश केल्यानंतर थेट त्यांच्या



केबिनमध्ये न जाता ते मंत्रालयातील ७ व्या मजल्यावर मंत्रिमंडळ बैठकीसाठी निघाले. या सगळ्या प्रवासात आम्ही त्यांचे फोटोही काढत होतो. सातव्या मजल्यावर मंत्रिमंडळ बैठकीला पोहचल्यावर त्यांनी आम्हाला येथे थांबू नका... माझ्या कार्यालयात थांबा, अशा सूचना केल्या. त्यांच्या सूचनेनुसार आम्ही त्यांच्या कार्यालयात त्यांची वाट पाहत होतो. मंत्रिमंडळ बैठक संपल्यानंतर ते त्यांच्या कार्यालयात आले. त्या दिवशीच्या वर्तमानपत्रात त्यांच्याविषयी आलेल्या बातम्यांची कात्रणे आम्ही त्यांना दाखवली. त्यानंतर त्यांना फेब्रुवारी महिन्याचा 'लोकराज्य'चा अंकही दाखविला. त्यांनी उत्सुकतेने लोकराज्य हातात घेतला. लोकराज्य चाळत असताना त्या अंकात त्यांचे मिठी नदीची पाहणी करतानाचे फोटो आणि बातमी प्रसिद्ध झालेली पाहिली. ते पाहून ते म्हणाले, 'ताई...तुम्ही खूप चांगली प्रसिद्धी केलीत या दौऱ्याची.'

त्यानंतर त्यांच्या दैनंदिनीप्रमाणे १ वाजताच्या बैठकीसाठी पर्यावरण विभागाचे अधिकारी आले होते. त्यांनी काही वेळातच नियोजित बैठक सुरू केली. प्लॅस्टिक पिशव्यांवर घालण्यात आलेल्या बंदीबाबत या बैठकीत चर्चा झाली. तोपर्यंत दुपारचे दोन वाजत आले होते. त्यांनी एकदा घडाळ्याकडे पाहिले आणि आम्हाला जेवून घेण्याची सूचना केली. पुढील बैठका, कामे आणि भेटीगाठी असल्याने त्यांनीही अगदी काही मिनिटातच स्वत:चे जेवण आटोपले. एव्हाना त्यांच्या दालनात आलेल्या अभ्यागतांची गर्दी वाढली होती. ते मात्र आलेल्या प्रत्येक अभ्यागतांला भेटत होते, त्यांच्याकडून निवेदन स्वीकारत होते.

एव्हाना दुपारचे ३ वाजत आले आणि मग औरंगाबाद विकास आराखडा संदर्भात बैठकीसाठीचे अनेक अधिकारी आल्याचे कळताच त्यांनी यासंदर्भात तातडीने बैठक सुरू केली. या बैठकीत त्यांनी आपली भूमिका मांडताना स्पष्ट केले की, 'मी औरंगाबाद जिल्ह्याचा पालकमंत्री आहे. पालकमंत्री म्हणून औरंगाबाद जिल्ह्याचा विकास करणे हे माझे कर्तव्य आहे. त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्याच्या विकास आराखड्याला गती देण्यात येईल. औरंगाबाद विकास आराखडा बैठक संपल्यानंतर दालनात पत्रकारांची गर्दी सुरू झाली.

**लोकांना भेटताना मला वेगळेच रामदास कदम अनुभवायला मिळाले, कारण ते प्रत्येकाची आपुलकीने चौकशी करत होते, त्यांच्या अडचणी समजून घेत होते आणि विशेष म्हणजे ते लोकांमध्ये रमत होते.**

श्री. कदम यांनी पत्रकारांशी अनेक विषयांवर चर्चा करून भूमिका मांडली. वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी त्याबरोबरच इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधीही आले होते. अनेक पत्रकारांनी त्यांना उलटसुलट प्रश्न विचारले, मात्र जराही विचलित न होता त्यांनी प्रत्येक प्रश्नाची उत्तरे दिली.

पत्रकारांशी वार्तालाप सुरू असतानाच त्यांनी स्वीय साहाय्यकाला आपल्याला तातडीने दूरदर्शनला जायचे आहे, असे सांगितले. दूरदर्शनला पर्यावरण विभागाच्या एका संदेशाचे रेकॉर्डिंग करायचे होते. ते पूर्ण



झाल्यावर ते पुन्हा शिवगिरीवर जाणार होते. संध्याकाळी पर्यावरण विभागाच्या नस्त्या ते तिथेच पाहत आणि त्यावर स्वाक्षरी करीत.

आमच्या दौऱ्याचा शेवट होत होता. पण या दिवसभरात त्यांना जवळून एक मंत्री म्हणून पाहताना लक्षात आले की, पर्यावरण खात्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी कामांना गती दिली आहे. आज पर्यावरण हा विषय आपल्या दैनंदिन जीवनाशी जोडला गेला आहे. त्यामुळेच सर्वसामान्यांच्या जीवनावर काही विपरित परिणाम होऊ नये यासाठी ते अनेक निर्णय घेत आहेत.

दिवस संपत होता आणि आमचा मंत्र्यांसोबतचा दिवसभराचा दौराही संपत आला होता. एक दिवस मंत्र्यासोबत हा अनुभव खूप काही शिकवून गेला होता. आम्ही मंत्र्यांच्या प्रसिद्धीचे काम करण्यासाठी त्यांच्याकडे वारंवार जात असतो. मात्र त्यांचा दिनक्रम, दिवसभरातील कामाचा व्याप, कामाचा कितीही ताण असला तरी आलेल्या लोकांशी शांतपणे आणि सौजन्याने वागण्याची कला, निर्णय घेताना येणारा ताण हे सगळे मला त्या दिवशी अनुभवता आले. जेव्हा मंत्रिमहोदय मंत्रालयातून जायला निघाले, तेव्हा आम्ही त्यांना गाडीपर्यंत सोडायला गेलो. त्यांनी गाडीत बसण्यापूर्वी आमचा स्मितहास्याने नमस्कार करत निरोप घेतला.

❐ ❐

# समर्थ महिला, सक्षम बालक



**आगामी काळात महिला व बालकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय आम्ही घेणार आहोत. महिलांना समान संधी मिळावी यासाठीचे महिला धोरण आणि बालकांसाठीचे बालधोरण या माध्यमातून महिलांचा आणि बालकांचा सर्वांगीण विकास हेच आमचे सूत्र असणार आहे, सांगताहेत महिला व बालविकास, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण आणि औषधी प्रशासन या खात्यांच्या राज्यमंत्री विद्या ठाकूर**

महिला व बालकल्याण राज्यमंत्री म्हणून काम करायला सुरुवात केल्यानंतर कोणते काम प्रथम हाती घ्यावे असा प्रश्न माझ्यासमोर होता. मग मी ठरवले की, बालकांच्या कल्याणापासून कामाला सुरुवात करावी. म्हणूनच महिला आणि बालकल्याण राज्यमंत्री म्हणून बालकांच्या प्रश्नांकडे मी लक्ष द्यायला सुरुवात केली, त्यांच्या प्रश्नांवर मी लक्ष केंद्रित केले. यासाठी मी प्रथम बालगृहांकडे लक्ष दिले आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बालगृहे आहेत, या बालगृहांची सुधारणा करणे हा आपला प्रमुख अजेंडा असणार आहे.

महिला व बालकल्याण राज्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर बालकांच्या कल्याणासाठी काम करण्याचे मी निश्चित केले होते. त्याची सुरुवात मी निरीक्षण आणि बालगृहांपासून केली. बालगृहांची सुधारणा करण्याबरोबरच निरीक्षण आणि बालगृहातील बालकांचे प्रश्न सोडवण्यावर मी भर देत आहे. बालगृहांमध्ये असलेल्या मुलांच्या पुढील निकोप वाढीसाठी या मुलांना लवकरात लवकर त्यांच्या पालकांकडे सुपुर्द करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मी काम सुरू केले आहे. मागील काही दिवसांमध्ये मी अनेक निरीक्षण आणि बालगृहाला भेट दिली. त्यातूनच बालकांचे शोषण थांबविणे आणि त्यांना सुरक्षित वातावरण निर्माण करून देणे हेच प्रमुख उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मी त्या दिशेने काम सुरू केले आहे. मुंबईतील चित्रपट क्षेत्राचे आकर्षण अथवा इतर अनेक कारणांमुळे देशाच्या विविध भागातून मुले घरातून पळून मुंबईत येतात. मुंबईत आल्यानंतर काय करायचे असा प्रश्न समोर उभा राहतो आणि मग मिळेल ते काम करायला ही मुले सुरुवात करतात. बालकामगार कायद्यामुळे ही मुले पकडली जातात आणि त्यांना बालगृहात आणले जाते. परंतु पुढे त्यांचे समुपदेशन करून त्यांच्या पालकांच्या ताब्यात देणे आवश्यक आहे. त्या दिशेने मी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचबरोबर राज्यातील बालगृहांची सुधारणा करण्यावर मी आगामी काळात भर देणार आहे. राज्यातील बालगृहाच्या आधुनिकीकरणासाठी शासन प्रयत्नशील आहे. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व बालगृहात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. बाल सुधारगृहातील मुले व मुलींच्या कल्याणासाठी कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर भर देण्यात येणार आहे. बालगृहातील वसतिगृह, वैद्यकीय सुविधा, कार्यशाळा तसेच या मुलांसाठी घेतले जाणारे मनोरंजनात्मक उपक्रम याकडेही आपण राज्यमंत्री म्हणून जातीने लक्ष देणार आहोत. महिला राज्यमंत्री म्हणून काम करीत असताना माझी जबाबदारी अधिक वाढली आहे. महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी मी स्वत: माझ्या मतदारसंघात बचतगट स्थापन केले आहेत. या बचतगट चळवळीचे जाळे राज्यभर तयार होणे आवश्यक आहे, असे मला वाटते. महिला आमदार आणि आता राज्यमंत्री म्हणून काम करीत असताना महिलांना भेडसावणाऱ्या समस्या, त्यांचे प्रश्न जाणून घेण्याचा मी नेहमीच प्रयत्न करीत असते. आज अनेक क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर दिसतात. स्त्रियांची क्षमता वाढलेली आहे. या क्षमतेचे चीज राजकारणातही व्हायला हवे, असे मला वाटते. प्रभावी नियोजन, महिला आणि बालकांसाठीच्या विविध योजना आणि निर्णय, यामुळे महिलांचे सबलीकरण आणि बालकांचे सक्षमीकरण यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. तसेच अधिकाधिक काम करून तो आणखी आघाडीवर नेण्याचा माझा विभाग प्रयत्न करेल, असे मी ठामपणे सांगू शकते.

**शब्दांकन : वर्षा फडके**



# ओझे नको... बालपण जपू या

मुलांच्या दप्तराचे ओझे कमी करणे आवश्यक आहे, अशा आशयाच्या बातम्या गेल्या अनेक दिवसांपासून सतत वर्तमानपत्रात येत आहेत. हे ओझे कमी न केल्यास या मुलांना पाठदुखी, कंबरदुखी असा त्रास होऊ शकतो.

शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनीही ही बाब अत्यंत गांभीर्याने घेतली. विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे ओझे कमी करण्याच्या भावनेतून श्री. तावडे यांनी काही दिवसांपूर्वी विलेपार्ले येथील काही शाळांमध्ये भेट देण्याचे ठरविले. व्यक्तिश: शाळेत जाऊन विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे नेमके किती आहे, हे शिक्षणमंत्र्यांनी स्वत: जाऊन वजनकाट्यावर तपासणे हे प्रथमच घडत असावे.

साधारणत: सकाळी १० च्या सुमारास शालेय शिक्षण मंत्री आले आणि त्यांनी शाळेत पोहोचताच पार्ले टिळक शाळेच्या मुख्याध्यापकांना पाचवी ते सातवीपर्यंतचे इंग्रजी आणि मराठी माध्यमांचे वर्ग दाखविण्यास सांगितले. काही वेळातच आम्ही सर्व वर्गांवर पोहोचलो. शिक्षण मंत्र्यांसह आम्ही सगळे प्रत्येक वर्गात जात होतो. प्रत्येक वर्गात गेल्यावर मुले उभी राहत. गुड मॉर्निंग सर किंवा एक साथ नमस्ते असे म्हणत श्री. तावडे यांचे स्वागत करत होती. श्री. तावडे सुद्धा आपुलकीने त्या मुलांच्या स्वागताचा स्वीकार करीत होते.

'मी विनोद तावडे... शालेय शिक्षणमंत्री. आज तुमच्या शाळेत आलो आहे, कशासाठी हे तुम्हाला माहीत आहे का ?' असा सवाल ते वर्गात विचारत होते. मात्र शिक्षणमंत्री आपल्या वर्गात कशाला आले आहेत याची विद्यार्थ्यांना कल्पना नव्हती. त्यामुळे मुले निरुत्तर होत. मग स्वत: श्री. तावडे मुलांना सांगत की, 'तुम्ही शाळेत येताना पाठीवर जे दप्तर घेऊन येता, त्याचे ओझे नेमके किती आहे हे तपासण्यासाठी मी येथे आलो आहे.' हे ऐकताच मुलांना आश्चर्य वाटत होते. ते त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. मुलांशी हा संवाद झाल्यानंतर दप्तराचे ओझे तपासण्यासाठी स्वत: शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी वजनकाटा हातात घेतला. या वजनकाट्यावर त्यांनी मुलांच्या दप्तराचे वजन केले. सरासरी ४ ते ६ किलोपर्यंत दप्तराचे ओझे असल्याचे या पाहणीत त्यांच्या निदर्शनास आले.

या मुलांशी संवाद साधताना मुलांचे दप्तर हातात घेताना श्री. तावडेसुद्धा शाळेच्या आठवणींमध्ये रमले. यावेळी त्यांनी वजनकाट्यावर मुलांचे दप्तरासह वजनही केले. वजनकाट्यावर दप्तरासह उभे राहिलेल्या अनेक मुलांशी ते बोलत होते. ते सांगत होते की, 'तुम्ही आजकालची शाळेत जाणारी मुले खूप बिझी असता. तुम्हाला प्रचंड अभ्यास असतो. वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटी करता. म्हणून शाळेत जाताना तुमचे दप्तर जड होते. पण शालेय शिक्षणमंत्री म्हणून मी तुमच्या दप्तराचे ओझे कमी करण्याचा नक्कीच प्रयत्न करीन. मी नेहमी शाळेत जाणाऱ्या मुलांना न्याहाळतो, तेव्हा माझ्या लक्षात येते की, तुम्ही मुले काळाच्या अगोदरच मोठी आणि समजूतदार झाला आहात. यामध्ये तुमचे बालपण हरवते आहे. पण मी शालेय शिक्षणमंत्री म्हणून पुढील वर्षापासून म्हणजेच जून २०१६ पासून तुमचे बालपण जपण्याची काळजी घेईन.' श्री. तावडे यांनी असे सांगताच मुलांनी आनंदात टाळ्या वाजविल्या. सरासरी तुमच्या शाळेच्या दप्तराचे ओझे ४ ते ६ किलो आहे. हे कमी करण्यासाठी विषयांचे वेळापत्रक बदलता येईल का, सर्व भाषा एकत्र आणि गणित, विज्ञान अशी विभागणी करता येईल का, पुस्तकांचे चाचणीनिहाय विभाजन, सर्व विषयांची दर तिमाही अभ्यासक्रमानुसार परीक्षा, याबाबतही विचार करण्यात येईल. ज्या उद्देशासाठी शाळांचा दौरा होता, तो पूर्ण झाल्यानंतर मग त्यांनी या शाळांतून फेरफटकाही मारला. मैदानावर खेळणाऱ्या विद्यार्थ्यांमध्येही ते काही काळ रमले.

**– वर्षा फडके**

### मुलांच्या मागण्या

- आम्हाला टॅब द्या
- आमची पुस्तके शाळेतच ठेवा
- शाळेत आम्हाला लॉकर द्या
- आमची प्रोजेक्टस शाळेतच ठेवा
- वेळापत्रकातील विषयानुसार तास कमी करा



# गुंतवणुकीत महाराष्ट्रच अग्रेसर

**जगाचे उद्योजक आदराने भारताकडे पाहतात. त्यांना महाराष्ट्राबाबत प्रचंड आकर्षण आहे. महाराष्ट्राचे राजकीय स्थैर्य, कुशल मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, आधुनिक शिक्षण, माहिती तंत्रज्ञानाने परिपक्व युवक याबाबत जगभरात प्रचंड उत्सुकता आहे. दाव्होस येथील जागतिक आर्थिक परिषदेत हा अनुभव आला. मात्र, काही जाचक कायदे आणि अटी यामध्ये बदल केल्यास, जगातले नामांकित उद्योग महाराष्ट्रात प्रचंड गुंतवणूक करू शकतात; असा विश्वास राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी व्यक्त केला, त्यांच्याशी साधलेला हा संवाद**

संजय मिरिकन

**या परिषदेत महाराष्ट्राचे मार्केटिंग करताना कोणत्या प्रमुख बाबी मांडल्या.**

या परिषदेत विकसित आणि विकसनशिल देशाचे राजकीय प्रमुख, जगविख्यात उद्योजक भूमिका मांडतात. पण, महाराष्ट्राच्या शिष्टमंडळाने तीन दिवसांत तब्बल ३८ शिष्टमंडळाच्या सोबत बैठका घेतल्या. यामध्ये, अनेक मोठ्या देशाचे राजकीय नेते, आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्योग यांचा समावेश होता. विशेष म्हणजे या बैठका द्विपक्षीय झाल्या. यातून अनेक बाबी स्पष्ट झाल्या. काही सूचना समोर आल्या. तर काही तक्रारी आणि कायद्यातल्या अडचणींवर चर्चा झाली. त्यातूनच 'मेक इन महाराष्ट्र'च्या संकल्पनेला आधार मिळाला. दिशा मिळाली. महाराष्ट्राची क्षमता, व्याप्ती आणि तंत्रकुशल मनुष्यबळ याबाबत जगातल्या सर्वच उद्योगांत समाधान आहे. महाराष्ट्रात येण्यासाठी त्यांच्यात स्पर्धा आहे. प्रचंड मोठी गुंतवणूक करण्याची त्यांची तयारी आहे.

**नेमक्या कोणत्या समस्यांवर जगातल्या उद्योजकांनी अधिक भर दिला.**

महाराष्ट्राच्या उद्योग धोरणात सातत्य आणि शाश्वती असली पाहिजे अशी अपेक्षा जगाची आहे. राज्यात उद्योगांना पोषक वातावरण आहे. पण, काही बाबतीत निश्चित आणि दूरगामी परिणाम करणारे बदल व्हावेत असे त्यांना वाटते. उदाहरणार्थ महाराष्ट्रातल्या जमिनीच्या किंमती, वीजबिल, परवानगी देण्याची जाचक प्रक्रिया यामध्ये आमूलाग्र बदल अपेक्षित आहेत. राज्यात अनेक ठिकाणी जमिनीच्या किमती कमालीने वाढलेल्या आहेत. तर, उद्योगांना पुरवण्यात येणाऱ्या वीजबिलाचा आकार जगातल्या काही राष्ट्रातील वीजबिलापेक्षा अधिक आहे. उद्योगांना हे वीजबिल परवडणारे नाही. यामध्ये सरकारने ठोस धोरण घ्यावे, असे जगातल्या उद्योगांना वाटते. त्यावर उपाययोजनाही आता सुरू केल्या आहेत.

महाष्ट्रात उद्योग उभारताना विविध प्रकारचे ७० परवाने लागतात. त्यासाठी अनेक ठिकाणी उद्योजकांना चकरा माराव्या लागतात. त्यामुळे वेळ लागतो. त्यावर उपाय म्हणून कॉमन ॲप्लिकेशन फॉर्म असावा. एकाच ठिकाणी या परवानग्या मिळण्याची सुविधा असावी. त्यासाठी कालबद्ध मर्यादा राहील याकडे सरकारने विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे जगातील उद्योजकांना वाटते. या सर्व जागतिक उद्योजकांना मुंबईबाबत प्रचंड आकर्षण आणि उत्सुकता आहे. पण, मुंबईची मर्यादा त्यावर परिणाम करत असल्याची खंतदेखील आहे.

देशविदेशातील उद्योजकांना मुंबई महापालिकेचे कायदे जाचक ठरत आहेत.

मुंबईत उद्योग व्यवसायाच्या उभारणीसाठी आवश्यक बांधकाम परवाने मिळण्यास किमान १५० दिवसांचा कालावधी लागतो. हा कालावधी ५० ते ६० दिवसापर्यंत कमी करण्याचा सरकारचा विचार आहे. त्यासाठी पालिका कायद्यात बदल करण्याची आवश्यकता असून, आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुंबई महापालिका कायद्यात आवश्यक ते बदल करण्यात येणार आहेत. तसेच उद्योग व्यवसाय वापरासाठी नवीन वीज जोडणी घेताना ७० दिवसांचा कालावधी लागतो. नवीन वीज जोडणी तातडीने मिळावी अशी सूचना सरकारने सर्व वीज कंपन्यांना केली आहे. किमान सात दिवसांत वीज जोडणी मिळेल यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. पण, तूर्तास २१ दिवसांत वीज जोडणी देता येईल यावर वीज कंपन्या आणि सरकारमध्ये समेट झाला आहे. सध्या कायद्यानुसार बांधकाम पूर्णतेचा दाखला आणि ताबा प्रमाणपत्र वेगवेगळ्या प्रकारे दिले जाते. मुळात बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ताबा घेणे हेच अपेक्षित असल्याचे सरकारला वाटते. त्यामुळे, एकाच बाबीसाठी दोन प्रकारे प्रयत्न करण्याची यंत्रणा मोडीत काढण्यात येणार असून, बांधकाम पूर्णतेचा दाखला आणि ताबा प्रमाणपत्र यापुढे एकच राहील.

**या सर्व समस्या दूर करण्यासाठी सरकारने काही उपाययोजना हाती घेतल्या आहेत काय..**

होय, त्यासाठी सरकारने 'मेक इन महाराष्ट्र' या थीमनुसार उद्योगासाठीचे जाचक कायदे, परवानगीची प्रक्रिया यामधे सुलभीकरण आणण्यास सुरुवात केली आहे. परवानगीचा कालावधी कमी करणे, एकाच खिडकीतून उद्योगांना परवाने मिळतील यासाठीची उपाययोजना करण्यात येत आहे. उद्योगांना महाराष्ट्रात येण्यासाठी रेड कार्पेट टाकण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. काही कायद्यात बदल करायचे झाल्यास ते करण्याची तयारी सरकारने ठेवली आहे. मुंबई महापालिका कायद्यातही मोठ्या प्रमाणात बदल करून गुंतवणुकदारांना पोषक वातावरण करण्यात येणार आहे. आगामी दोन महिन्यात यामध्ये आमूलाग्र बदल झालेले दिसतील.

विक्रीकर विभागात व्यापाऱ्यांना व्हल्यू ॲडेड टॅक्स आणि सेल्स टॅक्स याबाबत दोन प्रकारची प्रक्रिया करावी लागते. यामुळे प्रचंड मोठा मनस्ताप आणि वेळ वाया जातो. हे दोन्ही कर भरताना व्यापारी व्यावसायिकांना स्वतंत्रपणे दाखले द्यावे लागतात. प्रक्रिया करावी लागते. याबाबतचे विभागदेखील वेगवेगळे असल्याने यात बदल करण्याची आग्रही मागणी होती. त्यानुसार विक्रीकर विभागात या दोन्ही करभरणा प्रक्रियेसाठी एकत्रित अर्ज (कॉमन ॲप्लिकेशन फॉर्म) असेल.

**पण, या सर्व प्रक्रियेमध्ये सामान्य माणसाला कशाप्रकारे केंद्रस्थानी ठेवण्यात येणार आहे. सामान्य नागरिकांना कोणत्या प्रकारच्या सेवासुविधा देण्यात येणार आहेत...**

जगाच्या उद्योजकांना आकर्षित करत असताना महाराष्ट्राचा सामान्य माणूस या प्रक्रियेचा केंद्रबिंदू राहणार आहे. सरकारने सुरुवातीलाच सेवा हमी कायदा करून सामान्य नागरिकांना सेवा मिळतील याची हमी दिली आहे. यामध्ये दिडशे प्रकारच्या योजना आणि सेवा निवडण्यात आल्या आहेत. कोणत्याही नागरिकाला या सेवापासून वंचित ठेवणाऱ्या अधिकाऱ्याला दोषी धरण्यात येणार आहे. प्रत्येक नागरिकाला स्वत:ची समस्या, तक्रार सरकारकडे नोंदवता यावी यासाठी 'आपलं सरकार' हे पोर्टल सुरू झाले आहे. या पोर्टलला राज्यभरातून प्रचंड मोठा प्रतिसाद मिळत आहे. केंद्र सरकारच्या मदतीची वाट न पाहता नैसर्गिक आपत्तीतल्या शेतकऱ्यांना ४ हजार कोटी रुपयांचे वाटप सुरू आहे. तब्बल ७० लाख बाधित शेतकऱ्यांना थेट मदत देण्यात येत आहे. पहिल्या वर्षातच ५ हजार गावांत जलयुक्त शिवार अभियान हाती घेण्यात आले आहे.

अर्थात, जगात महाराष्ट्राचे नाव आहे. कौतुक आहे. आकर्षण आहे. महाराष्ट्राचे हे वैभव अधिक वाढावे. महाराष्ट्र सक्षम आणि स्वयंपूर्ण राज्य व्हावे यासाठी सरकारचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. जगभरातील उद्योगांना महाराष्ट्राची क्षमता लक्षात आलेली असून, आगामी काळात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होईल, असा मला विश्वास वाटतो.

(लेखक हे दै. सकाळचे मुंबईतील प्रतिनिधी आहेत.)
**संपर्क :** ०९८७०१०८४४७



## दाव्होस जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राचे महत्त्व

दाव्होस येथील जागतिक आर्थिक परिषदेस उपस्थित राहण्याची मला पहिल्यांदाच संधी मिळाली. जग झपाट्याने बदलत आहे. तसा जगाचा भारताकडे आणि विशेषत: महाराष्ट्राकडे पाहण्याचा दृष्टिकोनही झपाट्याने बदलत आहे. महाराष्ट्राबाबत जगातल्या अनेक बड्या राष्ट्रातील राजकीय नेते, उद्योजकांना प्रचंड आकर्षण असल्याचे जाणवले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या परिषदेतले सर्वात तरुण राजकीय नेते होते. त्यामुळे, त्यांच्या भूमिकेबाबत सर्वच देशाचे प्रतिनिधी कमालीचे उत्सुक होते. त्यांना हा युवा नेता काय सांगतो, महाराष्ट्राकडे कशाप्रकारे आकर्षित करतो याबाबतचे कुतूहल होते. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राचे औद्योगिक वातावरण याबाबत जगातल्या नेत्यांना आणि उद्योगांना प्रचंड विश्वास होता.

## ऑनलाइन शॉपिंगसाठी

# लॉजिस्टिक हब

ऑनलाईन शॉपिंगच्या माध्यमातून जगभरात मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होत असते. मात्र वस्तूंची डिलिव्हरी देण्यासाठी शहरातील अंतरामुळे खर्च वाढतो. नागपूर हे देशाच्या मध्यवर्ती भागात असल्यामुळे नागपूर येथून वस्तूंची डिलिव्हरी देण्याला जास्त खर्च येत नाही. ही बाब लक्षात घेऊन इंटरनेटच्या माध्यमातून होणाऱ्या ऑनलाईन शॉपिंगच्या व्यापारासाठी नागपूर येथे लॉजिस्टिक हब उभारण्यात येईल. देशाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या नागपूर येथून या माध्यमातून कंपन्यांना ग्राहकांपर्यंत वस्तू पाठविणे सोईचे होईल. या हबमुळे विदर्भात रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण होतील. ही बाब लक्षात घेऊन असून युवकांनी कौशल्य प्रशिक्षणावर फोकस करण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. विदर्भ फॉर्च्युन फॉऊंडेशन तर्फे आयोजित युथ एम्पॉवरमेंट शिबिरामध्ये मुख्यमंत्री बोलत होते. केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

विदर्भातील तरुणांना उद्योग व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मानकापूर स्पोर्ट्स स्टेडियम येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. रोजगारासाठी केवळ शिक्षण आवश्यक नसून शिक्षणातून किती कौशल्य प्राप्त झाले हे महत्त्वाचे आहे. शासनाने सर्व अभ्यासक्रमात कौशल्यावर आधारित प्रशिक्षणाचा अंतर्भाव करण्याचा निर्णय घेतला आहे. उद्योगांची खरी मागणी कौशल्य प्रशिक्षित युवक असून यामुळे हवा असलेला प्रशिक्षित युवक उद्योगांना मिळणार आहे. यासाठी राज्य शासनाने खास कौशल्य विकास मंत्रालयाची स्थापना केली आहे.

### विदर्भात मिनरल बेस्ड इंडस्ट्रीज

विदर्भात मीनरल बेस्ड इंडस्ट्रीज सुरू करण्याचा प्रयत्न शासन करणार असून यातून रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. यासाठी कोका-कोला व नोगा यासारख्या कंपन्यांशी चर्चा झाली आहे. कापूस, धागा व त्यातून कापड इतकीच या उद्योगाची व्याप्ती नसून गार्मेंट आता रोजगाराचे केंद्रबिंदू ठरले आहेत. कापसावर आधारित प्रक्रिया उद्योग व त्यातून रोजगार निर्मिती यासाठी अमरावती जिल्ह्यातील नांदगावपेठ येथे टेक्सटाईल हब उभारण्यात येणार आहे. एनटीसीच्या तीन बंद पडलेल्या कापड गिरण्यांना सरकारने अमरावती येथे सुरू करण्यासाठी परवानगी दिली आहे. नागपूर-अमरावती टेक्सटाईल हब उभे झाल्यास गारमेंटला मोठ्या प्रमाणात मागणी प्राप्त होऊन विदर्भातच रोजगार निर्मिती होईल.

### संरक्षण उत्पादन उद्योग

मिहान येथे डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग उद्योगांना प्रोत्साहित करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. उद्योगांना लागणाऱ्या परवानग्या ७५ वरून २५ वर करण्याचा निर्णय घेतला आहे.

### रोजगाराच्या लाखो संधी

नोकरी मागणारे नाहीत तर नोकरी देणारे व्हावे, असे युवकांना आवाहन करून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, विदर्भात पुढील ५ वर्षात रोजगाराच्या लाखो संधी उपलब्ध होणार आहेत. कृषी प्रक्रिया उद्योग, पर्यटन व्यवसाय, टेक्सटाईल व घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रात विदर्भात प्रचंड वाव आहे. राज्य शासनाने विदर्भात येणाऱ्या उद्योगांना स्वस्त वीज देण्याचा निर्णय घेतल्यामुळे उद्योजक विदर्भात येण्यास उत्सुक आहेत. विदर्भात पर्यटन उद्योगाला खूप मोठी संधी असून यातून २ लाख युवकांना रोजगार






मिळू शकतो.

गडचिरोलीसारख्या ठिकाणी सुरक्षेची हमी दिल्यास ४० हजार कोटी गुंतवणुकीचे उद्योग येऊ शकतात व यातून दहा हजार युवकांना रोजगार मिळू शकतो, असेही ते म्हणाले. या उद्योगांनी स्थानिकांनाच रोजगार द्यावा या अटीवर शासन सुरक्षिततेची हमी घेईल, वर्धा येथे ५०० कोटी गुंतवणुकीचा फ्रूटपार्क येत्या काळात उभारला जाईल असे ते म्हणाले.

मेक इन महाराष्ट्र

**फिडर मॅनेजर**

ऊर्जा खात्यात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी सरकारने पाऊल उचलले असून १५ हजारावर युवकांना फिडर मॅनेजर म्हणून रोजगार देण्याची योजना आखली जात आहेत. बी.ई. इलेक्ट्रिकल आणि बी.ई. मेकॅनिकल युवक-युवतींना परवाने देण्याचा शासन विचार करत असून यातून २५ हजार युवकांना रोजगार मिळणार असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

मिहानला सर्वात स्वस्त वीज मिळणार असल्यामुळे या ठिकाणी उद्योग येण्यास अनुकूल आहेत व त्यातून १ लाख युवकांना मिहानमध्ये रोजगार मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## अमेरिकन शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटले



भारत आणि अमेरिका यात गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे, अमेरिकेतील कंपन्यांना चांगल्या पायाभूत सोयीसुविधा दिल्या जाव्यात तसेच अमरिकेतील गुंतवणूकदारांना 'मेक इन महाराष्ट्र' या संकल्पनेतून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करता यावी म्हणून अमेरिकेचे भारतातील राजदूत रिचर्ड वर्मा यांनी शिष्टमंडळासमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाच्या निदर्शनास आणले की, 'मेक इन महाराष्ट्र' या धोरणांतर्गत राज्यामध्ये औद्यागिक गुंतवणूक करण्यासाठी अनेक देशांनी पुढाकार घेतला आहे.

## उद्योग सुरू करण्यासाठी एमआयडीसीला हवा केवळ एक ई-मेल

महाराष्ट्रात उद्योगांना गुंतवणुकीसाठी अनुकूल असे वातावरण निर्माण झाले असून आता एमआयडीसीला केवळ एक ई-मेल पाठविला तरी आम्ही गुंतवणूकदारांना उद्योग सुरु करण्यासंबंधातील सर्व सहकार्य करणार आहोत. मुंबई येथे एचएसबीसी-गुंतवणूकदार परिषदेत मुख्यमंत्र्यांनी ही माहिती दिली. या परिषदेला देशी तसेच विदेशी गुंतवणूकदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री यावेळी म्हणाले की, पंतप्रधानांनी, 'ईज ऑफ डुईंग बिझनेस'च्या दृष्टिकोनातून देशाचा क्रमांक सुधारावा म्हणून आपले व्हिजन ठेवले असून आम्हीदेखील त्या दृष्टीने प्रयत्न करीत आहोत.

सध्या एमआयडीसीत एखादा उद्योग सुरू करावयाचा असल्यास ७६ मंजुरी घ्याव्या लागतात त्या आम्ही २५ पर्यंत कमी करीत आहोत. मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी कोस्टल महामार्गालादेखील मंजुरी मिळत आहे.

त्याचबरोबर ट्रान्स हार्बर लिंक आणि नवी मुंबई विमातळ देखील मार्गी लागत आहे. नवी मुंबई विमानतळ परिसरातील ६०० स्क्वे.कि.मी. परिसरात नवीन टाऊनशीपदेखील आम्ही उभारत आहोत.

नाशिक त्र्यंबकेश्वर
सिंहस्थ कुंभमेळा
२०१५ - २०१६

# सिंहस्थाची तयारी

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे दर बारा वर्षांनी होणारा सिंहस्थ कुंभमेळा पावित्र्य आणि मांगल्याचा सोहळा आहे. यावेळी श्रद्धा आणि भक्तीचा सुंदर मिलाफ बघायला मिळतो. देशभरातील साधू-महंत कुंभमेळ्यासाठी एकत्र येतात. आध्यात्मिक आणि सांस्कृतिक चर्चेबरोबरच भारतीय संस्कृती आणि परंपरेचे अनेक पैलू कुंभमेळ्यात पाहायला मिळतात. त्यामुळे अभ्यासक आणि पर्यटकांसाठीदेखील कुंभमेळा मोठे आकर्षण आहे.

संस्कृतमध्ये 'कुंभ' शब्दाचा अर्थ 'घट' असा होतो व बऱ्याचदा 'कलश' म्हणून देखील या शब्दाचा वापर होतो. कलश हिंदू संस्कृतीतील पवित्र कार्यातील एक अविभाज्य घटक आहेत. हाच घट कुंभाचे प्रतीक मानला जातो. कुंभमेळा आध्यात्मिक, ज्ञान व संस्कृतीचा संगम आहे. कुंभमेळ्याच्या माध्यमातून एकता, बंधुभाव आणि आध्यात्मिकतेचा मौलिक संदेश दिला जातो. निसर्ग आणि मानवी जीवनाची एकरूपता कुंभमेळ्यात पाहायला मिळते.

अवकाशात भ्रमण करणारे ग्रहतारे व त्यांची विशिष्ट युती याचा ज्योतिषशास्त्रीयदृष्ट्या कुंभमेळ्याशी संबंध आहे. वेदांमध्ये 'सूर्याला' आत्मारूपी अथवा जीवनदायी मानले जाते

**'सिंह राशि गते सूर्ये सिंह राशौ बृहस्पतौ, गोदावर्या भवेत कुम्भो जायते खलु मुक्तिदः'**
**ज्यावेळी गुरूचा सिंहराशीत प्रवेश होतो व सूर्य आणि चंद्र कर्कराशीत प्रवेश करतात त्यावेळेस नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी तीरी सिंहस्थ कुंभमेळा संपन्न होतो.**



'चंद्राला' मनाचा राजा मानले आहे. गुरू ग्रहाला देवांचा गुरू मानले जाते. गुरू ग्रहाला बारा राशींमध्ये भ्रमण करण्यासाठी १२ वर्ष लागतात आणि कुंभमेळादेखील गुरू ग्रहाच्या

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुंभमेळ्यातील सुविधांबाबत साधू-महंतांशी चर्चा करून शासनातर्फे सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे. पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यावर कुंभमेळ्याच्या कामावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनातील विविध विभाग जोमाने कामाला लागले आहेत. मुख्य सचिव, नगरविकास सचिव तसेच नव्याने स्थापन करण्यात आलेल्या केंद्रीय समितीच्या स्तरावरही विकासकामांचा सातत्याने आढावा घेण्यात येत आहे. सोहळा यशस्वी व संस्मरणीय ठरावा यासाठी प्रत्येकाचे प्रयत्न सुरू आहेत.**






विविध राशींमधील प्रवेशानुसार चार ठिकाणी दर १२ वर्षांनी संपन्न होतो.

पौराणिकदृष्ट्या समुद्रमंथनातून प्राप्त झालेला अमृतकलश दानवांच्या हाती लागू नये म्हणून इंद्रपुत्र जयंत बारा दिवस (देवलोकातील बारा वर्ष) पळत होता. त्याने हा कलश नाशिक- त्र्यंबकेश्वर, प्रयाग (अलाहाबाद), हरिद्वार, उज्जैन या चार ठिकाणी ठेवला. या ठिकाणी सूर्य, चंद्र आणि गुरू ग्रहाची विशिष्ट युती होते त्यावेळेस या ठिकाणी कुंभमेळा संपन्न होतो. स्कंदपुराणामध्ये केवळ अमृतकलश ठेवला म्हणून नव्हेतर कलशातून अमृत सांडले म्हणून या चार ठिकाणी कुंभमेळा भरतो, असा उल्लेख आहे. पूर्वी दळणवळणाच्या साधनांच्या मर्यादेमुळे कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या साधू-संत आणि भाविकांची संख्या मर्यादित होती. मात्र अलीकडे सिंहस्थ पर्वात गोदावरीत पवित्र स्नान करण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक या धार्मिक सोहळ्यात सहभागी होतात.

## डॉ. किरण मोघे

कुंभमेळ्याचे व्यापक होणारे स्वरूप पाहता यातील नियोजनही तेवढेच महत्त्वाचे ठरते. जगभरातील अभ्यासक आणि पर्यटकही या सोहळ्यातील आनंद याची देही याची डोळा अनुभवण्यासाठी येत असतात. त्यामुळे कुंभमेळा आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्वच दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. माध्यमांसाठीदेखील कुंभमेळ्याची क्षणचित्रे टिपणे हा वेगळाच अनुभव असतो. भारतात कुंभ सोहळा पवित्र नद्यांच्या तीरावर दर बारा वर्षांनी संपन्न होतो. प्रयाग व हरिद्वार येथे दर सहा वर्षांनी अर्धकुंभ भरण्याची देखील परंपरा आहे. कोणतेही आमंत्रण नसतांना लाखोंच्या संख्येने भाविकांचा सहभाग हे कुंभमेळ्याचे वैशिष्ट्य आहे. साधू-महंत आणि भाविक मोठ्या संख्येने येत असल्याने प्रशासकीय पातळीवरही तेवढ्याच नियोजनबद्ध पद्धतीने तयारी करावी लागते. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे या तयारीची लगबग सर्वत्र पाहायला मिळते आहे. इतर तीन ठिकाणांच्या तुलनेत नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे नदीकिनारी जागा मर्यादित असल्याने प्रशासनाला अत्यंत सूक्ष्म नियोजन करावे लागत आहे.

पुण्यभूमी म्हणून नाशिकचा परिचय आहे. येथील धार्मिक आणि पौराणिक माहात्म्यामुळे वर्षभर भाविकांची वर्दळ सुरू असते. कुंभमेळ्याच्यावेळी पर्वणीतील पवित्र स्नानाबरोबरच धार्मिक पर्यटनही होत असल्याने २००३-०४ मध्ये झालेल्या कुंभमेळ्याच्या तुलनेत यावेळी अधिक भाविक येण्याची शक्यता आहे.

या वर्षी येणाऱ्या साधू-संत आणि भाविकांची संख्या साधारण एक कोटींच्या घरात असण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनातर्फे त्याप्रमाणात सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील विकासाला चालना मिळण्याबरोबरच पर्यटनातही वाढ होते. येणारे भाविक नाशिकसह शेजारील जिल्ह्यातील विविध पर्यटनस्थळांना भेटी देतात. स्वाभाविकपणे पर्यटनक्षेत्रासाठी देखील ही पर्वणी विशेष अशीच ठरते. त्यामुळे अशा स्थळांची माहिती भाविकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्नदेखील यानिमित्ताने करण्यात येत आहेत. ❑ ❑

# नव्या वाटा महिला सक्षमीकरणाच्या



इर्शाद बागवान

**महिलांच्या विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येतात. यामध्ये शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि सुरक्षाविषयक योजनांचा समावेश आहे. या योजनांमुळे महिलांना प्रगतीच्या नव्या वाटा उपलब्ध होत आहेत. ८ मार्चच्या जागतिक महिला दिनानिमित्त विशेष लेख.**

महाराष्ट्र हे देशातील एक अग्रेसर तसेच पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज इत्यादी महापुरुषांनी या राज्यातूनच सामाजिक क्रांतीची सुरुवात केली होती. महिलांच्या शिक्षणाची सुरुवात फुले दांपत्याने पुण्यातून केली. त्यावेळी त्यांना समाजाच्या मोठ्या रोषाला सामोरे जावे लागले होते. पण तरीही सगळ्या प्रकारचा विरोध पत्करून त्यांनी स्त्री शिक्षणाची चळवळ चालू ठेवली. त्याचेच फलस्वरूप म्हणून आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर असल्याचे आपणास दिसते.

स्त्रियांचे राजकीय क्षेत्रातील प्रमाण वाढावे यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांना ५० टक्के आरक्षण दिले आहे. शासकीय नोकऱ्यांमध्ये महिलांना आरक्षण देणारे महाराष्ट्र हे एक अग्रणी राज्य ठरले आहे.



## महिला आणि बालविकास विभाग

आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबामधील १८ ते ४० वर्ष वयोगटातील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्याआधारे त्यांना स्वत:चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविता यावा, यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत महिला प्रशिक्षण केंद्रे चालविण्यात येतात. या प्रशिक्षण केंद्रांमध्ये शिवणकला, टंकलेखन, संगणक, स्क्रिन प्रिंटिंग, हस्तकला, अंगणवाडी, बालवाडी प्रशिक्षण इत्यादी प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येतात. या केंद्रामध्ये प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना दरमहा विद्यावेतनही देण्यात येते.

## महिला जिल्हा सल्लागार समिती

महिलांना आवश्यक तो सल्ला व मार्गदर्शन तसेच आपदग्रस्त महिलांना मदत मिळावी, या दृष्टीने राज्यात विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. हुंडा पद्धतीच्या निर्मूलनासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसमावेशक महिला जिल्हा सल्लागार समिती कार्यरत असते. जिल्हा परिषदेत महिला व बाल कल्याण समिती असून त्या समितीमार्फत महिला व बाल विकासाची विविध कामे करण्यासाठी अनुदान दिले जाते. महिला समुपदेशन केंद्र योजना राज्यात राबवण्यात येते. सध्या राज्यात १०५ समुपदेशन केंद्रे कार्यरत आहेत. महिलांवर होणाऱ्या अत्याचारासाठी कृती दलाची (टास्क फोर्स) स्थापना करण्यात आली आहे.

बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला, बालके व त्यांच्या वारसदारांना आर्थिक मदत व मानसोपचार तज्ज्ञांची सेवा देणे, अशा महिला व बालकांना शारीरिक आणि मानसिक आघातातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न, वित्तीय साहाय्य, समुपदेशन, निवारा, वैद्यकीय व कायदेशीर मदत देणे, या उद्देशाने मनोधैर्य योजना सुरू करण्यात आली आहे. राज्यामध्ये मुलींचे शिक्षण व आरोग्य यामध्ये सुधारणा करणे, बालविवाह रोखणे, मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी आर्थिक तरतूद करणे, बालिका भ्रूणहत्या रोखणे आणि मुलींचा जन्मदर वाढविणे ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सुकन्या योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत आम आदमी विमा योजना व शिक्षा सहयोग योजना या दोन्ही योजनांचा लाभ देण्यात येतो. या योजनेत आता काही किरकोळ फेरबदल करून ही योजना अधिक प्रभावीपणे राबवण्याचा शासनाचा विचार आहे.

## वसतिगृहे

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महाविद्यालयीन विद्यार्थिनी आणि नोकरदार महिलांसाठी अद्ययावत सुविधा असणारी जिजाऊ वसतिगृहे



तालुकास्तरावर बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या महिला आणि बालविकास विभागाच्या सहयोगातून राज्यात ठिकठिकाणी अल्पमुदती निवासगृहे, नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह, स्टेप (महिलांसाठी प्रशिक्षण व रोजगाराकरिता कार्यक्रम), स्वाधार, उज्ज्वला आदी योजना राबवल्या जातात.

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत शहरांमध्ये शिकणाऱ्या अल्पसंख्याक समूहातील मुलींना निवासाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृहे बांधण्यात येत आहेत. यापैकी कोल्हापूर येथील वसतिगृह सुरु झाले असून पनवेल आणि घनसांगवी (जि. जालना) येथे वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. याशिवाय इतर सर्व जिल्ह्यांमध्ये या वसतिगृहांची बांधकामे प्रगतिपथावर आहेत. १८ ठिकाणी बांधकामासाठी जागा उपलब्ध झाली आहे. याशिवाय केंद्र शासनाच्या बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रमातूनही राज्यात परभणी, गंगाखेड (जि. परभणी), वाशिम, मंगरुळपीर (जि. वाशिम), हिंगोली, बसमत (जि. हिंगोली) या ६ ठिकाणी अल्पसंख्याक मुलींसाठी वसतिगृहे बांधण्यात आली आहेत. मागासवर्गीय मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढावे, त्यांचे उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी व्हावे तसेच शहरांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींना निवासाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी राज्यात ठिकठिकाणी जिल्हा तसेच तालुकास्तरावर वसतिगृहे बांधण्यात आली आहेत.

महिला आणि बालविकास विभागामार्फत महिलांची शासकीय वसतिगृहे (राज्यगृहे) कार्यरत आहेत. १६ ते ६० वयोगटातील निराश्रित, परित्यक्ता, घटस्फोटित, कुमारीमाता, लैंगिक अत्याचारित, अनैतिक व्यापारात अडकलेल्या, सामाजिक संकटग्रस्त महिलांना इथे प्रवेश दिला जातो. राज्यामध्ये १८ जिल्ह्यात एकूण २० संस्था कार्यरत आहेत. अशा संकटग्रस्त महिलांना आश्रय देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थामार्फतही आधारगृहे चालविण्यात येतात. या संस्थांमध्ये महिलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकिय मदत, शिक्षण व प्रशिक्षण सुविधा आणि कायदेविषयक सल्ला इ. सेवा पुरविण्यात येतात. या योजनेंतर्गत दरमहा दरडोई अनुदानही दिले जाते.





**'बेटी बचाव बेटी पढाओ' या योजनेचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २२ जानेवारी २०१५ ला केला. या अंतर्गत देशातील १०० जिल्ह्यांची निवड केली आहे. मुलींचे प्रमाण कमी असलेल्या राज्यातील १० जिल्ह्यांचा यात समावेश होतो. यात औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, जालना, जळगाव, अहमदनगर, बुलडाणा, वाशिम, कोल्हापूर आणि सांगली या जिल्ह्यांचा समावेश आहे. या योजनेचा मुख्य उद्देश मुलींचा जन्मोत्सव साजरा करणे आणि शिक्षणाद्वारे त्यांना सक्षम बनवणे, लिंग तपासणीवर प्रतिबंध आणणे, मुलीचा जन्म आणि तिचे जगणे सुरक्षित करणे, हा आहे.**

## शिक्षणाच्या सोयी

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबवण्यात येत असलेल्या आयआयटी आणि पॉलिटेक्निकमधील दुसऱ्या पाळीतील वर्गांमध्ये काही जागा मुलींसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. याशिवाय विविध शिष्यवृत्त्याही मुलींसाठी राखीव आहेत. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक महिलांच्या बचतगटांसाठी कर्ज तसेच मुलींसाठी शैक्षणिक कर्ज योजना राबवली जात आहे.

मागासवर्गीय मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढावे यासाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनाही राबवली जात असून याचा राज्यातील अनेक मुलींना लाभ मिळत आहे. याशिवाय विभागाच्या तसेच विभागांतर्गत कार्यरत असलेल्या विविध महामंडळांच्या इतर योजनांचाही मुलींना मोठ्या प्रमाणात लाभ मिळत आहे.

देवदासी प्रथेला आळा घालण्यासाठी व त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी देवदासींचे जास्त प्रमाण असणाऱ्या ११ जिल्ह्यांमध्ये विविध योजना राबवण्यात येतात.

## सामाजिक न्याय विभाग

अनाथालये, शासकीय महिला वसतिगृहे (राज्यगृहे), संरक्षणगृहे, आधारगृहे, अल्पमुदती निवासगृहे व शासन अनुदानित बालगृहे या योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांमधील निराश्रित मुलींच्या विवाहाकरिता शासनामार्फत साहाय्यक अनुदान देण्यात येते. अनाथ मुलींच्या पुनर्वसनासाठी शासनाने ही योजना सुरू केलेली आहे.

❐ ❐

# आपले सरकार वेबपोर्टलला प्रचंड प्रतिसाद

मुख्यमंत्री कार्यालयाने २६ जानेवारीला जनतेशी मुख्यमंत्री महोदयांच्या थेट संवादाचे माध्यम म्हणून सुरू केलेल्या 'आपले सरकार' या वेबपोर्टलला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या वेबपोर्टलला पहिल्या २१ दिवसांत २३७९ तक्रारी करण्यात आल्या आहेत. सरकारकडून मिळत असलेल्या प्रतिसादामुळे हे वेबपोर्टल शासन आणि जनता यांच्यातील दुहेरी संवादाचे प्रभावी माध्यम ठरत आहे. हळूहळू या वेबपोर्टलच्या वापर हा महाराष्ट्रातील सुशिक्षित नेटसॅव्ही जनता व नव्या तंत्रज्ञानाला प्रतिसाद देणारे प्रशासन याचे दमदार उदाहरण ठरत आहे. सामान्य जनता ते शासकीय अधिकाऱ्यांनीही आपली बाजू मांडण्यासाठी या माध्यमातून मुख्यमंत्र्यांकडे ई-मेल पाठवल्या आहेत. मंत्रालय पातळीवरील तक्रारी करण्यासाठी ही सुविधा सुरू करण्यात आली असली, तरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि जिल्हाधिकारी पातळीवरील तक्रारी मोठ्या प्रमाणावर आलेल्या आहेत. ही यंत्रणा मोठयाप्रमाणात लोकाभिमुख होत असून सरकारच्या गतीमान प्रशासनाची पूर्तता या माध्यमातून केली जात आहे.आतापर्यत या वेबपोर्टलवर महसूल (१९२), शालेय शिक्षण (१४७), उच्च व तंत्रशिक्षण (१३२), नगरविकास (१५९) आणि ग्रामविकास (१३९) या खात्यांबाबतच्या तक्रारींची नोंद झाली आहे. त्यापैकी ५१२ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून ८० टक्के तक्रारदार समाधानी असल्याचा प्रतिसाद मिळाला आहे.

# पर्यटनातून रोजगार निर्मिती



महाराष्ट्रात पर्यटनासाठी पोषक वातावरण आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून पर्यटन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासोबतच रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण करण्यावर भर देणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

गोरेगाव येथे, आऊटबाऊंड ट्रॅव्हल मार्ट आणि ट्रॅव्हल ॲण्ड टूरिझम फेअर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहकार्याने आयोजित पर्यटनविषयक प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्रात पर्यटन विकासासाठी पोषक वातावरण आहे. जागतिक संपत्तीचा दर्जा लाभलेली ठिकाणे महाराष्ट्रात असून नद्या, टेकड्या, किल्ले, वने, बंदरे ही प्रेक्षणीय स्थळे आहेत. पर्यटनवाढीच्या दृष्टीने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून भविष्यात पर्यटनविषयक प्रदर्शने भरविण्यात येतील व पर्यटन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यात येईल.

## तारांकित

### डॉ. प्रभा अत्रे यांना जीवनगौरव पुरस्कार



महाराष्ट्राला कला-संस्कृती आणि बोलीभाषांचा मोठा ठेवा लाभला असून हा ठेवा पुढच्या पिढीपर्यंत पोहचविण्याचे राज्य शासनाचे प्रयत्न आहेत, असे प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी नाशिक येथे केले.

कालिदास सभागृहात राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार २०१४ प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. संगीतमार्तंड पं.जसराज यांच्या हस्ते ज्येष्ठ गायिका डॉ.प्रभा अत्रे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रभाताईंचे संगीत म्हणजे 'ईश्वराचे देणे' आहे, अशा शब्दात पं.जसराज यांनी डॉ.प्रभा अत्रे यांच्या सांगीतिक कारकिर्दीचा गौरव केला. ते म्हणाले, वयाने मोठा असलो तरी संगीत क्षेत्रात प्रभाताईंचे कार्य अधिक मोठे आहे. त्यांच्या स्वरांनी संगीतातील प्रत्येक रसाला स्पर्श केला आहे. पं.जसराज म्हणाले की, राज्य शासनातर्फे शास्त्रीय संगीत क्षेत्राला पुढे नेण्यासाठी चांगले प्रयत्न करण्यात येत असून यामुळे नव्या पिढीला प्रोत्साहन मिळेल. राज्य शासनाच्या प्रयत्नांमुळे इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात संगीत क्षेत्रासाठी अधिक अनुकूल वातावरण असल्याचेही पं. जसराज म्हणाले.

# ग्रामपंचायतींना ब्रॉडबँड

राज्य शासनाने डिजीटल महाराष्ट्राच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. राज्यातील ग्रामपंचायती एनओएफएन योजनेद्वारे उच्च दर्जाच्या ब्रॉडबँडने जोडल्या जाणार आहेत. त्यासाठी आवश्यक ऑप्टीकल फायबर नेटवर्क मोठ्या प्रमाणात उभारण्यासाठी केंद्र, राज्य आणि भारत ब्रॉडबँड नेटवर्क लि. (बीबीएनएल) या तिघांमध्ये त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आलेला आहे.



देशातील जवळजवळ २ लाख ५० हजार ग्रामपंचायतींना ऑप्टीकल फायबर नेटवर्कद्वारे ब्रॉडबँड कनेक्शन उपलब्ध करून देण्यासाठी केंद्राने नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्क योजना सुरू केली आहे. त्याकरिता बीबीएनएल ही कंपनी स्थापन केली आहे. यासाठी कंपनीला नि:शुल्क मार्ग हक्क मिळणार आहे. तसेच प्रशासकीय विभागाच्या मान्यतेची आवश्यकता लागणार नाही.

ही योजना राष्ट्रीय हिताची असल्याने योजनेची अंमलबजावणी योग्य प्रकारे व त्वरित होण्यासाठी वन विभागाचेही आवश्यक ते सहकार्य मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहे.

# शासन राजपत्र ई - गॅझेट स्वरूपात

महाराष्ट्र शासनाची सर्व राजपत्रे १ फेब्रुवारी २०१५ पासून ई-गॅझेट स्वरूपात इंटरनेटवर उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सर्व विभागांना / कार्यालयांना राजपत्र पोस्टाद्वारे पाठविण्याची कार्यपद्धत बंद करण्यात येणार असून १ फेब्रुवारी पासून राजपत्र पोस्टामार्फत पाठविण्यात येणार नाहीत. सर्व विभागांनी / कार्यालयांनी महाराष्ट्र शासनाची राजपत्रे या संचालनालयाच्या या संकेतस्थळावरुन उपलब्ध करून घेता येतील.

# मराठा आरक्षणानुसार झालेले प्रवेश - नियुक्त्या कायम

राज्य शासनाने लागू केलेल्या मराठा आरक्षणानुसार उच्च न्यायालयाच्या स्थगितीपूर्वी झालेले शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश तसेच शासकीय-निमशासकीय सेवेमध्ये झालेली उमेदवारांची निवड कायम ठेवण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. तसेच शासकीय-निमशासकीय सेवेतील रिक्त पदांची भरती करताना मराठा आरक्षणातील १६ टक्के जागा सोडून इतर प्रवर्गातील पदांची भरती करण्यात येणार आहे.

राज्यात ९ जुलै २०१४ पासून शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी म्हणजे मराठा समाजासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले होते. या आरक्षणाला १४ नोव्हेंबर २०१४ रोजी उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. या स्थगितीपूर्वी शैक्षणिक संस्थांमध्ये मराठा आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश कायम राहतील, तसेच शासकीय व निमशासकीय सेवेत या आरक्षणानुसार झालेली नियुक्ती कायम राहील, स्थगिती आदेशापूर्वी या आरक्षणानुसार शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना व शासकीय सेवेत निवड झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही संबंधित विभागांनी करावी, शासकीय आणि निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी नव्याने द्यावयाच्या जाहिरातीमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (मराठा) साठी खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांच्या १६ टक्के जागा सोडून इतर प्रवर्गातील पदे भरली जातील.

## तारांकित ★★★★★

### व्यसन सोडा, आरोग्य जपा

तंबाखू सोडणे हीच आर. आर. पाटील यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे सांगून राज्याचे कामगार व गृहनिर्माण मंत्री प्रकाश महेता यांनी तंबाखू खाणार नाही, असा संकल्प केला.

आर. आर. पाटील अर्थात आबा यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी शोकसभेचे आयोजन केले होते. त्यावेळी महेता यांनी आपला संकल्प जाहीर केला.

यावेळी प्रत्येकाने त्यांच्या सामाजिक, राजकीय कार्याचा गौरवाने उल्लेख केला. आबा यांना तोंडाचा कर्करोग झाला होता. त्यामुळे महाराष्ट्रात तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी घालण्याची मागणी यावेळी



पुढे आली. यावेळी श्री. महेता यांनी आपल्या व्यसनाची जाहीर कबुली देऊन तंबाखूचे व्यसन सोडणार असल्याचे जाहीर केले. आर. आर. यांच्या आवाहनास प्रतिसाद म्हणून मी तंबाखू सोडत आहे, असे ते म्हणाले. त्यांनी आपल्या खिशातील तंबाखूच्या पुड्या आबांच्या फोटोसमोर ठेवत तंबाखू न खाण्याचा संकल्प केला. नव्वदच्या दशकात आम्ही काही आमदार तंबाखू खाणारी टोळी म्हणून ओळखले जायचो. लिलावती हॉस्पिटलमध्ये आबांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी गेलो असता, त्यांनी 'प्रकाश, तू तंबाखू सोड', असे आपणास हातात हात धरून सुचविले. या शोकसभेत आजपासून तंबाखू खाणार नाही, असा संकल्प करतो.

# भ्रष्टाचाराच्या तक्रारीसाठी मोबाईल ॲप्स



भ्रष्टाचाराविरूद्ध जनजागृती करण्यासाठी व लाचखोरीशी संबंधित तक्रारी प्राप्त करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पब्लिक कन्सर्न फॉर गव्हर्नन्स ट्रस्टच्या साहाय्याने मोबाईल ॲप्स तयार केले आहे. त्याचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास ॲन्टी करप्शन ब्यूरोचे महासंचालक प्रवीण दीक्षित, पब्लिक कन्सर्न फॉर गव्हर्नन्स ट्रस्टचे अधिकारी उपस्थित होते.

http://acbmaharashtra.gov.in/ या वेबसाईटवरील होमपेजवरुन हे ॲप्स डाऊनलोड करता येईल. तसेच इंटरनेटची सुविधा असलेल्या मोबाईल, टॅब्लेट, डेस्कटॉप, लॅपटॉप यामध्ये त्याचा सहज वापर करता येईल. या ॲप्समार्फत आलेल्या तक्रारी एसीबी मुख्यालय, संबंधित पोलीस अधीक्षक आणि संबंधित विभाग प्रमुखांना ईमेलद्वारे पाठविल्या जातील.

या ॲप्सद्वारे मोबाईल मार्फत सिंगल क्लिक द्वारे तक्रार नोंदविणे शक्य होणार आहे. हे ॲप्स मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध असून, खोट्या तक्रारी टाळण्यासाठी फक्त मोबाईल क्रमांक आवश्यक ठेवण्यात आला आहे. नमूद ॲप्समध्ये तक्रारदाराकडे पुरावा म्हणून जर कागदपत्रे, फोटो, ऑडीओ, व्हीडीओ फाईल्स उपलब्ध असल्यास ती जोडून पाठविण्याची तसेच नि:शुल्क क्रमांक १०६४ डायल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# गड-किल्ल्यांच्या विकासाला प्राधान्य

केंद्र शासनाच्या पुरातत्त्व विभाग व राज्य शासनाच्या संयुक्त समन्वयाने महाराष्ट्रातील गड - किल्ल्यांच्या पुनर्बांधणी, डागडुजी, ऐतिहासिक इमारतींची दुरुस्ती व विकास करण्याचे नियोजन सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवनेरी गडावर आयोजित शिवजयंती कार्यक्रमात दिली.

शिवजयंतीनिमित्त शिवनेरी येथे आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्र्यांसह पुण्याचे पालकमंत्री गिरीश बापट, ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे, जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे, खासदार उदयनराजे भोसले, खासदार शिवाजीराव आढळाराव पाटील, आमदार शरद सोनवणे, आमदार लक्ष्मण जगताप, आमदार विनायकराव मेटे, विभागीय आयुक्त एस. चोक्कलिंगम, जिल्हाधिकारी सौरभ राव आदी उपस्थित होते.

'शिवनेरी गडाचा विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरू असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, गतवर्षी याच दिवशी छत्रपती शिवरायांचा आशीर्वाद घेण्यासाठी आलो होतो.

## तारांकित

### सन्मान डबेवाल्यांचा

घड्याळाच्या काट्यावर मुंबईकर धावत असतात. त्यांना वेळेवर कार्यालयात पोहोचायचे असते. वेळेची कसरत साध्य करणाऱ्या मुंबईकरांना योग्य त्या ठिकाणी आणि ठरलेल्या वेळेवर भोजनासाठी अचूकपणे डबा पोहोचवण्याची किमया आणि तंत्र मुंबईच्या डबेवाल्यांनी गेल्या अनेक दशकात साध्य केले आहे. पाऊसपाणी किंवा कोणत्याही नैसर्गिक संकटाच्या वेळीसुद्धा डबेवाल्यांच्या वेळेचे व्यवस्थापन सहसा कोलमडत नाही. डबेवाल्यांची ही कार्यप्रणाली आणि व्यवस्थापकीय कौशल्य हे सबंध जगाच्या कौतुकाचे विषय झाले आहेत. त्यांचे



व्यवस्थापन कौशल्य समजावून घेण्यासाठी, जगभरातील अनेक व्यवस्थापन शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील विद्यार्थी मुंबईला भेट देतात. त्याचबरोबर या डबेवाल्यांवर पुस्तके, माहितीपट निर्माण झाले आहेत.

अत्यंत गतिमान असणाऱ्या महानगरी मुंबईच्या जीवनातील अविभाज्य भाग बनलेल्या या डबेवाल्यांचा सन्मान करण्यासाठी भारतीय टपाल खात्याने एका विशेष 'पोस्टल कव्हर'चे नुकतेच प्रकाशन केले आहे. या पाकिटावर डबेवाल्यांचे प्रतीकात्मक चित्र असून, डबेवाल्यांच्या कार्याची ओळखही या पाकिटावरील रेखाचित्रातून करून दिली आहे.

# शेअर टॅक्सीमधील समोरील जागा महिलांसाठी राखीव



राज्यातील महिलांचा उचित सन्मान आणि नोकरी कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या महिलाचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी नुकताच धाडसी निर्णय घेतला आहे...तो म्हणजे शेअर टॅक्सीमधील समोरील जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा. मुंबईसारख्या महानगरात व अन्य प्रमुख ठिकाणीही आता महिलांना समोरची जागा देणे बंधनकारक राहणार आहे.देशात व राज्यात महिला प्रवाशांबाबत गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. हे लक्षात घेता महिलांच्या सुरक्षिततेसाठी व त्यांना प्रवासादरम्यान कुठल्याही अडचणींना तोंड द्यावे लागू नये म्हणून शेअर टॅक्सींमध्ये चालकाच्या शेजारील आसन महिलांसाठी राखीव ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतलेला आहे. या योजनेला 'भगिनी सन्मान' नाव देण्यात आले असून नुकतीच याची सुरुवात रावते यांनी केली आहे. या योजनेतील नियम राज्यभरातील सर्व टॅक्सी स्टँडवर लागू करण्यात आले आहेत. या नियमांचे पालन न केल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. एसटी, टॅक्सीमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. त्यासाठी एसटी बस, टॅक्सी कोणत्या ठिकाणी आहे, किती वेगाने धावते व किती कि.मी. चालविली जाते. याची माहिती व नियंत्रण ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जीपीएस प्रणालीचा वापर येत्या सहा महिन्यात करण्यात येणार आहे.

# कापूस तेथे कापड

कापसाची उपलब्धता असणाऱ्या भागात कापड उद्योग उभा राहावा, या विदर्भातील शेतकऱ्यांच्या मागणीला न्याय देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच घेतला आहे. मुंबईतील चार कापड गिरण्यांपैकी तीन अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथे, तर एक गिरणी बार्शी येथे स्थानांतरित करण्याचे निर्देश त्यांनी नुकतेच दिले आहेत.

सहकार, पणन, वस्त्रोद्योग विभाग आणि राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या अधिकाऱ्यांची बैठक मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत झाली. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. या गिरण्यांचे स्थानांतरण व विकास योग्य पद्धतीने व्हावा यासाठी शासनाने एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली असून त्यात वस्त्रोद्योग सचिव, कामगार सचिव, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाचे अधिकारी, मुंबई महापालिकेचे आयुक्त आदींचा समावेश करण्यात आला आहे

कापसाची उपलब्धता, मनुष्यबळ विकास, रोजगार निर्मिती, वाहतूक खर्चात बचत आदी दृष्टिकोनातून कापूस उत्पादक भागात कापड निर्मिती करणाऱ्या गिरण्या असणे उपयुक्त ठरते. त्यामुळे स्थानांतराचा निर्णय घेण्यात आला आहे. या गिरण्यांना वीज, जमीन, पाणी उपलब्ध करून देण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. राज्यातील ९ आजारी गिरण्यांपैकी आठ गिरण्या विदर्भात चालविता येतील किंवा कसे याविषयी सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## तारांकित

### स्वच्छता दूत

मकरंद अनासपुरे यांचे नाव घेतले की आपल्या डोळ्यांसमोर येतो तो एक उत्तम कलाकार, एक संवेदनशील माणूस. आपल्या अभिनयाने मराठी माणसाच्या हृदयावर राज्य करणाऱ्या या अभिनेत्याने स्वच्छतेचा संदेश देत हातात झाडू घेऊन आरोग्याचा मंत्र दिला. 'स्वच्छ भारत' अभियानांतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील गोगलगाव येथे त्यांनी स्वच्छता अभियान राबवले आणि या अभियानात तरुणांनी सहभागी व्हावे यासाठी 'परिवर्तनाच्या वाटेवर गोगलगाव' व 'करू भारत स्वच्छ भाऊ' हे दोन माहितीपट तयार केले. त्यांचे प्रकाशन



राज्यपाल सी.विद्यासागर राव यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री अतिथिगृह येथे करण्यात आले.

अनासपुरे यांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मकरंद अनासपुरे यांच्या सहभागाने गोगलगावात सुरू केलेले स्वच्छता अभियान हे स्वच्छ भारत करण्यासाठी उचललेले पहिले पाऊल आहे. या गावाने केवळ एका महिन्यात स्वच्छता अभियान राबवून परिवर्तन घडवून दाखविले आहे.

# लोकशिक्षणाद्वारे समाजजागृती

**आधुनिक भारताचे महान नेते आणि नेमस्त पक्षाचे अध्वर्यू आणि महात्मा गांधी यांचे गुरू नामदार गोपाळकृष्ण गोखले यांची शंभरावी पुण्यतिथी यंदा आहे. या थोर लोकसेवकाने सनदशीर राजकारणाला महत्त्व दिले. लोकशिक्षणाद्वारे समाजजागृती केली. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.**



गोपाळकृष्ण गोखले यांची नव्या पिढीला ओळखच करून द्यायची झाल्यास महात्मा गांधीजींचे गुरू एवढ्या एका वाक्यात करून देता येईल. गांधीजी गोपाळकृष्ण गोखले यांना केवळ आपले राजकीय गुरूच मानत नाहीत तर त्यांचा उल्लेख 'महात्मा' असा करतात. यावरून गोखले यांचे कार्य किती मोठे आणि दिशादर्शक आहे याची प्रचिती येते. अस्पृश्यता, जातिव्यवस्था निर्मूलन, स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य यासाठी नामदार गोखले यांनी प्रचंड काम केले. तत्कालीन इंग्रजी राजवटीच्या सहायाने त्यांनी समाजसुधारणा आणि राजकीय सुधारणावर भर दिला त्यामुळे त्यांना मवाळवादी नेते म्हटले जाते. १९०२ मध्ये त्यांची मध्यवर्ती कायदेमंडळावर नियुक्ती झाली. भारतीय समाजाचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी अनेक समस्यांना वाचा फोडली. राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण या विषयातील त्यांची मते जाणून घ्यायला इंग्रजी प्रशासकही उत्सुक असत. इंग्रजी राजवटीच्या वाढत्या खर्चाबाबत लॉर्ड वेलबी यांचा आयोग नेमला होता. या आयोगासमोर नामदार गोखले यांनी दिलेली साक्ष जगप्रसिद्ध आहे. आपल्या गाढ अभ्यासातून त्यांनी मांडलेली मते इंग्रजांनाच नव्हे तर जगभरातील अर्थतज्ज्ञांना थक्क करायला लावणारी होती.

नामदार गोखले न्यायमूर्ती महादेव रानडे यांना आपला गुरू मानत. त्यामुळे त्यांच्यावर रानडे यांच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक विचारांचा प्रभाव होता.

देशातील समाजसुधारणांचा वेग वाढावा, देश बलशाली व्हावा आणि कायद्याचे राज्य प्रस्थापित झाल्यानंतर येथे स्वराज्याची उभारणी व्हावी यासाठी युवकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा अशी त्यांची तळमळ होती. त्यातूनच त्यांनी भारत सेवक संघाची अर्थात The Servents Of India Society या संस्थेची १९०५ मध्ये स्थापना केली. गोपाळ गणेश आगरकरांनी सुरू केलेल्या 'सुधारक' या वृत्तपत्रांची जबाबदारीही त्यांनी काही काळ सांभाळली. त्याचबरोबर सार्वजनिक सभा, राष्ट्रसभा, समाचार या वृत्तपत्रांतूनही विपुल लेखन केले. समाजसुधारणांसाठी त्यांचा मोठा आग्रह होता. वंगभंगानंतर मवाळवादी नेत्यांना खूप धक्का बसला पण तरीही नामदार गोखले यांनी राजकीय सुधारणांसाठी ब्रिटिश राज्यकर्त्यांचे मन वळविण्याचे आपले प्रयत्न कायम ठेवले. 'मोर्ले-मिंटो' कायद्याच्या सुधारणेत नामदार गोखले यांचा मोठा सहभाग होता. भारतीय राजकारणातील सनदशीर मार्गाचे नामदार गोखले हे प्रवर्तक होते. त्याचमुळे त्यांना महात्मा गांधीजी गुरू मानत.

लोकमान्य टिळक आणि नामदार गोखले यांच्यात अनेक बाबतीत विचार मतभिन्नता होती. मात्र ध्येय एकच होते. त्याचमुळे क्रॉफर्ड प्रकरणात मामलेदारावरील अन्यायाला नामदार गोखले यांनी सार्वजनिक सभेचे चिटणीस या नात्याने हे प्रकरण उपस्थित केलेल्या लोकमान्य टिळकांनी ते धसास लावले. १८८९ मध्ये मुंबई कॉंग्रेस अधिवेशनात दोघांनाही एकाच उपसूचीवर भाषण केले होते. मात्र यानंतर दोघांचे मार्ग बदलले. संपूर्ण स्वराज्याचा नारा देत टिळक जहाल राजकारणाकडे वळले तर गोखले यांनी लोकशिक्षणाद्वारे समाजजागृती आणि राजकीय सुधारणांसाठी सतत प्रयत्न करून भारतीय समाजासाठी जास्तीत जास्त सवलती मिळवल्या. नेमस्त राजकारणाचे अध्वर्यू असलेल्या गोखले यांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधींनी लिहिले आहे की, देशाचा खरा सेवक हरवला आणि त्यांना आदरांजली वाहायची असेल तर देशाच्या सेवेस सर्वस्वी वाहून घ्या. कोणतेही कार्य हाती घेताना वा एखाद्या धर्मादाय कार्यात प्रमुख म्हणून भाग घेताना नामदार गोखले प्रत्येक कार्य हे मातृभूमीच्या चरणी अर्पित या भावनेने प्रेरित होऊन करत असत. ❐ ❐

# गौरव मराठी भाषेचा

**भारतीय साहित्यक्षेत्रातील 'ज्ञानपीठ' हा सर्वोच्च पुरस्कार यावर्षी प्रसिद्ध मराठी कादंबरीकार प्रा. भालचंद्र नेमाडे यांना जाहीर झाला आहे. हिंदू (२०१०) या कादंबरीसाठी त्यांना हा सन्मान प्रदान केला जाणार आहे. नेमाडे यांना मिळालेला हा पुरस्कार म्हणजे अवघ्या मराठी भाषेचा गौरव आहे.**



**ज्येष्ठ साहित्यिक प्रा. भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार घोषित झाल्यानंतर राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी राजभवनात त्यांचा सत्कार केला.**


## डॉ. प्रमोद मुनघाटे


प्रा. भालचंद्र वनाजी नेमाडे यांचा जन्म दि. २७ मे १९३८ रोजी जळगाव जिल्ह्यातील सांगवी येथे झाला. पुणे व मुंबई येथून भाषाशास्त्र व इंग्रजी विषयातील पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर नेमाडे यांनी अनेक महाविद्यालयात इंग्रजीचे अध्यापन केले. दरम्यान १९७१ मध्ये लंडन येथील स्कूल ऑफ ओरिएंटल ॲण्ड आफ्रिकन स्टडीज या संस्थेत ते प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. अखेरीस ते मुंबई विद्यापीठातून तुलनात्मक साहित्याभ्यासाच्या गुरुदेव टागोर अध्यासनावरून निवृत्त झाले. 'टीकास्वयंवर' या टीकाग्रंथासाठी त्यांना भारतीय साहित्य अकादमीचा १९९१ चा पुरस्कार मिळाला आहे. अलीकडेच कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा २०१३चा जनस्थान पुरस्कारही त्यांना देण्यात आला. नेमाडे यांच्या सर्वांगीण साहित्यसेवेबद्दल भारत सरकारने २०११ मध्ये त्यांचा पद्मश्री देऊ न गौरव केला आहे.

'श्रेष्ठ साहित्यकृती वाचकांच्या जीवनजाणिवेला आवाहन करीत असतात. समाज निद्रिस्त असला तरी लेखक मात्र जागा असतो. जीवनाविषयीचा मूल्यविवेक तो समाजापुढे ठेवतो. ही नेमाडे यांची भूमिका त्यांच्या सर्वच साहित्यकृतींबाबत खरी ठरते.

'कोसला' (१९६३) ही नेमाडे यांची वयाच्या पंचविशीत लिहिलेली कादंबरी अर्धशतकानंतरही कमालीची लोकप्रिय आहे. ज्या काळात मराठी कादंबरी पारंपरिक मध्यमवर्गीय जीवन आणि रंजक लेखनशैलीच्या दृष्टिने साचेबंद झाली होती, त्या काळात 'कोसला'च्या निर्मितीने बंडखोरी करून तरुणांच्या मानसिक कोंडीची वाट मोकळी करून दिली. त्या कादंबरीचा नायक पांडुरंग सांगवीकर हा एक 'प्रति-नायक' आहे. त्याने भारतीय संस्कृती, जीवनशैली आणि अभिरुची यांच्यापुढे निर्माण केलेली आव्हाने आज साठ वर्षानंतरही तशीच आहेत. 'कोसला'नंतर नेमाडे यांच्या 'बिढार'(१९७५), 'जरिला' (१९७७), 'झूल' (१९७९) व 'हूल' या चारही कादंबऱ्यांमध्ये चांगदेव हा नायक आहे. व्यवसायाने प्राध्यापक असलेल्या चांगदेवची तत्कालीन महाराष्ट्रातील शिक्षण, समाजकारण, धार्मिक-प्रादेशिक अस्मिता, साहित्य-कला क्षेत्रातील ढोंगीपणा यावरील निरीक्षणे अत्यंत मार्मिक आहेत.

'मेलडी'(१९७०), व 'देखणी'(१९९१), हे नेमाडे यांचे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. भोवतालच्या रुक्ष व्यवहारी जगात त्यांना एकाकीपणाची जाणीव होते. नेमाडे वास्तवाचे वर्णन करताना रोजच्या वापरातील शब्दांचा वेगळा वापर करतात.

### साहित्यसंपदा

**कादंबरी:** कोसला, बिढार,जरीला, झूल, हिंदू-जगण्याची एक समृद्ध अडगळ

**कविता संग्रह:** देखणी, मेलडी

**समीक्षा:** टीकास्वयंवर, तुकाराम, मुलाखती, साहित्याची भाषा

नेमाडे यांच्या कोसलाने मराठी ललित साहित्यात जशी क्रांती केली, तशीच त्यांच्या टीकालेखांनी मराठी समीक्षेत उलथापालथ केली. साहित्याची भाषा (१९८७) या पुस्तकातून त्यांनी साहित्य व भाषाविज्ञान यांच्यातील अनुबंध यासंदर्भात काही मूलभूत प्रमेयांची मांडणी केली आहे. तर 'टीकास्वयंवर' (१९९०) या समीक्षालेख संग्रहात त्यांनी समकालीन मराठी साहित्य व समीक्षेच्या क्षेत्रातील अनिष्ट प्रवृत्तींचा कठोर रीतीने समाचार घेतला आहे.

नेमाडे यांचा 'तुकाराम' (१९९४) हा साहित्य अकादमीसाठी इंग्रजीमधून लिहिलेला दीर्घलेख आहे. संत तुकारामाचे वैश्विक पातळीवरील अनन्यसाधारणत्व त्यांनी अनेकप्रकारे या लेखात मांडले आहे. थोडक्यात कवी, कादंबरीकार, भाषातज्ज्ञ आणि टीकाकार म्हणून भालचंद्र नेमाडे यांनी मराठी भाषेची अर्धशतकाहूनही अधिक काळ सेवा केली आहे.


**संपर्क :** ०७७०९०१२०७८

श्रद्धांजली

# आठवणीतले आबा




**आर. आर. पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे आणि आबांचे वेगळे नातेबंध निर्माण झाले होते. ग्राम स्वच्छता अभियान, तंटामुक्ती अभियान अशांसारख्या त्यांच्या अभिनव योजनांच्या प्रसिद्धीसाठी महासंचालनालयाने वेगवेगळ्या पद्धतीने जाहिराती आणि प्रसिद्धी मोहीम राबवून या योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यात मोठी भूमिका बजावली. या कामाचे आबांनी नेहमीच कौतुक केले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**

१६ नोव्हेंबर २००६ रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या तत्कालीन महासंचालक मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्या संकल्पनेतून, राज्यातल्या जनतेसाठी संवादाचं एक प्रभावी, परिणामकारक व्यासपीठ 'दिलखुलास संवाद' या कार्यक्रमाच्या रूपाने आकाशवाणीच्या माध्यमातून खुले केले होते. या प्रभावी माध्यमाच्या ५०व्या भागात आबा सहभागी झाले होते. आबा त्यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री होते. ग्रामविकास मंत्री असताना त्यांच्या पुढाकाराने सुरू झालेली संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान ही राज्याची पथदर्शी योजना निर्मलग्राम अभियानाच्या रूपात संपूर्ण देशभरात लागू झाली होती. त्या योजनेतही महाराष्ट्राने आघाडी घेतली होती. राज्याचे हे यश साजरे करण्यासाठी दिलखुलासच्या ५० व्या भागातून या योजनेचे प्रेरणास्थान असलेल्या आर. आर. आबांची मुलाखत प्रसारित करणे फारच औचित्यपूर्ण ठरेल, अशी कल्पना म्हैसकर मॅडमनी मांडली. त्यांनी स्वत:च आंबांशी बोलून मुलाखतीच्या ध्वनिमुद्रणाची वेळही नक्की केली. राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री आर. आर. पाटील दिलखुलास कार्यक्रमात सहभागी होणारे पहिले मंत्री ठरणार होते. ज्येष्ठ निवेदक प्रदीप भिडे यांना ही मुलाखत घेण्यासाठी निश्चित करण्यात आले.

ठरलेल्या वेळी आबांचे आगमन झाले. म्हैसकर मॅडमनी त्यांचे स्वागत करून त्यांना केंद्राधिकाऱ्यांच्या दालनाकडे नेले. आकाशवाणीचे माध्यम अजूनही लोकप्रिय असून आपल्या मतदार संघातले लोक आवर्जून आकाशवाणीवरच्या बातम्या ऐकून त्याबद्दल आपल्याला कळवत असल्याचे, त्यांनी सांगितले.

राज्याचे ग्रामविकास मंत्री असताना त्यांच्या कल्पनेतून साकारलेल्या ज्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाने राज्याच्या ग्रामीण भागात क्रांती घडविली, त्या अभियानाबद्दल पहिला प्रश्न विचारताच आबा खुलले. अगदी 'संत गाडगेबाबा' यांचे नाव या मोहिमेला कसे दिले इथपासून तर स्पर्धेच्या माध्यमातून स्वच्छतेबाबत गावागावात कशी इर्षा जागविली गेली, हा सगळा पट त्यांनी झरझर उलगडून दाखवला. संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा, कार्याचा प्रभाव आपल्यावर कॉलेज जीवनापासून कसा पडला आणि त्यांनी ५० वर्षांपूर्वी उक्ती- कृतीतून दिलेल्या स्वच्छतेच्या संदेशापासून प्रेरणा घेऊन आपण त्यांचेच नाव मोहिमेला देत सामान्य जनतेला त्याच्याशी कसे जोडून घेतले, हे अगदी सविस्तर सांगितले. आबांची 'साधी राहणी , उच्च विचारसरणी' या आचरणाचे बीज या संत विचारांतून होते हे जाणवले.

पहिल्या दोन प्रश्नातच कार्यक्रमाचा १५ मिनिटांचा अवधी कसा संपला ते कळलेच नाही. तरीही त्यांच्याकडे बोलण्यासारखे खूपच होते.

**राज्याचे माजी गृहमंत्री व सर्वसामान्यांचे लाडके नेते आर. आर. पाटील ऊर्फ आबा यांचे ऐन उमेदीच्या काळात १६ फेब्रुवारी २०१५ला निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल राज्यशासनाने एक दिवसाचा दुखवटा पाळला. आर. आर. पाटील यांच्या निधनाने एक संवेदनशील नेता, उत्कृष्ट संसदपटू आणि सच्चा माणूस आपल्यातून हिरावला गेला आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आबांना श्रद्धांजली वाहिली.**

विशेषत: 'स्वच्छतेकडून समृद्धतेकडे' जाण्याचा 'राजमार्ग' या भावनेतून या अभियानाला मिळालेला प्रशासनाचा व जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद त्यातून 'एक गाव एक गणपती', 'घर दोघांचे' इ. अभियानाचे राज्याच्या ग्रामीण भागावर झालेले दूरगामी परिणाम, जागतिक बँकेसारख्या महत्त्वाच्या संघटनेकडून मिळालेली पोचपावती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या योजनेतून प्रेरणा घेऊन संपूर्ण देशपातळीवर सुरू करण्यात आलेले 'निर्मल भारत अभियान', या संपूर्ण प्रवासाविषयी आबा अगदी तळमळीने, भरभरून बोलत होते. तिथं उपस्थित असलेले सारेच मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते.

मुलाखतीच्या शेवटी प्रदीपजींचा रोख आबांच्या बालपणाकडे, जडणघडणीकडे वळला. ग्रामीण भागात अत्यंत गरिबीत, प्रतिकूल परिस्थितीतल्या आपल्या बालपणाबद्दल बोलताना आबा म्हणाले, गरिबी ही सर्वात वाईट. ती अनेक संकटे निर्माण करते. कॉलेजला मी उपाशीतापाशी जायचो. आयुष्यातले काही दिवस मी रोजगार हमी योजनेवरही काम केले. पण जिद्द-चिकाटी ठेवली तर मार्ग निघतो. आज जे संकटाने नाउमेद होत आहेत, निराशेच्या आहारी जात आहेत, आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहेत, त्यांना मी इतकेच सांगतो की, छोट्या संकटांना घाबरून जाण्याचे कारण नाही. चार-चार दिवस उपाशी राहून पुस्तकांशिवायही शिकता येते. या गोष्टी मी माझ्या जीवनात खऱ्या केल्या आहेत. अनेकांची मदत आणि जिद्द यामुळेच मी इथवर आलोय. कॉलेजमध्ये असताना एका मोर्चात मी केलेले भाषण ऐकून प्राचार्यांनी मला वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्याची सूचना केली. परंतु



स्पर्धेत भाग घेतल्यामुळे जो वेळ जाईल, त्यामुळे 'माझे रोजगार हमीचे काम बुडेल व जेवण चुकेल, मला आर्थिक परिस्थितीमुळे हे शक्य नाही, परवडणारे नाही,' असे मी त्यांना सांगताच त्यांनी माझ्याशी करार केला की, सगळा खर्च कॉलेज करेल, बक्षीस मिळाले तर तुझे तुला. त्याचा फायदा घेत मी अभ्यास करून अनेक स्पर्धांमध्ये भाग घ्यायचो. पहिल्याच स्पर्धेत मला शंभर रुपयाचे बक्षीस मिळाले. रोजगार हमीचे श्रम करण्यापेक्षा स्पर्धेत बक्षीस मिळविणे मला फार सोपे वाटले. मी स्पर्धा जिंकत गेलो. त्यामुळे शिक्षणासाठी लागणारे पैसे मिळत गेले. त्यावेळी सांगलीला आकाशवाणीचे नवे केंद्र झाले होते. तिथे कोणत्याही निमित्ताने भाषण केले की, ५० रुपये मानधन मिळायचे. ७ रुपये रिक्षाला गेले की, ४३ रुपयांची भरघोस मदत मिळायची. अशाप्रकारे वक्तृत्वाचा फायदा मला भावी आयुष्यात 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्काराचा मानकरी होण्यापर्यंत झाला. आबा अतिशय पोटतिडकीने बोलत होते. उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या.

'दिलखुलास'च्या गेल्या आठ वर्षाच्या आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाच्या सात वर्षाच्या वाटचालीत आबांच्या अनेक मुलाखती प्रसारित करण्यात आल्या. परंतु दिलखुलासच्या वाटचालीतली पहिल्याच मंत्र्यांची ही मुलाखत संस्मरणीय ठरली. 'सामान्यातून असामान्य' ठरलेल्या आबांच्या स्मृतींना 'टीम दिलखुलास'चे विनम्र अभिवादन !

*– मीनल जोगळेकर*

## आबा आणि 'पब्लिसिटी'

माहिती व जनसंपर्क विभागातल्या फोटोग्राफरपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांशी आबांचा निकटचा संबंध होता. कार्यक्रम, बैठका, शिष्टमंडळाच्या भेटीसारखे नियमित स्वरूपाचे कार्यक्रम असोत किंवा २६/११ च्या मुंबई हल्ल्यातील अजमल कसाबसारख्या दहशतवाद्याला फाशी दिल्यानंतर घेतलेली पत्रकार परिषद किंवा सागरी सुरक्षेच्या पाहणीचा दौरा असो अशा सर्वच वेळी आबांचे प्राधान्य नेहमी माहिती व जनसंपर्कच्या 'पब्लिसिटी' टीमलाच असायचे.

सरकार लोकहिताचे जे निर्णय घेते ते निर्णय किंवा माहिती बातमीस्वरूपात सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवायची असेल तर इतर वृत्तवाहिन्यांबरोबरच 'दूरदर्शन'लाही बातमी लागली म्हणजे खेड्यापाड्यात, दुर्गम भागात आणि ज्यांच्याकडे उपग्रह वाहिन्या पाहण्याची सुविधा नाही अशांनाही हे निर्णय कळतात, अशी आबांची धारणा होती. त्यामुळेच आबा जेव्हा गृहमंत्री होते तेव्हा त्यांच्याकडे होणाऱ्या बैठका, महत्त्वपूर्ण कार्यक्रमांच्या वेळी 'पब्लिसिटी'च्या कॅमेरामनबद्दल हमखास विचारायचे. आबा त्यांच्या दालनातील, निवासस्थानातील संगणकावर जसा वेळ मिळेल तसे 'महान्यूज' वेबपोर्टल आवर्जून पाहायचे. आबांच्या दृष्टिकोनातून 'लोकराज्य'चे संदर्भमूल्य मोठे होते. सार्वजनिक सभा, शेतकरी-कार्यकर्ता मेळावे यामध्ये भाषणासाठी लागणारे संदर्भ, योजनांची माहिती किंवा आकडेवारी 'लोकराज्य'मधूनच घ्यावी असा त्यांचा आग्रह असायचा. गडचिरोलीचे

पालकमंत्री म्हणून काम करताना त्यांनी नागपूरच्या नक्षलविरोधी अभियानाच्या अखत्यारीत विशेष माहिती व जनसंपर्क कक्ष कार्यान्वित केला. आकाशवाणी, दूरदर्शन, वेब, प्रिंट अशा मल्टिमीडिया क्षेत्रात 'पब्लिसिटी'चे काम सुरू असल्याबद्दल आबांना समाधान वाटायचे, म्हणूनच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम असेल किंवा रस्ता सुरक्षा अभियानासारखे कार्यक्रम असतील, आबांनी प्रत्येकवेळी माहिती व जनसंपर्क विभागाला त्यात सहभागी करून घेतले.

***– किशोर गांगुर्डे***

## संवेदनशील आबा

गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री असताना आबांच्या संवेदनशील मनाचा असंख्य वेळा प्रत्यय आला. आत्मसमर्पित नक्षल जोडप्यांचा सत्कार व साहित्य वाटप कार्यक्रमाला आबा उपस्थित होते. या कार्यक्रमाचा सगळा नूरच भावनिक होता. आबांनी आपल्या भाषणात आत्मसमर्पित जोडप्यांना माणूस म्हणून वागविण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमानंतर आबा व पोलीस अधीक्षक यांच्यातील संवाद त्यांच्यातील हळव्या माणसाचा प्रत्यय देणारा होता. ही जोडपी आता मुख्य प्रवाहात आली आहेत. त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागेल पण त्यांना माणूस म्हणून वागविण्याची जबाबदारी आपलीच आहे. आपलेपणा वाटेल अशी वागणूक त्यांना समाजात मिळायला हवी नाहीतर आपण नक्षल चळवळीतच बरे होतो असे त्यांना वाटायला लागेल माणूस म्हणून त्यांचे समाजात स्थान निर्माण करा तरच त्यांना आपला आत्मसमर्पणाचा निर्णय योग्य होता, असे वाटेल, असे ते नेहमी सांगत. हे आबांचे रूप मला अतिशय भावले. कर्तव्यदक्ष नेता ते हळवा माणूस त्यांच्यात मला पाहायला मिळाला.

***– रवी गिते***

## आबांचा स्नेह

जिल्हा माहिती अधिकाऱ्यांना एकाच वेळी शासन, पत्रकार-प्रसारमाध्यमे आणि जनता यांच्याशी निरपेक्ष संपर्क ठेवावा लागतो. त्याला तिन्ही घटकातील महत्त्वाचा दुवा म्हणूनही आपले अस्तित्व जपावे लागते. आर. आर. पाटील यांच्यासारखे मंत्रिमहोदय असल्यावर ही जबाबदारी डोक्यावरचे ओझे आणि तारेवरची कसरत न वाटता सामाजिक बांधिलकीचे भान देणारीही असते.

२००४ मध्ये सांगली जिल्ह्यात भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळी शासनाने दुष्काळ निवारणासाठी उपाययोजना हाती घेतल्या होत्या. पण इथल्या गंभीर दुष्काळाची परिस्थिती वृत्तपत्रे व प्रसार माध्यमातून केंद्रापर्यंत पोहोचावीत, यासाठी आबांनी मला बोलावून घेतले. दुष्काळ निवारणासाठी शासन





करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती येथे मोठ्या प्रमाणात येत आहे. पण याच बातम्या आता देश पातळीवरही येऊ देत आणि हे काम तुम्ही करू शकता असा विश्वास वाटतो अशी सूचक भावना आबांनी व्यक्त केली. इतका आत्मविश्वास त्यांना जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या प्रती वाटत होता.

जिल्ह्यातील दुष्काळ निवारणासाठी जलसंधारणाची व्यापक मोहीम तत्कालीन जिल्हाधिकारी मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी सर्व यंत्रणांच्या सहकार्यातून हाती घेतली. दुष्काळ निवारणासाठी जिल्हयात जलसंधारणावर ९५ टक्के निधी खर्च केला हे काम आबांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते, सुदैवाने दुसऱ्याच वर्षी मे महिन्यात निसर्गाची कृपा झाली आणि धो- धो पावसाने दुष्काळी भागात घेतलेले शेततळी, बंधारे पाण्याने तुडुंब भरले. जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. जलसंधारणाचे हे काम राज्यासमोर आणण्यासाठी आबांनी पत्रकारांना गावोगावी घेऊन जाण्याची सूचना मला केली. या दौऱ्यात पत्रकारांसमवेत आबाही सामील झाले.



होता. विशेष म्हणजे आबांच्या अंत्यसंस्काराला अण्णा हजर होते. सभोवती भ्रष्टाचाराने भरलेला माहोल असतानाही आबांनी आपली 'मिस्टर क्लीन' प्रतिमा जपली. सांगली जिल्ह्यातून राज्याच्या राजकारणात दबदबा निर्माण करणारे वसंतदादा व राजारामबापू यांचा एक जमाना होता. ते गेल्यानंतर या जिल्ह्यातील नेतृत्वाने आपला ठसा पुन्हा कायम ठेवला. त्यात आबांचे कर्तृत्व नक्कीच मोठे आहे. विरोधकांनाही आबांच्या विरोधात आरोप करताना फक्त राज्यातील कायदा-सुव्यस्थेशिवाय दुसरा विषय सापडायचा नाही.

राजकीय परंपरा नसताना आबांनी जिल्हा परिषद सदस्य ते उपमुख्यमंत्री अशी घेतलेली झेप राजकीय स्पर्धेतील अनेक नेत्यांना अस्वस्थ करणारी होती. तासगावसारख्या दुष्काळी तालुक्यातील 'अंजनी'चा हा सुत पक्षातील अनेक दिग्गजांना राजकारणात ओव्हरटेक करून गेला...ना घराणेशाही, ना संस्थांचे पाठबळ, ना पैसा. एक अत्यंत फाटका माणूस; पण केवळ परिश्रम, साधेपणा आणि नेत्यांवरील निष्ठा यावर आबांनी आपल्या कारकिर्दीचा वेलू गगनावरी नेला... यात महत्त्वाचे होते ते त्याचे निष्कलंक चारित्र्य..

***– शेखर जोशी***

❐ ❐

प्रशासकीय यंत्रणेने एखादे काम मनापासून केले तर ते किती मोठे होऊ शकते, हे महाराष्ट्राला कळू द्या, असे सूचक बोलही आबांनी व्यक्त केले.

अनेकदा रात्री उशिराही आबांचा फोन येई, बारीकसारीक माहितीही ते माझ्याकडून जाणून घेत. चालू घडामोडींची विचारपूस करून त्यानंतर रात्री या साऱ्यांचा अभ्यास करून दुसऱ्या दिवशी ते आपली भूमिका मांडत असत. या भूमिका मांडताना रात्री झालेल्या संभाषणाचा प्रत्यय मला येत असे. जनता आणि शासन यांच्यातील अंतर कमी होण्यासाठी त्यांनी नेहमी सकारात्मक प्रयत्न केले, त्यासाठी त्यांनी जिल्हा माहिती अधिकाऱ्यांना मध्यवर्ती ठेवले. राज्यकर्ते म्हणून आबांची तळमळ आम्ही अनेकदा अनुभवली, एखाद्या प्रश्नाचा पाठपुरावा करण्याची त्यांची धडपड पाहिली, त्यांचा जनसंपर्क पाहिला, जनतेप्रती असलेले त्यांचे प्रेम अनुभवले, आबा खूप मोठ्या मनाचे होते. त्यांच्या अनेक आठवणी आज दाटून येतात.

***– एस. आर. माने***

## निष्कलंक चारित्र्य

'जन पळभर म्हणतील हाय हाय...' ही भा. रा. तांबेंची कविता मृत्यूवर मार्मिकपणे बोट ठेवताना काळ अनंत आहे आणि जीवन प्रवाही, असे सांगत कोणी गेले तरी जगरहाटी चालूच राहते, असा आशय व्यक्त करते.

कोणत्याही क्षेत्रातील एखादी व्यक्ती गेली, की 'न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली...' असे वाक्य श्रद्धांजली वाहणाऱ्यांच्या तोंडून ऐकून गुळगुळीत झालेले असते. मात्र काहीच माणसं अशी असतात ज्यांची एक्झिट सर्वांसाठी धक्कादायक असते.

आर. आर. पाटील ज्यांना सारा महाराष्ट्र 'आबा' म्हणून ओळखायचा त्यांच्या जाण्याने संपूर्ण राज्यात आबांची पोकळी जाणवेल. आताच्या घडीला राजकारणात राहुन स्वच्छ प्रतिमा जपणे अशक्य नसली तरी अवघड असते, पण आबा कोणत्याही घोटाळ्याशी कधी जोडले गेले नाहीत. म्हणूनच भ्रष्टाचाराविरोधात लढणारे अण्णा हजारे राज्यात फक्त मोजक्याच ज्या चार नेत्यांच्या प्रचाराला जातात, त्यात आबांचा समावेश


**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन तक्ता – ४ नियम ८ वा**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन ठिकाण | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ |
| २) प्रकाशन काल | : मासिक |
| ३) मुद्रकाचे नाव | : चंद्रशेखर ओक |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| ४) प्रकाशकाचे नाव | : चंद्रशेखर ओक |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |
| ५) संपादकाचे नाव | : चंद्रशेखर ओक |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |

मी चंद्रशेखर ओक असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

चंद्रशेखर ओक
मुद्रक व प्रकाशक

श्रद्धांजली

# उरल्या, फक्त.. स्मृती



स्मरत नव्हती. यामुळे मी मनोमन खजीलच झालो होतो. परंतु आबांनी ज्या पद्धतीने मिश्कीलपणे संवाद साधला त्याला तोड नाही.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या भारत निर्माण, राष्ट्र विकासाच्या कार्यक्रमात 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' या संकल्पनेला जो अग्रक्रम दिला आहे तो १५ वर्षापूर्वी महाराष्ट्राच्या या सुपुत्राने जाणला, स्वीकारला, अंगीकारला आणि महाराष्ट्रात रुजवला. द्रष्टा नेता कसा असावा, लोकनेता कसा असावा, याचे आबा म्हणजे मूर्तिमंत उदाहरण.**

'नमस्कार सर, मी सुधीर ठाकरे, आपल्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागात माझी बदली झाली आहे. मी आज सकाळीच विभागात रुजू झालो आहे. कॉल ऑन करायला आलो आहे.' आर. आर. पाटील उर्फ आबा यांना सन २००० साली मी पहिल्यांदा भेटलो तो दिवस मला अजूनही आठवतो. त्यावर आबांच्या स्मरणशक्तीची चुणूक, त्यांच्या माणसे आपलीशी करण्याच्या स्वभावाचा पैलू, संवाद साधण्याची शैली, याचा जो सुखद आणि अविस्मरणीय अनुभव आला तो माझ्या कायम स्मरणात राहीला.

'बसा, तुम्ही सिंधुदुर्गला जिल्हाधिकारी होता ना?'

'जी, सर'

'तुम्हाला, मी आधीपासून ओळखतो. आपली भेट यापूर्वी मी आमदार असताना मंत्रालयातच झाली आहे. त्यावेळी तुम्ही सहकार आणि वस्त्रोद्योग विभागात सहसचिव होतात तेव्हा सावकारी कायद्याच्या सुधारणाच्याबाबत भेटलो होतो आपण. तुम्हाला आठवण आहे?

'सर'. हो आता आठवंल. मला आठवत नाही हे बहुदा आबांनी माझा प्रतिसाद पाहून जाणले असावे.

'आठवले नाही तरी जाऊ द्या. त्यावेळी मी मंत्री नव्हतो. शिवाय विरोधी पक्षाचा आमदार. नाही आठवणार कदाचित. पण तुम्ही केलेली सावकारी कायद्याची बारीक मीमांसा माझ्या ध्यानात आहे बरं कां...'

## सुधीर ठाकरे

अगदी सहज, मिश्कीलपणे त्यांनी साधलेला हा संवाद. पण त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मी वर नमूद केलेले अनेक आयाम व्यक्त झालेत. आबांच्या स्मरणात अनेक वर्षापूर्वीची भेट राहिली, पण ती मला

त्यानंतर १०-१५ दिवसांनी त्यांनी मला बोलावून घेतले आणि त्यांच्या मनातील एका महत्त्वाच्या परंतु तेवढ्याच महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाबाबत चर्चा केली.

ठाकरे साहेब, मी पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्रीही आहे. परंतु माझे ग्रामविकास मंत्री हेच खाते सर्वांना माहीत आहे. महाराष्ट्राच्या जनतेसाठी पाणी पुरवठा आणि स्वच्छतेची गरज किती आहे याची मला कल्पना आहे. त्यातही माझ्या 'पाणी पुरवठा व स्वच्छता' खात्याची चर्चा झालीच तर लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद पदाधिकारी, नगरपालिकेचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी असे सारेच माझ्याशी फक्त पाणी पुरवठ्याबद्दल बोलतात आणि योजनांची मागणी करतात. मी स्वच्छता मंत्रीसुद्धा आहे आणि तो भाग किती महत्त्वाचा आहे याची साधी जाणीवही त्यांना अजिबात नाही असे मला वाटते. मला महाराष्ट्राने स्वच्छता मंत्री

म्हणून जास्त ओळखावे अशी माझी इच्छा आहे. पटतयं तुम्हाला माझे मत? करू या काही ठोस कार्यवाही? आहेत तुमचे काही विचार यासाठी ?

मी स्वच्छतेबाबत इतक्या पोटतिडकीने व अशा अभिनव पद्धतीने विचार करणारी व्यक्ती तोपर्यंत पाहिली नव्हती आणि मी स्वत:हूनही कधी स्वच्छतेचा एवढा महत्त्वाचा विषय म्हणून विचार केला नव्हता. परंतु आबांशी झालेल्या या संवादातून माझ्या मनात त्यांनी स्वच्छतेबाबत जो स्फुल्लींग चेतविला, जागवला व त्यांनी जे मार्गदर्शन केले, जे नेतृत्व दिले, त्यातून जन्माला आले, अखिल महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात स्वच्छतेची एक चळवळ निर्माण करणारे, प्रत्येक गाव आणि गावातल्या प्रत्येकाच्या मनात स्वच्छतेची चेतना निर्माण करणारे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, ज्याची जागतिक बँकेने संपूर्ण जगात ग्रामीण स्वच्छतेसाठीची सर्वात मोठी, अभिनव व लोकाभिमुख चळवळ अशी दखल घेतली. आबांनी या कार्यक्रमाची रूपरेषा तयार करण्यासाठी त्यांच्या एका-एका वाक्यातून ज्या संकल्पना आमच्यासमोर ठेवल्या त्या प्रत्येक वाक्यातून ग्रामीण विकासाच्या त्यांच्या प्रगल्भतेची, आवाक्याची आणि प्रतिभेची जाणीव प्रत्येकाला सहज व्हावी. स्वच्छतेतून समृद्धीकडे हा कार्यक्रमाचा मूळ गाभा असावा, लोकांचा पुढाकार, त्यात शासनाचा सहभाग ही अंमलबजावणीची दिशा असावी, शौचालय हे बांधकाम नव्हे ती एक सवय आहे. शौचालयाची गरज ग्रामस्थांमध्ये बिंबविण्याची भूमिका, हागणदारीमुक्ती या शब्दातूनच प्रत्येक संवेदनशील मनात उघड्यावर शौचास जाण्याच्या पद्धतीबाबत घृणा निर्माण करून समूळ नायनाट करण्याची मनोवृत्ती जागृत करण्याची स्फूर्ती निर्माण झाली.

अशी किती उदाहरणे सांगावीत? अधिकारी, गावकरी, मंत्रिमंडळातले सहकारी, लोकप्रतिनिधी, महिला, पुरुष, लहान-थोर, बालक, युवक, विद्यार्थी यांना आपल्या ओघवत्या, रसाळ व हृदयाला भिडणाऱ्या भाषणशैलीने मंत्रमुग्ध करून स्वच्छता, ग्रामविकास, श्रमदान, लोकसहभाग या कल्पना कृतीत आणण्याची प्रेरणा आबा सहज देत व सर्वांना स्वयंस्फूर्तीने कामाला लावीत. राज्याच्या २८००० ग्रामपंचायतीमधील सुमारे ९५००० वाड्यावस्त्यामधील सरासरी १ कोटी कुटुंबातील, त्या वेळच्या जनगणनेनुसार ५.५० कोटी ग्रामस्थांना स्वच्छतेचा महामंत्र केवळ आबाच देऊ शकले, रुजवू शकले.



संत गाडगेबाबांचे नाव या चळवळीला देताना आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या नावाने गावागावात स्वच्छतेची निकोप स्पर्धा जाहीर करतानाही याच महनीय व्यक्तींचीच नावे का द्यावी? शासनात नेहमी दिसून येणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांची नावे देण्याच्या मानसिकतेला फाटा का द्यावा? यामागील त्यांचे विचारही किती प्रगल्भ व परिपक्व होते याची जाणीव आम्हाला पदोपदी होत होती. कार्यक्रम सर्वांचा, सर्वव्यापी, सर्वस्पर्शी करण्यासाठी, तो एखाद्या राजकीय पक्षाचा न ठरता सर्व स्तरावरून त्यात उत्स्फूर्त आणि व्यापक सहभाग व्हावा म्हणून त्यांनी मंत्रिमंडळात हा विषय मान्यतेसाठी आणला तेव्हा ही भूमिका सर्वांना पटवून ती मान्य करून घेतली.

स्वच्छता अभियान सर्वव्यापी करण्यात त्यांचे मार्गदर्शन मोलाचे असायचे. गावोगावी शेकडो सभा घेवून स्वच्छतेचा संदेश तळागाळापर्यंत पोहोचवला. संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेच्या प्रतीचे प्रत्येक ग्रामपंचायतीला विनामूल्य वाटप करून त्यालाच ग्रामविकासाचे शासकीय परिपत्रक समजून कृती करण्याची त्यांची अभिनव कल्पकता, त्यातूनच संत तुकडोजी महाराज स्वच्छग्राम स्पर्धेचे १०५ निकष ठरविण्याचा निर्णय, त्याप्रमाणे १०० गुणांचे गावाचे परीक्षण असा पारदर्शी, शिस्तबद्ध प्रयोग त्यांच्या प्रशासकीय, व्यवस्थापकीय आणि लोककेंद्रित कौशल्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. पहिल्याच वर्षी केवळ ५ कोटी रुपयांची बक्षिसे प्राप्त करण्यासाठी राज्यातील २८००० ग्रामपंचायतींनी स्वनिधी उभारून, श्रमदान करून, वस्तूदान देऊन जो खर्च केला त्याची किंमत होती ३०० कोटी रुपये.

**लोकांना उद्युक्त केले, त्यांना पुढाकार घेण्याची संधी दिली, त्यांच्यावर नेतृत्वाने विश्वास टाकला तर किती प्रचंड विकास कामे होऊ शकतात याची एक नावीन्यपूर्ण विकास पद्धतच आबांनी शोधून काढली व राबवली. यातूनच पुढे गावातील विकासकामात गावाचा पुढाकार, त्यात शासनाचा सहभाग हे मूळ सूत्र घेऊन यशवंत ग्राम अभियान राबवले. यामध्ये गावाचा १० ते २० टक्के आर्थिक सहभाग व त्याला शासनाचे ८० ते ९० टक्के आर्थिक सहकार्य अशी नवी विकास पद्धत त्यांनी रुजविली, राबवली. त्याला इतका प्रतिसाद मिळाला की शासनाचे ८० टक्के सहभागाचे बजेट पहिल्याच वर्षी तोकडे पडले. त्यावर तोडगा म्हणून त्यांनी लोकांच्या सहभागाची टक्केवारी वाढवून गावागावात विकासासाठी स्पर्धा निर्माण केली. केवळ गावांची स्वच्छता, ग्रामस्थांच्या शरीराची बाह्यस्वच्छता करूनच आबा थांबले नाहीत तर ग्रामस्थांच्या मनाची आणि समाजमनाचीही स्व्च्छता व्हावी, गावातील महसुली, फौजदारी आणि नागरी तंटे-बखेडे गावानेच समन्वयाने निकाली काढावेत, किंबहुना ते मुळात निर्माणच होऊ नयेत यासाठी तंटामुक्त अभियान, त्यात लोकांचा पुढाकार, शासनाचा सहभाग या तत्त्वावर त्यांनी गृहमंत्री असताना सुरू केले.**

अशा या कल्पक, लोकाभिमुख नेतृत्वाला महाराष्ट्र अकाली मुकला. ही पोकळी भरून निघणे कठीण असले तरी अशक्य नाही. मात्र त्यासाठी राज्यातील तरुण नेतृत्वाने त्यांची लोकप्रवण विकासपद्धती महाराष्ट्रात राबवून स्वस्थ, सुखी, समृद्ध महाराष्ट्र निर्माण करण्याची स्फूर्ती घेणे व प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली असेल असे मला वाटते.

(लेखक हे निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)
**संपर्क :** ०९८६९२५९२१८



**निती (नॅशनल इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया) आयोगाची दुसरी बैठक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७ रेसकोर्स येथील निवासस्थानी ८ फेब्रुवारी २०१५ रोजी पार पडली. देशातील विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह, अर्थमंत्री अरूण जेटली, रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, कृषिमंत्री राधामोहन सिंह, रेल्वेमंत्री सुरेश प्रभू व निती आयोगाचे उपाध्यक्ष अरविंद पांगरिया आदी उपस्थित होते. या बैठकीत निती आयोगाच्या कार्यपद्धतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत निती आयोगाच्या कार्यपद्धतीविषयी व राज्यांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले.**

# निती आयोग

# टीम इंडियाची बांधणी

दयानंद कांबळे

देशाच्या समतोल विकासाची राष्ट्रीय संकल्पना साकार करण्यासाठी राज्यांना त्यांच्या स्वत:च्या योजना तयार करू द्याव्यात तसेच या योजनांना निती आयोगाने मान्यता व आर्थिक मदत द्यावी अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत केली. अकराव्या योजनेच्या संक्रमण काळात योजना व योजनेतर ही पद्धत सुरु ठेवावी मात्र परिणाम आधारित दीर्घकालीन धोरणात्मक नियोजनाची पद्धत अस्तित्वात आणावी असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस या बैठकीत म्हणाले, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेत (नरेगा) राज्यांना एकत्रित अनुदान देण्यात यावे तसेच कुशल व अकुशल कामाचे प्रमाण हे राज्यस्तरावर मोजण्यात यावे. केंद्र शासनाने कृषी कर्जाच्या ३५ टक्के निधी कृषी विकासात गुंतवण्याचा निर्णय घ्यावा. नव्याने सुरू झालेली पंतप्रधान कृषी सिंचन योजना ही महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या जलयुक्त शिवार योजनेसारखी असल्याने अधिकाधिक निधी राज्यशासनास देण्यात यावा. सूक्ष्म सिंचनासह कृषी क्षेत्रासाठी सौर ऊर्जा पंपाची योजना विस्तारित करावी व महाराष्ट्राला वार्षिक ५ लाख सौर ऊर्जा पंपासाठी निधी मिळावा, अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निती आयोगाच्या बैठकीत केली.

### मागास भागांना विशेष मदत

मराठवाडा व विदर्भाच्या विकासाबद्दल बोलतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यघटनेत विदर्भ व मराठवाडा या मागास भागाला विशेष स्थान देण्यात आले आहे. या विभागांच्या विकासासाठी विशेष योजना तयार करण्यात याव्यात व वेगळा निधी उपलब्ध करून द्यावा. नमामि गंगेच्या धर्तीवर दक्षिण गंगा असलेल्या गोदावरी नदीकरिता विशेष योजना तयार करण्यात यावी. महाराष्ट्राने देशात प्रथमच गोदावरी खोरे व ३० उपखो-यासाठी एकात्मिक आराखडा तयार केला आहे. त्यास केंद्रशासनाने विशेष मदत करावी.

अर्थव्यवस्थेत झपाट्याने सुधारणा होत असली तरी खासगी क्षेत्राजवळ अद्याप पुरेसे भांडवल उपलब्ध नाही, त्यामुळे रस्ते, रेल्वे सार्वजनिक वाहतूक यामध्ये केंद्र शासनाने गुंतवणूक वाढवावी.

### मुंबईत १ लाख कोटींचे प्रकल्प

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. राज्यसरकार मुंबईत






पायाभूत सुविधा क्षेत्रात १ लाख कोटी रूपयांचे प्रकल्प हाती घेत असुन या प्रकल्पांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी केंद्र शासनाने सर्व प्रकारच्या मान्यता लवकरात लवकर द्याव्यात अशी आग्रही मागणीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निती आयोगाच्या बैठकीत केली.

## तीन उपगटांची स्थापना

केंद्र पुरस्कृत योजनांचा आढावा घेणे, कौशल्य विकास कार्यक्रमास चालना देणे आणि स्वच्छ भारत अभियानाची संरचना यासंबंधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निती आयोगांतर्गत मुख्यमंत्र्यांचा समावेश असलेल्या तीन उपगटांची स्थापना केली.

मुख्यमंत्र्यांचा समावेश असलेले हे उपगट विविध विषयांवर अभ्यास करतील. पहिला उपगट हा ६६ केंद्रपुरस्कृत योजनांचा आढावा घेईल, यामध्ये कोणत्या योजना पुढे सुरू ठेवायच्या, कोणत्या योजना राज्यांना हस्तांतरित करायच्या आणि कोणत्या योजना रद्द करायच्या याचा अभ्यास करणार आहे. दुसरा उपगट हा निती आयोगामार्फत कौशल्य विकासास कशा प्रकारे चालना देता येईल आणि प्रत्येक राज्यात कुशल मनुष्यबळ कसे तयार करता येईल याचा अभ्यास करणार आहे. तिसरा उपगट हा स्वच्छ भारत अभियानाची संरचना कशी असावी याचा अभ्यास करणार आहे.



निती आयोगाच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकारांनी दोन कार्यबल गट स्थापन करण्याचे आवाहनही पंतप्रधानांनी या बैठकीत केले. पहिला कार्यबल गट हा गरिबी निर्मुलनावर कार्य करेल तर दुसरा गट हा राज्यांच्या कृषी विकासावर लक्ष केंद्रीत करेल व राज्यसरकारांना केंद्र सरकार कशा पद्धतीने मदत करू शकते याबाबत कार्य करेल. मुख्यमंत्र्यांच्या पसंतीनुसार या उपगटांचे सदस्य ठरविले जाणार आहेत.

## सफाई कामगारांचे पुनर्वसन

राज्यातील मैला उचलणाऱ्या सफाईकामगारांच्या सुलभ पुनर्वसनासाठी केंद्र शासनाने वाढीव आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राज्याचे सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे यांनी केली आहे. केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या वतीने येथील हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध घालण्याबाबत आणि त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत अधिनियम २०१३ची परिणामकारक अमंलबजावणी करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी आयोजित सर्व राज्यांच्या सामाजिक न्याय मंत्र्यांच्या परिषदेत ते बोलत होते. केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्री थावरचंद गहलोत परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते.

या कायद्याच्या अमंलबजावणीबाबत आपापल्या राज्याच्या सज्जतेबाबत व अडचणींबाबत यावेळी राज्यांच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्र्यांनी आपले विचार मांडले.

महाराष्ट्राच्या वतीने भूमिका मांडताना दिलीप कांबळे म्हणाले, मैला उचलणाऱ्या कामगाराच्या पुनर्वसनासाठी केंद्र सरकार प्रती व्यक्ती ४०,००० रूपये देते ही मदत अल्प असून त्यात भरीव वाढ करण्यात यावी. या कायद्याच्या कलम ३६(१) अन्वये राज्यांना अमंलबजावणीसाठी नियम करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

यानुसार राज्य शासनाने नियम तयार केले असून राज्याच्या विधी व न्याय विभागाने यास मंजुरी दिली असल्याचे त्यांनी सांगितले. या कायद्याची अमंलबजावणी करण्याकरिता जिल्हास्तरीय व उपविभागीय स्तरावर दक्षता समित्या गठीत केल्या असल्याचे श्री. कांबळे यावेळी म्हणाले.

❏ ❏

## नक्षलग्रस्त भागाचा विकास

नक्षलग्रस्त भागातील प्रलंबित रस्ते व रेल्वे प्रकल्पास केंद्र शासनाने साहाय्य करावे, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. नक्षलग्रस्त राज्यांतील प्रलंबित विकास प्रकल्पांच्या आढावा गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी घेतला. या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, छत्तीसगडचे मुख्यमंत्री रमणसिंह, महाराष्ट्राचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, केंद्रीय गृहसचिव एल.सी गोयल तसेच गृह, वित्त, रेल्वे, मानव संसाधन, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, वन विभाग व पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नक्षलग्रस्त भागातील रस्ते, पूल, रेल्वेमार्ग, मोबाईल टॉवर, पोस्ट ऑफिस, बँक, शिक्षण आरोग्य रेडिओ व चित्रवाणी प्रसारण तसेच या प्रकल्पांसाठी लागणाऱ्या पर्यावरणविषयक मंजुरी यासंदर्भातला व्यापक आढावा गृहमंत्र्यांनी घेतला.

या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील नक्षलग्रस्त भागातील विविध समस्या तसेच विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी यासंदर्भात लक्ष वेधले. नक्षलग्रस्त भागातील इंदिरावती पूल आणि १५० कि.मी. अंतराचे रस्ते व रेल्वे प्रकल्पांकडे लक्ष वेधले, या प्रकल्पास केंद्राने साहाय्य करावे, अशी मागणी त्यांनी केली. गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी राज्यांना केंद्र शासनाकडून सर्व प्रकारची मदत तत्काळ मिळेल, तसेच सर्व प्रकारच्या विकासकामांना केंद्र शासनाकडून आवश्यक असणाऱ्या परवानग्या लवकरात लवकर मिळतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांना यावेळी सांगितले. नक्षलग्रस्त भागातील विकास कामांना तसेच योजना राबवताना नियमांमध्ये शिथिलता आणावी, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.



# घारापुरी : आध्यात्मिक आनंदाची अनुभूती

प्रवीण कुलकर्णी

मुंबईपासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या घारापुरी अर्थात एलिफंटा बेटावर कोरलेली लेणी आपल्या प्राचीन संस्कृतीच्या समृद्ध काळाची आठवण करून देतात. मुंबईच्या गेट वे ऑफ इंडियापासून मोटारबोटीने आमचा प्रवास सुरू झाला आणि घारापुरी बेटांचे वेध लागले. अथांग पसरलेला समुद्र आणि त्यातून मार्ग काढत निघालेली बोट. हा बोटिंगचा अनुभवही खूप सुंदर आणि समृद्ध करणारा होता. भारताच्या मुख्य भूमीपासून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या या बेटाचे दर्शन म्हणजे भारताच्या समृद्धीसाठी तप करणाऱ्या योग्यासारखेच भासत होते. येथील लेणी बघण्याअगोदरचा हा बोटिंगचा प्रवासही खूप आनंददायी असतो. बोटीतून बेटावर उतरल्यावर लेण्याच्या पायथ्यापर्यंत पोचण्यासाठी छोट्या रेल्वे गाडीची सोय महाराष्ट्र पर्यटन मंडळातर्फे करण्यात आली आहे. या रेल्वे गाडीचा प्रवास छोट्यांच्या आकर्षणाचा तर आहेच पण मोठ्यांनाही या रेल्वेगाडीत बसण्याचा मोह आवरता येणारा नाही. पायथ्यापासून लेण्यापर्यंत पोहोचण्यासाठी पायऱ्या आहेत. या पायऱ्या ज्यांना चढता येणार नाहीत त्यांच्यासाठी तेथे पालखीची सोयही आहे. पण त्याऐवजी पायऱ्या चढण्यातच खूप मजा येते. दोन्ही बाजूला आता दुकाने असली तरी झाडी आहे आणि त्यावर अनेक माकडे आहेत. ही माकडे थोडी धीट असल्याने माणसांच्या वावराचा त्यांच्यावर परिणाम होत नाही, किंबहुना मर्कटलीला म्हणजे काय याचा अनुभवच येतो. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी लेणी आहेत, पण घारापुरीची शैव लेणी ही अनुपम अशीच आहेत. बेटाची व्याप्ती सात किलोमीटर आहे.

घारापुरी लेणी कोणी व केव्हा कोरली याबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. कालचुरी घराण्याच्या कारकिर्दीत इसवीसनाच्या सहाव्या शतकात ही लेणी कोरली गेली असावीत असा एक मतप्रवाह आहे तर बदामीच्या चालुक्याच्या कारकिर्दीत ही

लेणी कोरली गेली असावीत असा एक मतप्रवाह आहे. वाकाटक व शिलाहार यांच्या काळात ही लेणी कोरली गेली असाही एक मतप्रवाह आहे. फर्ग्युसन या शिल्पशास्त्रज्ञाच्या मते ही लेणी आठव्या शतकात कोरली गेली. येथील लेणी बघणे म्हणजे आपल्याच डोळ्यांचे आपण पारणे फेडण्यासारखे आहे.

### योगीश्वर शिव

सभामंडपात प्रवेश करताच सर्वप्रथम योगीश्वर शिव ही मूर्ती दिसते. शिव पद्मासनात असून कमळावर विराजमान आहेत. शिवाचा चेहरा धीरगंभीर, डोळे मिटलेले व मुद्रा ध्यानस्थ आहे. बरासचा भाग आता भग्नावस्थेत आहे.

मुख्य लेण्यांत प्रवेश करताना डावीकडील भिंतीवर रावणानुग्रहाचा शिल्पपट आहे. शिवपार्वती कैलास पर्वतावर बसलेले आहेत. पाठमोरा रावण कैलास हलवू पहातोय. शिवाच्या डाव्या बाजूस श्रीगणेश, पायाजवळ भृंगी आहे. गण, गंधर्व, अप्सराही आहेत. अर्धनारी नटेश्वर सभामंडपामागील दक्षिण भिंतीमध्ये अर्धनारी नटेश्वर शिल्प आहे. अर्धनारी नटेश्वर म्हणजे शिव व पार्वती यांचा संगम आहे.

**केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी २०१५ च्या अर्थसंकल्पात देशपातळीवरील महत्त्वाच्या पर्यटनस्थळांच्या विकासासाठी आर्थिक तरतूद केली असून त्यात घारापुरीचा समावेश आहे.**

### कल्याणसुंदर मूर्ती

शिव-पार्वती ही जोडी मध्यभागी शिल्पित केली असून, आजूबाजूस ब्रह्मा, विष्णू, पार्वतीपिता हिमालय माता, सेवक, ऋषिमुनी, गंधर्व अप्सरा दिसत आहेत. शिवाच्या हातात पार्वतीचा हात होता पण दुर्दैवाने हे आता तुटलेले आहेत. एकीकडे विवाहाचा आनंद, तर दुसरीकडे विरहाचे दुःख शिल्पपटात उत्कटपणे मांडले आहे.

### महेशमूर्ती

या सर्वात महत्त्वाचे शिल्प म्हणजे महेश त्रिमूर्तीचे. भव्य, दिव्य आणि आपण ज्यासमोर नतमस्तक होतो ते म्हणजे त्रिमूर्तीचे शिल्प. एकाच पाषाणात कोरलेले असे भव्यदिव्य शिल्प संपूर्ण भारतवर्षात सापडणार नाही. या त्रिमूर्तीची एकूण उंची ५.४६ मीटर आहे व रुंदीही तेवढीच. त्रिमूर्तीचा मस्तक व छातीपर्यंतचा भाग शिल्पित करण्यात आला आहे. ज्या कलाकाराने ही मूर्ती निर्माण केली. त्याला नक्कीच त्या नटेश्वराचा वर असला पाहिजे.

पूर्वी ही मूर्ती म्हणजे ब्रह्मा, विष्णू, महेश या तिघांची असल्याचे बहुतेक जणांचे मत होते. मात्र नंतर अनेक संशोधकांनी ही मूर्ती त्रिदेवांची मूर्ती नसून ती शंकराचीच तीन रूपे असल्याचे सप्रमाण सिद्ध केले. डावीकडचे मुख अघोर काळभैरवाचे, मधले तत्पुरुष महादेवाचे, तर उजवीकडील मुख उमा-वासुदेवाचे असा शिल्पाचा अर्थ आहे.

या लेण्यांमधले सर्वात आकर्षणाचे शिल्प म्हणजेच हे त्रिमूर्ती देवाचे शिल्प. या शिल्पाकडे बघितले की लक्षात येते की संपूर्ण चराचर ज्या चेतनेने भारलेले आहे त्या चेतनेचा मूळ स्रोतच जणू मूर्तिकाराने कोरला आहे. हे शिल्प बघून जरी तुम्ही माघारी फिरलात तरी तुम्ही घारापुरीचे पर्यटन पूर्ण केले असे म्हणता येईल. काळाच्या खुणा आपल्या अंगावर मिरवत घारापुरीची लेणी आपला सांस्कृतिक वारसा सांगत आहेत.



# जिद्द आणि परिश्रमाने ध्येय साध्य

**महिलांनी परावलंबी विचार सोडून स्वावलंबी व्हायला हवे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून स्वत:ला सिद्ध करायला हवे. जिद्द आणि परिश्रम करण्याची तयारी असेल तर ध्येय सहज साध्य करता येते असे ठामपणे सांगणाऱ्या नागपूरच्या प्रेरणा देशभ्रतार यांनी केंद्रीय नागरी सेवा परीक्षेत (यूपीएससी) ११३ वा क्रमांक मिळवला. त्या सध्या जालना जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कर्तव्य बजावत आहेत. त्यांच्या यशाचा फार्म्युला त्यांच्याच शब्दात!**



**प्रेरणा देशभ्रतार**

(भा.प्र.से.) रँक ११३

आजघडीला महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत आहेत. मात्र हे प्रमाण अजूनही खूप कमी आहे. जावई श्रीमंत, हुशार, अधिकारी मिळावा असा कल सामान्य पालकांमध्ये असतो. तो बदलायला हवा. मुलींनी स्वत:च्या पायावर उभे राहायला शिकले पाहिजे. स्वत:ला सिद्ध केले पाहिजे. केवळ स्पर्धा परीक्षाच नव्हे तर उद्योग, व्यवसाय आदी क्षेत्रातही महिलांनी स्वत:चा ठसा उमटवायला हवा. शिवाय आपली मुलगी परावलंबी राहू नये यासाठी पालकांनीदेखील विशेष प्रयत्न करायला हवेत. लठ्ठ पगार कमावणारा जावई शोधण्यापेक्षा आपल्या मुलीला अधिकारी बनवावे. स्पर्धा परीक्षा हा उत्तम करिअरचा राजमार्ग आहे. यूपीएससीची तयारी शालेय शिक्षणापासूनच झाली तर पुढे अधिक त्रास होत नाही. या परीक्षेच्या माध्यमातून आपले करिअर व जीवन घडवता येते. शिवाय आपल्या सामाजिक जाणिवांचा कर्तव्य बजावताना समाजाला फायदा करून देता येऊ शकतो. त्यामुळे माझ्या संपर्कात येणाऱ्या महिलांना मी यासाठी वेळोवेळी प्रोत्साहित करायला विसरत नाही.

### टर्निंग पॉइंट

दहावीपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमात झाले. बारावीनंतर सामान्यपणे डॉक्टर वा इंजिनीअरींग हे दोन उत्तम पर्याय मानले जातात. त्यामुळे बारावीनंतर अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळवला. अभियांत्रिकीची पदवी मिळवली. दरम्यान या क्षेत्रात आपण आपल्या क्षमतांना अधिक न्याय देऊ शकणार नाही याची जाणीव अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षाला झाली. यूपीएससीचा विचार मनात घोळत होता. पुणे येथे औद्योगिक प्रशिक्षण घेत असताना चांगल्या पगाराची नोकरी मिळाली होती. परंतु आपल्या क्षमतांचा, सामाजिक जाणिवांचा प्रशासनात अधिक चांगल्या प्रकारे वापर करून जनहित जोपासता येते, सामाजिक ऋणातून काहीसे मुक्त होता येते या विचाराने मनावर गारुड केले. शिवाय वडील हिम्मतराव देशभ्रतार हे आयपीएस असल्याने त्यांचे काम, समाजसेवा, प्रशासन जवळून पाहायला मिळाले होते. प्रशासनात येण्याचा निर्णय पक्का झाला आणि यूपीएससी परीक्षेच्या तयारीला लागले.

### जाणिवा समृद्ध झाल्या

लहानपणापासून मला वाचनाची आवड होती. शालेय जीवनात विविध उपक्रमांमध्ये माझा सक्रिय सहभाग असायचा. एनसीसी आणि एनएसएस हे माझे आवडते उपक्रम. एनसीसीमुळे शिस्त लागली तर एनएसएसमुळे सामाजिक कार्याची आवड निर्माण झाली. त्यामुळे शालेय जीवनापासून सामाजिक जाणिवा समृद्ध होत गेल्या.

**महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे माझ्यासाठीच नव्हे तर सर्व महिलांसाठी सदैव प्रेरणास्थान राहिले आहेत. या महापुरुषांमुळेच स्त्रियांचा सामाजिक दर्जा वाढला. उन्नती झाली. महिलांच्या हक्कांची पाळेमुळे याच महापुरुषांनी भक्कम केली. त्यांच्यामुळे आज महिला प्रत्येक क्षेत्रात सन्मानाने, ताठ मानेने वावरताना दिसत आहेत. त्यामुळे माझ्या यशाचे श्रेयदेखील त्यांनाच जाते. शिवाय आईवडलांनी त्यांच्या अपेक्षा, निर्णय मुळीच लादले नाहीत. त्यांचे प्रोत्साहन मला मिळत गेले.**

### परिश्रमाला पर्याय नाही

केंद्रीय नागरी सेवा परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा आवाका खूप मोठा असल्याने येथे परिश्रमाला पर्याय नाही. भारतीय प्रशासकीय सेवेत येण्याच्या निर्धारानंतर जोमाने स्पर्धा परीक्षेच्या तयारीला सुरुवात केली. भूगोल व मराठी साहित्य हे ऐच्छिक विषय निवडले. पहिल्या प्रयत्नात पूर्व परीक्षेलाच अपयश आले. मात्र हीच यशाची

प्रेरणा

## संकल्पना समजून घ्याव्यात

यूपीएससीचा अभ्यासक्रम खूप मोठा असल्याने या परीक्षेची तयारी करताना सर्वप्रथम संकल्पना समजून घेणे खूप महत्त्वाचे ठरते. विषय समजून घेणे, त्याचे विषण करण्याची आपली क्षमता ओळखायला हवी. किंबहुना ती आपल्यात विकसित करायला हवी. संकल्पना स्पष्ट असल्यास अभ्यासाला योग्य दिशा मिळते. मुद्देसूदपणा अंगी बाळगावा. अभ्यासलेल्या विषयावर चिंतन करावे. निवडलेले विषय काळजीपूर्वक वाचावे. अवतीभवतीच्या तसेच जागतिक घडामोडींवर जागरूकपणे लक्ष ठेवावे. नियमित दर्जेदार वृत्तपत्रे व नियतकालिकांचे वाचन करावे.

पहिली पायरी समजून पुन्हा जिद्दीने अभ्यासाला लागले. विविध लेखकांची पुस्तके वाचली. दुसऱ्या वर्षी पूर्व आणि मुख्य परीक्षा उत्तीर्ण मुलाखतीतही यश आले. परंतु रँकिंगमध्ये कमी पडल्याने आयआरएस (भारतीय राजस्व सेवा) वर समाधान मानावे लागले. यशाने थोडी हुलकावणी दिल्याने पुन्हा त्याच जोमाने अभ्यासाला लागले. कमकुवत बाजू, चुका शोधून त्या दूर केल्या. २०१० मध्ये आयएएस होण्याचे ध्येय सत्यात उतरवले. मला ११३ वा रँकिंग मिळाला.

### मार्गदर्शन

दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या मॉक इंटरव्ह्यूचा बराच फायदा झाला. शिवाय महाराष्ट्र शासनाने यूपीएससीतील मराठी टक्का वाढवण्यासाठी सुरू केलेल्या एसआयएसी व यशदा या संस्थांचे तयारीदरम्यान मोलाचे मार्गदर्शन मिळाले. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामुळे अभ्यासाला दिशा मिळते. आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे अशा केंद्रांवर मार्गदर्शन घेणे उपयुक्त ठरते. मात्र त्यासाठी दिल्लीलाच जावे लागते असे नाही. काहींना मार्गदर्शनाची गरजही पडत नाही. अभ्यासाची दिशा ठरवण्यासाठी मार्गदर्शन आवश्यक असते. मात्र परिश्रम आपल्याला करावेच लागतात. त्याशिवाय चांगल्या रँकिंगची, उत्तीर्ण होण्याची शक्यता नसते. त्यामुळे परिश्रमाला तोड नाही.

### यशाचा फार्म्युला

- यशापयशाचा विचार न करता प्रयत्न करत राहिल्यास यश हमखास मिळते.
- खडतर परिश्रम व योग्य मार्गदर्शन ही यूपीएससी परीक्षेची यशसूत्री आहे.
- विषयाचे आकलन, चिंतन करायला शिकावे.
- दर्जेदार पुस्तके वाचावी.
- अभ्यासात सातत्य ठेवावे. संकल्पना समजून घ्याव्यात. स्वत:च्या नोट्स काढाव्यात.

**शब्दांकन : राजाराम देवकर**

## आत्मविश्वासाने सारे काही साध्य

आपल्या यशाचे रहस्य हे आपल्या आत्मविश्वासात दडलेले असते. या आत्मविश्वासामुळे अशक्य बाबी साध्य होऊ शकतात. नागरी सेवा परीक्षा या अत्यंत स्पर्धात्मक असल्याने व या परीक्षेला लाखो विद्यार्थी बसत असल्याने पहिल्याच प्रयत्नात एखाद्या वेळेस यश मिळणार नाही. पण यामुळे निराश होऊ नये. कारण या परीक्षेसाठी तीन-चार संधी आपणास मिळू शकतात. पहिले अपयश हे यशाची पायरी आहे, असे समजून पुन्हा अभ्यासाला लागावे. आपण पहिल्याच अपयशाने निराश झाल्यास पुढील प्रयत्नांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. ही बाब कायम लक्षात ठेवावी. आपणास पहिल्या प्रयत्नात अपयश आले, याचा अर्थ आपले प्रयत्न कोणत्यातरी टप्प्यावर कमी पडताहेत ही बाब लक्षात घ्यावी. स्वत:च्या कामगिरीचे वस्तुनिष्ठपणे आणि प्रामाणिकपणे विश्लेषण करावे.

आपल्या जमेच्या आणि कमकुवत बाजू लक्षात घेऊन नव्या जोमाने अभ्यासाला लागावे. संकल्पना व्यवस्थित समजून घ्याव्यात. निराश न होता स्वत:वर विश्वास ठेवावा. आत्मविश्वास असेल तर आपण सर्व काही मिळवू शकतो. त्यामुळे कोणत्याही पावलावर हताश होऊ नये. वाचन चौफेर असायला हवे. नामांकित मासिके व वृत्तपत्रे नियमित वाचावी. आवश्यक बाबी टिपून ठेवाव्यात. शक्य असेल तेवढे योग्य मार्गदर्शन घ्यावे. मात्र स्वअध्ययनावर अधिक भर द्यावा. मोठमोठी पुस्तके सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचत बसण्यापेक्षा नेमका आवश्यक आणि महत्त्वपूर्ण भागच अभ्यासावा. यामुळे कमी वेळेत चांगली तयारी होईल. अभ्यासात नेमकेपणा आणावा. स्वत:च्या नोट्स काढाव्यात. परीक्षा जवळ आल्यानंतर उजळणी करताना आपण काढलेल्या नोट्स वाचल्यास कमी वेळेत उजळणी होते आणि परीक्षेचे दडपणही येत नाही.

### प्रश्नपत्रिकांचा सराव

स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांनी निश्चित ध्येय डोळ्यासमोर ठेवून सातत्यपूर्ण प्रयत्न केले तर यश हमखास मिळते. काही महत्त्वपूर्ण बाबी कायम लक्षात ठेवल्या तर या परीक्षेत आपण चांगल्या क्रमांकासह यश मिळवू शकतो. मागील परीक्षांच्या प्रश्नपत्रिका खूप मार्गदर्शक ठरतात. आपण कोठे कमी पडतो, कोणत्या प्रश्नांसाठी आपल्याला अधिक वेळ लागतो, कोणत्या विषयांवर अधिक लक्ष देण्याची गरज आहे याचे आकलन आपल्याला सराव प्रश्नपत्रिका सोडवताना होते. त्यामुळे जास्तीत जास्त सराव प्रश्नपत्रिका सोडवल्यास फायदा होतो.

# स्वाइन फ्लू : घाबरू नका

**इन्फ्लूएन्झा A (H1N1) अर्थात स्वाइन फ्लू या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव देशाबरोबरच महाराष्ट्रातही वेगाने होत आहे. विषाणूजन्य रोग असल्याने याला प्रतिबंधित लस उपलब्ध नाही. त्यामुळे स्वाइन फ्लू होऊ न देणे, झाला तर वेळीच योग्य उपचार घेणे आणि प्रतिकारशक्ती वाढविणे हेच उपाय आहेत. या रोगाविषयी आणि त्याच्या प्रतिबंधाविषयी सांगताहेत महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे संचालक डॉ. सतिश पवार.**



स्वाइन फ्लूचा विषाणू हवेत आठ तास जिवंत राहू शकतो. स्वाइन फ्लू विषाणूबाधित व्यक्तीच्या खोकण्याने किंवा शिंकण्याने हवेत उडणाऱ्या तुषारातील विषाणू धूलिकणावेष्टित स्वरूपात जिवंत राहतात. तसेच हे विषाणू खुर्ची, टेबलसारख्या ठिकाणीही जिवंत राहतात. या विषाणूंचा नाक, डोळे, तोंड यासारख्या घ्राणेंद्रियांशी संपर्क झाल्यास विषाणूंचे संक्रमण होते. डुकराचे मटण खाणे व स्वाइन फ्लू यात काहीच संबंध नाही.

स्वाइनफ्लू हा संसर्गजन्य आजार असून त्याच्या विषाणूंचे तीव्र स्वरूप म्हणजे टॉमी फ्लू होय. स्वाइन फ्लूच्या विषाणूंची लागण झाल्यास १ ते ७ दिवसांतच त्याची लक्षणे दिसू लागतात.

स्वाइन फ्लूची लागण झाल्यापासूनच ४८ तासांत त्या रुग्णाला टॉमी फ्लूची औषधे द्यावी लागतात.

फ्लूच्या विषाणूंच्या लक्षणांच्या वर्णनावरूनच स्वाइन फ्लूच्या A (H1N1) विषाणूचे निदान होते. स्वाइन फ्लूवर सर्वसाधारण फ्लूचेच उपचार केले जातात. डॉक्टरांच्या सल्ल्यावरूनच प्रतिबंधक औषधे दिली जातात.

आजाराचे स्वरूप अधिक तीव्र असेल तर त्याला स्वतंत्र देखरेखीखाली ठेवले जाते. स्वाइन फ्लू या नावाने ओळखला जाणारा हा आजार २००९ मध्ये साथस्वरूपात जगभर पसरला. हिवाळा आणि पावसाळ्यात या रोगाचे रुग्ण प्रामुख्याने आढळतात.




### रोग जंतु विषयक माहिती

इंफ्ल्युएंझा हा आरएनए प्रकारचा विषाणू असून तो जनुकीयदृष्ट्या अत्यंत लवचीक आहे.

### अतिजोखमीच्या व्यक्ती

इन्फ्ल्युएंझा हा आजार कोणत्याही वयोगटातील स्त्रीपुरुषास होऊ शकतो. विशेषकरून खालील व्यक्ती इन्फ्ल्युएंझा संदर्भात अतिजोखमीच्या आहेत.

- ५ वर्षाखालील मुले
- ६५ वर्षावरील प्रौढ व्यक्ती
- पूर्वीचे जुनाट आजार असलेल्या व्यक्ती उदा. दमा, हृदयाचे आजार, मूत्रपिंडाचे विकार, मधुमेह, यकृताचे विकार, रक्त अथवा चेतासंस्थेचे विकार
- औषधे/ आजारामुळे प्रतिकारशक्ती कमी झालेल्या व्यक्ती उदा. स्टेरॉईडस प्रकारातील औषधे दीर्घकाळापासून घेणाऱ्या व्यक्ती अथवा एचआयव्ही बाधित रुग्ण
- गरोदर माता

## लक्षणे

- ताप
- डोकेदुखी
- अंगदुखी
- घसादुखी
- खोकला
- थकवा

# निरामय



**महत्त्वाची काळजी हात वारंवार स्वच्छ साबणाने धुवा.**

■ स्थूल व्यक्ती इत्यादी.

हिवाळा तसेच पावसाळ्यात इन्फ्ल्युएंझाचे रुग्ण वाढताना दिसतात.

### आजारावर परिणाम करणारे घटक

समशीतोष्ण कटिबंधात हा आजार मुख्यत्वे हिवाळ्यात व पावसाळ्यात आढळतो. भारतासारख्या संमिश्र हवामानाच्या देशात या आजाराचे रुग्ण वर्षभर आढळतात. गर्दी,सामाजिक समारंभ, जत्रा यामुळे या आजाराच्या प्रसारास मदत होते. शाळा,वसतिगृहे अशा ठिकाणीही हा आजार वेगाने पसरतो.

### प्रसाराचे माध्यम

इन्फ्ल्युएंझा हा विषाणूमुळे होणारा आजार असून तो मुख्यत्वे हवेवाटे पसरतो. आजारी व्यक्तीच्या शिंकण्या - खोकण्यातून उडणाऱ्या थेंबावाटे या आजाराचे विषाणू एका रुग्णापासून इतर निरोगी व्यक्तीकडे पसरतात.

### अधिशयन कालावधी

१ ते ७ दिवस

लहान मुलांमध्ये उलटी व जुलाब ही लक्षणे ही आढळतात.

### निदान

आर.टी.पी.सीआर. पद्धतीने या आजाराचे निदान करता येते. या साठी रुग्णाच्या घशातील स्त्रावाचा नमुना घेणे आवश्यक असते. महाराष्ट्रात खालील प्रयोगशाळांमध्ये इन्फ्ल्युएंझा निदानाची व्यवस्था आहे.

■ राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था पुणे

■ हाफकिन संशोधन संस्था, मुंबई

■ कस्तुरबा संसर्गजन्य आजार रुग्णालय, मुंबई

### उपचार

या आजारावर ऑसेलटॅमीवीर व झानामीवीर ही औषधे गुणकारी आहेत.

■ **इन्फ्ल्युएंझा लसीकरण**

इन्फ्लयुएंझाकरिता इंजेक्शनद्वारे दयावयाची (Killed Vaccine) आणि नेसल स्प्रे स्वरुपातील (Live attenuated Vaccine) लस उपलब्ध आहे. खालील व्यक्तींनी प्राधान्याने इन्फ्ल्युएंझा लसीकरण करून घेणे आवश्यक आहे.

१. गंभीर स्वाइन फ्लू रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर्स आणि अवैद्यकीय कर्मचारी

२. इन्फ्ल्युएंझा संसर्गाकरिता अतिजोखमीच्या व्यक्ती.

डॉक्टराच्या मार्गदर्शनानुसार लस घेण्यात यावी.

### महाराष्ट्राची स्थिती आणि उपाय

यंदा महाराष्ट्रात स्वाइन फ्लूचे सर्वाधिक रुग्ण नागपूर विभागात आढळले. यंदा नागपूर विभागात थंडी खूप लांबल्यामुळे रोगाचा प्रादूर्भाव वाढला आणि स्वाइन फ्लू संसर्गजन्य असल्याने त्याचा प्रसार वाढला. त्याखालोखाल नाशिक, पुणे, औरंगाबाद, लातूर आणि मुंबईत स्वाइन फ्लूचे रुग्ण आढळले आहेत.

स्वाइन फ्लू रोखण्यासाठी महाराष्ट्र आरोग्य संचालनालयातर्फे अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यात प्रामुख्याने 'आशा' कर्मचाऱ्यापासून तज्ज्ञ डॉक्टरांपर्यंत प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्याचबरोबर औषधांचा साठा करण्यात आला आहे.

स्वाइन फ्लूची लक्षणे दिसल्याक्षणी त्याच्यावर योग्य उपचार करण्यात यावे आणि गंभीर परिस्थितीत आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा रुग्णाला तातडीने उपलब्ध व्हाव्यात यासाठी मोठ्या प्रमाणावर तजवीज करण्यात आली आहे. ॲसेलटॅमीवीर व झानामीवीर औषधांच्या गोळ्या आणि लहान मुलांसाठीचे सिरप सर्वत्र उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सार्वजनिक रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालयांची रुग्णालये येथे मोफत उपचार केले जातात. त्याचबरोबर जर एखाद्या खासगी रुग्णालयाकडे औषधांचा पुरवठा कमी असेल तर तो त्यांना उपलब्ध करून देण्याची तजवीज करण्यात आली आहे. स्वाइन फ्लूसदृश्य लक्षणे दिसताच जर तुम्ही १०८ या क्रमांकावर दूरध्वनी केला तर सरकारी रुग्णवाहिका तातडीने तुमच्या दारात येते आणि आवश्यक ते उपचार केले जातात.

**शब्दांकन - प्रवीण कुलकर्णी**

## अशी घ्या काळजी

**इन्फ्ल्युएंझा A (H1N1) टाळण्यासाठी हे करा**

■ वारंवार साबण व स्वच्छ पाण्याने हात धुवा.

■ पौष्टिक आहार घ्या.

■ लिंबू, आवळा, मोसंबी, संत्री, हिरव्या पालेभाज्या यासारख्या आरोग्यदायी पदार्थांचा आहारात वापर करा.

■ धूम्रपान टाळा,

■ पुरेशी झोप आणि विश्रांती घ्या, भरपूर पाणी प्या.

**इन्फ्ल्युएंझा A (H1N1) टाळण्याकरता हे करू नका:**

■ हस्तांदोलन

■ सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका.

■ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध घेऊ नका.

■ आपल्याला फ्लूसदृश्य लक्षणे असतील तर गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका.

# सन्मान विकास पत्रकारितेचा



लोकशाही यंत्रणा बळकट करण्यासाठी आम्ही राजकीय लोकांनी जसे अधिक जबाबदार होणे आवश्यक आहे, तसेच एक सुदृढ समाज निर्मितीसाठी माध्यमांनीदेखील अधिक जबाबदार व्हावे. त्यासाठी पत्रकारितेतील शाश्वत मूल्यांची जपणूक करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुंबईतील यशवंतराव चव्हाण

**प्रवीण टाके**

प्रतिष्ठानच्या सभागृहात राज्य शासनाच्या लोकमान्य टिळक जीवन गौरव पत्रकारिता पुरस्कार सोहळ्याच्या वितरणप्रसंगी ते बोलत होते. याच वेळी २०११, २०१२, २०१३ या तीन वर्षांचे विविध गटातील पुरस्कार वितरित करण्यात आले.

हा सोहळा तीन ज्येष्ठ संपादकांच्या सत्काराने, ४५ प्रतिभावान पत्रकार व त्यांच्या कुटुंबाच्या सहभागाने कौटुंबिक महामेळा ठरला. राज्यभरातील व मुंबईतील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. यामध्ये उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारांमध्ये ई-माध्यमांसाठी स्वतंत्र पुरस्कार, पत्रकारांच्या सुरक्षा विषयक कायद्यांसाठी प्रयत्न आणि पत्रकारांसाठी पेन्शन योजना सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी व्यासपीठावर संसदीय कार्य मंत्री गिरीश बापट, माहिती व जनसंपर्क विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, महासंचालक चंद्रशेखर ओक, लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार विजेते लक्ष्मणराव जोशी, विजय कुवळेकर, दिनकर रायकर, माहिती व

## ई माध्यमांसाठी स्वतंत्र पुरस्कार

**सध्या सोशल मीडिया आणि ई- माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. त्यामुळे पुढील वर्षाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारांमध्ये ब्लॉग, वेबसाईट तसेच अन्य ई माध्यमांसाठी एक स्वतंत्र पुरस्कार देण्यात येईल. या वर्षापासून पत्रकारिता पुरस्कारासाठी नामनिर्देशनाची सोय करण्यात येईल. याद्वारे एखादा पत्रकार किंवा व्यक्ती अन्य दुसऱ्या पत्रकाराचे पुरस्कारासाठी नामनिर्देशन करू शकेल, असे मुख्यमंत्र्यांनी या कार्यक्रमात घोषित केले. त्यानुसार यासंबंधी शासन निर्णय झाल्यानंतर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार सन २०१४ करिता प्रवेशिका मागविण्यासंबंधी वृत्तपत्रातून घोषणा करण्यात येईल.**

जनसंपर्क विभागाचे वृत्त संचालक शिवाजी मानकर आदी उपस्थित होते.

### शाश्वत मूल्यांची जपणूक महत्त्वाची

मुख्यमंत्री यावेळी म्हणाले की, आपल्याला ज्यांच्या नावाचा पुरस्कार दिला जातो त्यामुळे त्या पुरस्काराची आणि पुरस्कारार्थीची उंची वाढत असते. लोकशाहीला सुदृढ करण्याचे काम माध्यमे करीत असल्याने लोकशाहीमध्ये माध्यमांचे महत्त्व अधोरेखित होते. त्यामुळे जबाबदारीत वाढ होते. हल्लीचा काळ हा बातमी मूल्याचा आहे. मात्र ते करीत असतांना पत्रकारितेतील शाश्वत मूल्यांची जपणूक करणे महत्त्वाचे आहे.

पत्रकार हा कधीच पुरस्कारासाठी काम करीत नसतो. आपल्याला मिळणारे पुरस्कार हे स्वमूल्यमापनासाठी असतात. आपण ज्या मार्गाने वाटचाल करीत आहोत तो मार्ग योग्य आहे हे मिळालेल्या पुरस्काराने शिक्कामोर्तब होते, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पत्रकारितेचे व्रत जोपासताना पत्रकारांच्या सामाजिक सुरक्षेची जबाबदारी महत्त्वाची आहे. त्यासाठी राज्य शासनाने पत्रकारांना पेन्शन योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबत ज्येष्ठ पत्रकारांच्या सुचना विचारात घेऊन एक समग्र योजना तयार करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.



### लोकमान्य टिळक जीवन गौरव २०११

**श्री. लक्ष्मणराव जोशी :** २०११ चे लोकमान्य टिळक पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ संपादक लक्ष्मणराव त्र्यंबकराव जोशी हे सध्या लोकशाही वार्ताचे संपादक आहेत. त्यांनी दै.तरुण भारतमध्ये वार्ताहर पदापासून ते मुख्य संपादक पदापर्यंत (१९६८-१९९८) काम केले आहे. याशिवाय गोमतंक, गोवादूत, मुंबई व जळगाव तरुण भारतमध्येही संपादक म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. ४५ वर्षांचा पत्रकारितेचा त्यांना अनुभव आहे. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते पांचजन्य प्रकाशनाचा पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

### पुरस्काराचे स्वरूप

लोकमान्य टिळक जीवन गौरव पुरस्कारासाठी प्रत्येकी एक लाख रुपयांचा धनादेश, शाल, श्रीफळ, सन्मानपत्र दिले जाते. त्याचबरोबर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारामध्ये बाळशास्त्री जांभेकर पुरस्काराला ५१ हजार रुपये तर अन्य पुरस्कारांना ४१ हजार रुपयांचा धनादेश, मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्र दिले जाते.

### कौटुंबिक महामेळा

पत्रकारांच्या या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे २४ तास आपल्या व्यवसायात

## उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०११

उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०११ बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार (मराठी) बीडच्या दै. झुंजार नेताचे विशेष प्रतिनिधी शेख रिजवान शेख खलील यांना (५१ हजार रुपये); बाबूराव विष्णू पराडकर पुरस्कार (हिंदी) दै.लोकमत समाचारचे, जळगांव प्रतिनिधी मुकेश रामकिशोर शर्मा यांना (४१ हजार रुपये); यशवंतराव चव्हाण पुरस्कार शासकीय गट (मराठी) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई येथील उपसंपादक, इरशाद लतिफ बागवान यांना (४१ हजार रुपये); पु.ल.देशपांडे उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार तरुण भारतचे मुंबई ब्युरो चीफ, नागेश सुदर्शनराव दाचेवार यांना (४१ हजार रुपये); तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार दै.सकाळचे कोल्हापूर येथील वरिष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार भिकाजी ज्ञानू चेचर यांना (४१ हजार रुपये); दादासाहेब पोतनीस पुरस्कार,नाशिक विभाग, दै.लोकसत्ताच्या, नाशिक प्रतिनिधी, चारुशीला कुलकर्णी यांना (५१ हजार रुपये, यापैकी १० हजार रुपये दैनिक गावकरीकडून (पुरस्कृत); अनंतराव भालेराव पुरस्कार, औरंगाबाद विभाग (लातूरसह), दिव्य मराठी, औरंगाबादचे विशेष प्रतिनिधी रवी रामभाऊ गाडेकर यांना (४१ हजार रुपये); आचार्य अत्रे पुरस्कार, मुंबई विभाग, ठाणे येथे महाराष्ट्र टाईम्सच्या वरिष्ठ उपसंपादक अमिता शैलेश बडे यांना (४१ हजार रुपये); नानासाहेब परुळेकर पुरस्कार, पुणे विभाग, गणेश बाळासाहेब कोरे, बातमीदार, दै.सकाळ ॲग्रोवन,(४१ हजार रुपये), शि.म.परांजपे पुरस्कार, कोकण विभाग, दै.लोकमतचे, रत्नागिरी तालुका प्रतिनिधी, शिवाजी नामदेव गोरे (४१ हजार रुपये), ग.गो.जाधव पुरस्कार, कोल्हापूर विभाग, महाराष्ट्र टाईम्सच्या कोल्हापूर प्रतिनिधी जान्हवी आनंद सराटे (४१ हजार रुपये), लोकनायक बापूजी अणे पुरस्कार, अमरावती विभाग, अकोला येथील दै.लोकमतचे वरिष्ठ उपसंपादक, नरेंद्र भीमराव बेलसरे यांना (४१ हजार रुपये), ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार,नागपूर विभाग, दै.लोकमतचे, नागपूर येथील उपसंपादक मिलिंद किर्ती यांना (४१ हजार रुपये).

# उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०१२

बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार (मराठी), दै. दिव्य मराठी, सोलापूर, म.युसूफ अ.रहिम शेख, (५१ हजार रुपये), अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार (इंग्रजी), पुणे येथे दै.सकाळ टाइम्सचे शाश्वत गुप्ता रे, (४१ हजार रुपये), बाबूराव विष्णू पराडकर पुरस्कार (हिंदी), हिंगोली येथील दै.भास्करचे राकेश सुदामाप्रसाद भट्ट, (४१ हजार रुपये), मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार (उर्दू), दै.इन्कलाबचे जमिर अहमद खाँन जलिल अहमद खाँन, (४१ हजार रुपये), यशवंतराव चव्हाण पुरस्कार, शासकीय गट (मराठी)(मा. व ज.), सांगली येथील माहिती अधिकारी, सखाराम माने, (४१ हजार रुपये), पु.ल.देशपांडे उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार, रत्नागिरी येथील टी.व्ही. ९ चे मनोज लेले, (४१ हजार रुपये), तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार, मुंबई येथील दै. प्रहारचे अतुल मळेकर, (४१ हजार रुपये), केकी मूस उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार शासकीय गट (मा.व ज.), पुणे, विभागीय माहिती कार्यालयातील, नितीन सोनवणे (४१ हजार रुपये) दादासाहेब पोतनीस पुरस्कार, नाशिक विभाग, भिलाजी जिरे वार्ताहर, दै. सकाळ, धुळे आणि नवनाथ दिघे, प्रतिनिधी, दै.दिव्य मराठी, अहमदनगर यांना विभागून (५१ हजार रुपये), अनंतराव भालेराव पुरस्कार, औरंगाबाद विभाग (लातूरसह), बीड येथील दै. तरुण भारतचे भास्कर चोपडे (४१ हजार रुपये), आचार्य अत्रे पुरस्कार, मुंबई विभाग, मुंबई येथील येथे दै.लोकमतचे जमीर दाऊद काझी, (४१ हजार रुपये), नानासाहेब परूळेकर पुरस्कार, पुणे विभाग, मोहन मारुती म्हस्कर -पाटील, दै.लोकमत, सातारा यांना (४१ हजार रुपये), शि.म.परांजपे पुरस्कार, कोकण विभाग, तरुण भारत, बेळगाव, रामकृष्ण खांदारे यांना (४१ हजार रुपये), ग.गो.जाधव पुरस्कार, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर येथील दै.ॲग्रोवनचे बातमीदार, राजकुमार चौगुले यांना (४१ हजार रुपये), लोकनायक बापूजी अणे पुरस्कार, अमरावती विभाग, बुलडाणा येथील दै.पुण्यनगरीचे उपसंपादक, सचिन लहाने, (४१ हजार रुपये), ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार, नागपूर विभाग, नागपूर येथील दै.लोकमतचे वरिष्ठ उपसंपादक श्री.चंद्रशेखर बोबडे यांना (४१ हजार रुपये).




असणाऱ्या पत्रकारांच्या कुटुंबाचा सहभाग उल्लेखनीय होता. अनेकांनी हा पुरस्कार सपत्नीक स्वीकारला तर आई-वडील, मुलेदेखील सहभागी झाले होते. संपूर्ण महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी हा एक गेट-टुगेदर कार्यक्रम होता. मुंबईतील मंत्रालय व अन्य बीट सांभाळणारे विविध वृत्तपत्रांचे पत्रकारही यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तर महाराष्ट्राच्या विविध भागांतून अनेक पत्रकारांचे मित्रही या क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी आले होते. यावेळी पत्रकार जान्हवी सराटे यांना मुख्यमंत्र्यांसोबत सेल्फी काढण्याचा मोह आवरता आला नाही.

ख्यातनाम निवेदक प्रदीप भिडे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. त्यांनी शब्दांची कोटी करत 'तरुण पत्रकारांची सेल्फविश' पूर्ण करताना 'मुख्यमंत्री महोदय' असे या क्षणाचे वर्णन केले. त्यांच्या धीरगंभीर आवाजातील निवेदन आणि पुरस्कारप्राप्त पत्रकारांच्या कुटुंबीयांचा उत्साह यामुळे हा सोहळा उत्तरोत्तर रंगतदार ठरला.

### विधायक कामांकडे लक्ष दिले पाहिजे - ल. त्र्यं. जोशी

लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार विजेते ज्येष्ठ संपादक लक्ष्मणराव जोशी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, या पुरस्काराला मिळालेला प्रतिसाद पाहून या पुरस्कार वितरण सोहळ्याचे नामकरण पुरस्कार महोत्सव असे केले तर वावगे ठरणार नाही. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात कुठलीही माहिती लपून राहात नाही. माध्यमांनी शासनाच्या विधायक कामांकडे देखील लक्ष दिले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून ग्रामीण भागातील पत्रकारांनी विकासात्मक पत्रकारितेकडे लक्ष देण्याचे आवाहनही श्री. जोशी यांनी यावेळी केले.

### लोकमान्य टिळक जीवन गौरव २०१२

**श्री. विजय कुवळेकर :** २०१२ चे लोकमान्य टिळक पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ संपादक विजय विश्वनाथ कुवळेकर यांनी मुख्य संपादक सकाळ, संपादक लोकमत, मुंबई तसेच संपादक सकाळ, कोल्हापूर अशी जबाबदारी सांभाळली आहे. ३३ वर्षाहून अधिक काळ पत्रकारितेतला अनुभव असलेले श्री.कुवळेकर यांना जीवनगौरव रत्नदर्पण, बाळशास्त्री जांभेकर, लोकमान्य टिळक, आचार्य अत्रे, कै. सुशीलादेवी देशमुख पुरस्कार मिळाले आहेत.

### मराठी भाषेची चिंता - विजय कुवळेकर

ज्येष्ठ संपादक विजय कुवळेकर म्हणाले की, मला मिळालेला हा जीवनगौरव पुरस्कार माझ्या उर्वरित आयुष्यात अजून गौरवास्पद काम करावे यासाठी आहे असे मला वाटते. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून सगळ्यांचा आहे असे सांगून श्री. कुवळेकर म्हणाले की, आज मराठी माध्यमांमधील मराठी भाषा पाहून चिंता वाटते त्याकडे लक्ष दिले पाहिजे आणि माध्यमांनी आपला

वैचारिक उदारमतवाद वाढवला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

### राज्याचे हित सर्वोच्च - दिनकर रायकर

ज्येष्ठ संपादक दिनकर रायकर म्हणाले की, पत्रकारांनी राज्याचे, देशाचे हित सांभाळणारी पत्रकारिता केली पाहिजे. राज्य, देशविषयी आपुलकी जोपासणारी पत्रकारिता करावी. समाजाच्या कल्याणासाठी माध्यमांचे कार्य सतत सुरू असते.ही जाणीव आमचे मर्म आहे. त्यातूनच पत्रकारांमध्ये जबाबदारी आली आहे. या जबाबदारीनेच वाटचाल करणे म्हणजेच या व्यवसायाचे चिंतन करणे होय, असेही त्यांनी सांगितले.



### आता पुरस्कार महोत्सव

उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार वितरण समारंभाचे नामकरण पुढील वर्षापासून 'पुरस्कार वितरण महोत्सव' असे करण्यात येईल, अशी ग्वाही माहिती विभागाच्या सचिव मनिषा पाटणकर-म्हैसकर यांनी दिली. माध्यमांनी शासनाच्या विधायक कार्याची दखल घेऊन विकास पत्रकारिता जोपासावी, असेही त्यांनी सांगितले. प्रास्ताविक करताना महासंचालक चंद्रशेखर ओक यांनी जनता आणि शासन यांच्यात समन्वयक म्हणून माहिती व जनसंपर्क विभाग कार्य करत असल्याचे सांगितले.

### लोकमान्य टिळक जीवन गौरव २०१३

**श्री. दिनकर रायकर :** २०१३ चे लोकमान्य टिळक पुरस्कार प्राप्त श्री.दिनकर केशव रायकर हे दै. लोकमतचे समूह संपादक आहेत. त्यांनी इंडीयन एक्सप्रेसचे मुंबई शहर आवृत्तीचे संपादक, दै. लोकमत आणि लोकमत टाइम्सच्या औरंगाबाद आवृत्तीचे संपादक म्हणून काम पाहिले आहे. गेली ५० वर्षे ते पत्रकारितेत आहेत. ग.गो. जाधव पुरस्कार, सुशीलादेवी देशमुख पत्रकारिता पुरस्कार, रोटरी इंटरनॅशनल पत्रकारिता पुरस्कार, कृषीवलकार प्रभाकर पाटील पत्रकारिता पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### महासंचालनालयातील चौघांना पुरस्कार

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयातील ३ अधिकारी व एका छायाचित्रकाराला पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. मुंबई मुख्यालयात संपर्क शाखेत काम करणारे उपसंपादक इर्शाद बागवान, सांगली जिल्हा माहिती कार्यालयातील माहिती अधिकारी सखाराम माने आणि औरंगाबाद येथील जिल्हा माहिती अधिकारी रामचंद्र देठे यांना अनुक्रमे २०११, २०१२ आणि २०१३ साठीचा शासकीय गटातील यशवंतराव चव्हाण पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणे विभागीय कार्यालयातील छायाचित्रकार नितीन सोनवणे यांना २०१२ साठीचा केकी मुस उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०१३

उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०१३ बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार (मराठी), पुणे येथील दै. सकाळचे विशेष प्रतिनिधी ज्ञानेश्वर पांडुरंग बिजले, (५१ हजार रुपये), यशवंतराव चव्हाण पुरस्कार, शासकीय गट (मराठी) (मा. व ज.), औरंगाबाद जिल्हा माहिती अधिकारी, रामचंद्र विठ्ठल देठे यांना (४१ हजार रुपये), पु. ल. देशपांडे उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार, अमरावती येथील जय महाराष्ट्र न्यूजचे जिल्हा प्रतिनिधी प्रशांत जगनराव कांबळे, (४१ हजार रुपये), तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार, मुंबई येथील आफ्टरनूनचे सुशील भोरु कदम, (४१ हजार रुपये) दादासाहेब पोतनीस पुरस्कार, नाशिक विभाग, अनिकेत वसंत साठे, प्रिन्सिपल करस्पाँन्डंट, लोकसत्ता, नाशिक, (५१ हजार रुपये), अनंतराव भालेराव पुरस्कार, औरंगाबाद विभाग (लातूरसह), हरी रामकृष्ण तुगांवकर, बातमीदार, दै. सकाळ, लातूर, (४१ हजार रुपये), आचार्य अत्रे पुरस्कार,मुंबई विभाग, (४१ हजार रुपये), मुंबई लोकसत्ताचे विशेष प्रतिनिधी संजय कृष्णा बापट, (४१ हजार रुपये), नानासाहेब परूळेकर पुरस्कार, पुणे विभाग, शैलेंद्र अशोकराव पाटील, बातमीदार, दै. सकाळ, सातारा यांना (४१ हजार रुपये), शि.म.परांजपे पुरस्कार, कोकण विभाग, संतोष पेरणे, जिल्हा वार्ताहर, दै. पुण्यनगरी, रायगड, (४१ हजार रुपये), ग. गो. जाधव पुरस्कार, कोल्हापूर विभाग, जान्हवी सराटे, प्रतिनिधी, दै.महाराष्ट्र टाइम्स, कोल्हापूर यांना (४१ हजार रुपये), लोकनायक बापूजी अणे पुरस्कार, अमरावती विभाग, अमरावती येथील येथे दै. दिव्य मराठीचे प्रतिनिधी, सतीश ज्ञानेश्वर भटकर, यांना (४१ हजार रुपये), ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार, नागपूर विभाग, नागपूर येथील दै.लोकमतचे उपसंपादक चंद्रशेखर गिरडकर यांना (४१ हजार रुपये)




# रोड मॅप विकासाचा

**महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यावर सकृतदर्शनी परिणाम दिसायला शंभर दिवस पुरेसे नाहीत. परंतु आमचे उद्दिष्ट निश्चित आहे. स्वप्न स्पष्ट आहे आणि बांधिलकीबद्दल संशयाला जागाही नाही. राज्यातील शेवटच्या माणसाच्या विकासाला चालना देण्यासाठी आम्ही बांधील आहोत. आम्हाला वेळ द्या, आम्ही निश्चितच चांगले काम करून दाखवू. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला विकासाबाबत आश्वस्त केले.**

३१ ऑक्टो. २०१४ रोजी राज्याचे नवनियुक्त मुख्यमंत्री म्हणून पदाची सूत्रे स्वीकारताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून राज्यातल्या जनतेशी संवाद साधत आपल्या शासनाची भूमिका सुसंवादी असल्याचे स्पष्ट संकेत दिले होते. ७ फेब्रुवारी २०१५ रोजी आपल्या शासनाच्या स्थापनेला १०० दिवस पूर्ण होताना पुन्हा एकदा त्यांनी राज्यातल्या जनतेशी सुसंवाद साधण्यासाठी 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाचीच निवड करत कार्यक्रमावरचा आपला विश्वास व्यक्त केला. टीम 'जय महाराष्ट्र'साठी हा खास आनंदाचा क्षण होता.

६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता मी दूरदर्शनला हजर झाले. त्यादिवशी तर मुख्यमंत्र्यांचे संपूर्ण दिवसभर अत्यंत भरगच्च वेळापत्रक होते. 'मुंबई फर्स्ट' ही महत्त्वाची एक दिवसीय परिषद सकाळी ९ वाजल्यापासून अनेक केंद्रीय मंत्री, उद्योगपती यांच्या उपस्थितीत वांद्रे येथे आयोजित करण्यात आली होती आणि मुख्यमंत्र्यांचे त्यात समारोपाचे भाषण ठरले होते. ३ वाजून १५ मिनिटांनी मुख्यमंत्री महोदय वांद्र्याहून दूरदर्शनकडे निघाल्याचा संदेश आला आणि सगळ्यांचेच चेहरे खुलले. बंदोबस्तावरील पोलीसही अधिक सतर्क झाले व अवघ्या १५ मिनिटातच मुख्यमंत्र्याचा ताफा दूरदर्शनला पोहोचला. महासंचालक चंद्रशेखर ओक यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत करून त्यांना दूरदर्शनच्या जुन्या इमारतीत असलेल्या दूरदर्शनचे अतिरिक्त महासंचालक मुकेश शर्मा यांच्या दालनात नेले.

तिथे मुलाखतकार शुभांगी खापरे यांच्याशी एकीकडे चर्चा केली. दुसरीकडे जेवण घेतले. मुख्यमंत्री १५ मिनिटात मुलाखतीसाठी तयार झाले. चित्रीकरण नव्या इमारतीतल्या पहिल्या मजल्यावरील स्टुडिओत असल्याने तिकडे चालत मुख्यमंत्री महोदय निघाले. आपल्या तडफदार मुख्यमंत्र्यांना जवळून बघण्यासाठी जणू संपूर्ण दूरदर्शन केंद्रच गोळा झाले होते. त्या सर्वांना हसून अभिवादन करत मुख्यमंत्र्यांचे स्टुडिओत आगमन झाले. सेटवर ते आणि मुलाखतकार आपआपल्या खुर्च्यांवर स्थानापन्न झाले. त्यावेळी दूरदर्शनचे अतिरिक्त महासंचालक मुकेश शर्मा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक चंद्रशेखर

ओक यांनी मुख्यमंत्र्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. लाईट, साऊंड यांच्या चाचण्या आणि इतर सोपस्कार होऊन मुलाखत सुरू होणार तोच स्टुडिओतल्या घड्याळाकडे एक नजर टाकत त्यांनी सांगितले, मला ४.४५ वाजता निघायलाच हवे. ठीक ४.०० वाजता ध्वनिचित्रमुद्रणाला सुरुवात झाली. मुलाखतीचा पहिलाच प्रश्न सर्वांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या अशा दुष्काळ निवारण या विषयावर श्रीमती खापरे यांनी नेमकेपणाने विचारताच मुख्यमंत्र्यांनी अतिशय मुद्देसूदपणे दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांच्या दुदैवी आत्महत्या, त्यावर शासन करीत असलेल्या उपाययोजना याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या राज्यकर्ते म्हणून लाजिरवाण्या असल्याची स्पष्ट कबुली देत, त्या थांबणार नाहीत तोवर विकासाचा दावा योग्य ठरणार नाही, हे त्यांचे प्रांजळ उद्‌गार हा प्रश्न समूळ नष्ट करण्याचा त्यांचा दृढ निर्धार व्यक्त करणारे होते. जीएम पिकांना परवानगी, अवैध सावकारीला पायबंद, सिंचन क्षमता वाढविणे, या आनुषंगिक प्रश्नांवरही त्यांनी अत्यंत अभ्यासूपणे सरकारची भूमिका मांडली. उद्योग आणि गुंतवणूक वाढीसाठी शासनातर्फे करण्यात येणारे प्रयत्न, वीज निर्मिती क्षमता वाढविणे, डिजिटल महाराष्ट्र धोरण, मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी करण्यात येणारे प्रयत्न, राज्यातील कायदा - सुव्यवस्था व महिला सुरक्षा, छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील नियोजित भव्य स्मारक इत्यादी विविध प्रश्नांवर श्रीमती खापरे यांनी विचारलेल्या प्रश्नांना मुख्यमंत्र्यांनी मोकळेपणाने आणि सुस्पष्ट उत्तरे दिली. 'शिवसेनीशी भाजपाचे नेमके संबंध कसे आहेत?' या राजकीय गुगलीवरही युती अभेद्य असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला. उत्तरोत्तर रंगत चाललेली ही मुलाखत संपूच नये, असे वाटत असताना घड्याळाचा काटा मात्र वेळ संपत असल्याचा इशारा करत होता.

१०० दिवसांच्या कारकिर्दीबद्दल काय सांगाल? हा शेवटचा प्रश्न त्यांनी विचारताच




### मुख्यमंत्र्यांचा वक्तशीरपणा

**मुख्यमंत्री महोदयांच्या अतिशय व्यग्र वेळापत्रकामुळे अनेकदा दिलेल्या वेळा पाळणे अवघड होऊन बसते, हे आदल्या दिवशी प्रत्ययाला आलेच होते. त्यामुळे मुलाखतीचे प्रत्यक्ष ध्वनिचित्रमुद्रण पूर्ण होईपर्यंत थोडीशी धाकधूक टीमच्या मनात होती. परंतु मुख्यमंत्र्यांचे माध्यम सल्लागार रवींकिरण देशमुख यांनी आम्हाला आश्वस्त केले होते की, त्यांनी वेळ दिली आहे, म्हणजे ते येणारच. त्यानुसार ते आले आणि मुलाखतही अतिशय रंगली. पण राज्याच्या मुख्य न्यायमूर्तींशी त्यांची भेट ठरलेली असल्याने मुलाखत संपताक्षणी एकही क्षण न दवडता ते तडक निघाले. 'मुख्य न्यायमूर्तींशी माझी भेट ठरली आहे, त्यामुळे मला वेळेवर गेलेच पाहिजे,' हे त्यांचे शब्द वक्तशीरपणाचा एक धडाच देऊन गेले.**

### व्यस्ततेतही घरचा डबा खाणारे मुख्यमंत्री

दुपारी ३.३० वाजता श्री. मुकेश शर्मा यांच्या दालनात त्यांच्या स्वागताचा स्वीकार करून मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याशी पाच मिनिटे चर्चा केली. त्यानंतर त्यांनी हात स्वच्छ धुतले. तोच त्यांच्या सोबतच्या कर्मचाऱ्याने त्यांच्यासाठी आणलेला जेवणाचा डबा उघडला. डब्यातून भाजी-पोळी, चटणी, काकडी-गाजराच्या फोडी प्लेटमध्ये वाढल्या. मुलाखतकार शुभांगी खापरे यांनाही त्यांनी जेवणाचा आग्रह केला, पण त्यांनी मुलाखतीनंतर असे म्हणताच मुख्यमंत्र्यांनी एकीकडे मुलाखतीतल्या प्रश्नांबद्दल त्यांच्याशी चर्चेला व दुसरीकडे जेवायला सुरुवात केली. भाजी-पोळी नंतर थोडासा दहीभात खाऊन १०-१२ मिनिटांत त्यांनी जेवण आटोपले. मुख्यमंत्रीही आपल्यासारखाच साधा घरून आणलेला डबा खातात, हे बघून तिथे उपस्थित कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्ययुक्त कौतुकाचे भाव दिसत होते.

१०० दिवस हा कालावधी मूल्यमापनासाठी अत्यंत कमी असून जनतेने आणि माध्यमांनी आम्हाला काम करायला अधिक वेळ द्यावा, आम्ही नक्कीच चांगले काम करून दाखवू, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी मुलाखतीची सांगता केली. 'उठण्यास हरकत नाही असा फ्लोअर मॅनेजरचा इशारा होताच ते त्वरित उठून उभे राहिले व 'मुख्य न्यायमूर्तींशी माझी भेट ठरली असल्याने मला लगेच निघावे लागेल,' असे म्हणून त्यांनी निरोप घेतला!

मुलाखतीच्या प्रसारणाची वेळ त्याच दिवशी संध्याकाळी ७.१५ ची असल्याने टीम 'जय महाराष्ट्र'च्या हातात आता फक्त जेमतेम २ तासांचा अवधी संकलनाचे सोपस्कार पूर्ण करण्यासाठी होता. टीम कामी लागली होती. सोबतीला मंतरलेल्या एक तासाची ऊर्जा होती.

**- मीनल जोगळेकर**

❑ ❑

# लष्करी करिअरचा राजमार्ग




एखाद्या देशभक्तीपर गीताचे बोल कानावर पडले की, आपला ऊर देशाभिमानाने भरून येतो. आणि देशासाठी सीमेवर प्राणांची आहुती देणाऱ्या जवानांच्या आठवणीने आपले डोळे पाणवतात. असे जवान घडवणाऱ्या राज्य शासनाच्या औरंगाबाद येथे असणाऱ्या सैनिकी पूर्व शिक्षण आणि प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचे संचालक निवृत्त कर्नल उदय पोळ यांना दिलखुलास कार्यक्रमात मुलाखतीसाठी आमंत्रित करण्यात आले होते.

**दिलखुलास कार्यक्रमातून फेब्रुवारी महिन्यात सैनिकी शिक्षण आणि करिअरच्या संधी या विषयावर प्रसारित झालेल्या मुलाखतींचा हा थोडक्यात आढावा...**

शासनाची महाराष्ट्रातील ही एकमेव सैनिकी पूर्व प्रशिक्षण संस्था असून वसंतदादा पाटील यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्रातील तरुणांची सैन्यदलात अधिकारी पदावर निवड व्हावी या दृष्टिकोनातून औरंगाबाद येथे सिडको N-१२ सेक्टर येथे १९७७ मध्ये या संस्थेची स्थापना झाली.

या संस्थेत दहावी उत्तीर्ण झालेल्या मुलांना प्रवेश दिला जातो. ११ वी आणि १२ वीचे शिक्षण या संस्थेत दिले जाते. निवडीच्या निकषात सातवी, आठवी आणि नववी या इयत्तेत ६० % पेक्षा अधिक गुण असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची निवड दहावीच्या परिक्षेचा निकाल लागण्यापूर्वीच होते . संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर ११ वी आणि १२ वीच्या अभ्यासक्रमाबरोबर सैनिकी प्रशिक्षण त्यांना घ्यावे लागते. या संस्थेत संघ लोकसेवा आयोग परीक्षेची तयारी करून घेतली जाते. कारण राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) मध्ये प्रवेश घेण्यासाठी संघ लोकसेवा आयोगाची लेखी परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागते. यात विविध खेळ आणि व्यक्तिमत्त्व विकासाची तयारी करण्यासाठी विविध तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. या संस्थेतील शिक्षण आणि प्रशिक्षण पूर्ण केलेल्या मुलांना एनडीएमध्ये प्रवेश मिळावा, यासाठी तयारी करून घेतली जाते. एनडीएमध्ये आर्मी, नेव्ही आणि एअरफोर्स अशा तिन्ही दलांमध्ये सेवा करण्याची संधी मिळते.




सप्टेंबर महिन्यापासून प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होते. दरवर्षी २८ फेब्रुवारी ही अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख असते. ही परीक्षा नागपूर, कोल्हापूर, पुणे आणि औरंगाबाद या केंद्रावर होते. ही परीक्षा १० वीच्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई)च्या अभ्यासक्रमावर आधारित असते. यात सर्व विषयाचा समावेश असून १०० गुणांची परीक्षा असते. ६०% पेक्षा अधिक गुण असणाऱ्या मुलांचा निकाल परीक्षा झाल्यानंतर लगेच दोन तासात घोषित केला जातो. आणि दुसऱ्या दिवशी मुलाखत होते. यामध्ये कोणत्याही प्रकारचे आरक्षण नसते. शारीरिक पात्रता, उंची १५७ सेमी म्हणजे ५ फूट ३ इंच तसेच कुठलेही व्यंग असू नये.

ग्रामीण भागातील विद्यार्थी विशेषत: सैन्य दलात अधिकारी पदावर जाण्यासाठी गुणवत्तेत कमी नाहीत, परंतु त्यासाठी तेथे याबाबत जाणीवजागृतीची गरज आहे. इंग्रजी भाषेत संभाषण करण्याची अडचण येते यासाठी व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात सैन्यदलात येण्या संदर्भातील गैरसमज दूर होणे आवश्यक आहे. सैन्यदलात जाणे म्हणजे सीमेवर जाणे आणि तिथून परत न येणे. असे नसून सामान्यत: जीवन जगताना अनेक अपघाताना सामोरे जावे लागतेच या तुलनेत सैन्यदलातील मृत्यूचे प्रमाण नगण्य आहे. तसच सैन्यदलात दाखल झाल्यानंतर कुटुंबापासून दूर राहावे लागते, हे चूक आहे. सैन्यदलात ९०% जागा अशा आहेत तेथे कुटुंबासोबत राहता येते. हा गैरसमज दूर करून सर्व समाजातील लोक सैन्यदलात येऊ शकतात. यासाठी सैन्यदल जाणीवजागृती करणे आवश्यक आहे. आकाशातील हजारो ताऱ्यांपेक्षा देशासाठी काम करणाऱ्या सैनिकांच्या खांद्यावरील दोन तारे जास्त चमकदार असतात, सैन्यदलात आर्थिक स्थैर्य आणि देशसेवा करण्याचा अभिमान आहे असे कर्नल उदय पोळ यांनी दिलखुलास कार्यक्रमात सांगितले.

०२४०-२३८१३७० य़ा संपर्क क्रमांकावर संस्थेविषयी व अभ्यासक्रमाविषयी माहिती मिळू शकते. तसेच यासंदर्भात www.spiaurangadbad.com या संकेतस्थळावर सर्व माहिती उपलब्ध आहे.

**- मीरा ढास**




'महान्यूज' वेबपोर्टल हे शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकृत वेबपोर्टल आहे. राज्य शासनाचे निर्णय, योजना, उपक्रम, कार्यक्रम यांची माहिती जनता आणि माध्यमांपर्यंत तत्काळ पोहोचविण्याचे काम दिला आहे. त्यांच्या कल्पनेतूनच आणि त्यांनी रोवलेल्या घट्ट मुळांच्या आधारेच महान्यूज मजबूत उभे आहे. इंटरनेटच्या माध्यमातून शासनासंदर्भात खात्रीशीर आणि एकत्रित माहिती जनता आणि माध्यमांना मिळण्याचे 'महान्यूज' हे एकमेव माध्यम बनले आहे.

# महान्यूज म्हणजे महाराष्ट्र लाईव्ह

'महान्यूज' या वेबपोर्टलने २००८ पासून अखंडपणे सुरू ठेवले आहे. आवश्यकतेनुसार 'महान्यूज'मध्ये बदल करण्यात येतो. विधिमंडळाचे अधिवेशन, निवडणुका अशा प्रसंगी प्रासंगिक सदरे सुरू करण्यात येतात. याचप्रमाणे राज्य शासनाला शंभर दिवस पूर्ण झाल्यानिमित्त 'शंभर दिवस : प्रगतीचे... विश्वासाचे..' हे नवीन सदर सुरू करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला सत्तेवर येऊन नुकतेच १०० दिवस पूर्ण झालेली आहेत. नव्या सरकारच्या वाटचालीच्या दृष्टीने हा काळ फार मोठा नाही, पण विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात या पक्षांनी जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात यश मिळू लागले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत जनतेच्या सेवेसाठी हे सरकार असल्याची ग्वाही देत 'सेवा विधेयक' आणणार असल्याचे जाहीर केले आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात शासनाने घेतलेले लोकहिताचे निर्णय जनतेपर्यंत त्वरेने पोहोचविण्यासाठी 'महान्यूज' नवनवीन संकल्पनांचा वापर करीत आहे. महासंचालनालयाच्या तत्कालीन महासंचालक आणि सध्याच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी खऱ्या अर्थाने या संकल्पनेला वाव




**राज्य शासनाला १०० दिवस पूर्ण झाल्याने 'महान्यूज' ने बदल स्वीकारून 'शंभर दिवस: प्रगतीचे... विश्वासाचे..' हे नवीन सदर सुरू केले.**

'भ्रष्टाचारमुक्त प्रशासन आणि पारदर्शी कारभार हाच राज्य सरकारचा हेतू आहे. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांची इत्थंभूत माहिती 'महान्यूज' वेबपोर्टल देत आहे. जिल्ह्यातील महत्त्वाच्या बातम्या, बैठकीच्या बातम्या, मंत्रिमंडळाचे निर्णय, मुलाखती, योजना, यशकथा, फर्स्ट पर्सन, नोकरी शोधा या सदरातून राज्याच्या विकासाचे चित्र 'महान्यूज'मधून प्रतिबिंबित होत आहेच. मात्र बदल हा सृष्टीचा नियम आहे, यानुसार शासनाची 'महान्यूज' वेबपोर्टलही सतत याचा अवलंब करीत आहे.

राज्य विधिमंडळाच्या अधिवेशन काळात तसेच विधानसभा आणि लोकसभा निवडणूक कालावधीतील बातम्यांचे 'महाकव्हरेज' महान्यूज या वेबपोर्टलने वेळोवेळी देऊन शासनाची बाजू मांडली आहे. अधिवेशनामध्ये सभागृहातील प्रश्नोत्तरे, लक्षवेधी, तारांकित प्रश्न, मंत्री महोदयांनी चर्चेला दिलेली उत्तरे, विधेयकांना मंजुरी यांची माहिती फ्लॅश केली. महापूर असो की दुष्काळ, अतिवृष्टी या काळात शासनाने केलेल्या उपाययोजना तत्काळ जनता आणि माध्यमांपर्यंत महान्यूजने पोहोचवण्याचे काम केले.

राज्य शासनाला १०० दिवस पूर्ण झाल्याने 'महान्यूज' ने बदल स्वीकारून 'शंभर दिवस : प्रगतीचे... विश्वासाचे..' हे नवीन सदर सुरू केले. यात विशेष लेख, १०० दिवसानिमित्तच्या बातम्या व महत्त्वपूर्ण निर्णयांचा समावेश आहे.

शासनाने १०० दिवसात सर्व विभागाचे घेतलेले जनहिताचे व राज्याच्या विकासाचे एकत्रित निर्णय 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा लेखाजोखा शंभर दिवसांचा...' यामध्ये देण्यात आले आहेत. यामुळे सामान्य वाचक आणि माध्यमांचे प्रतिनिधी यांना सर्व माहिती एकत्रित उपलब्ध झाली आहे. शिवाय प्रत्येक मंत्र्यांनी त्यांच्या खात्याविषयी घेतलेले निर्णय आणि केलेली कामे यांचीही माहिती दिली आहे.

सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, महासंचालक चंद्रशेखर ओक यांच्यासह विभागातील सर्वच वरिष्ठांच्या मार्गदर्शक सूचनांनी 'महान्यूज' टीमने स्थळ, काळ, वेळ याचा विचार न करता जोमाने काम सुरू ठेवले आहे.

**– धोंडिराम अर्जुन**

❐ ❐






**राज्य अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रयत्न आहे. राज्याच्या कारभारात लोकांचा सहभाग वाढला पाहिजे, असे कटाक्षाने पाहणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या ट्विटरवरून लोकांशी सातत्याने संवाद साधला आहे. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विट्सचा हा आढावा.**

केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी रेल्वे अर्थसंकल्प लोकसभेत मांडल्यानंतर त्यांचे अभिनंदन करताना

गेल्या अनेक वर्षांनंतर एक प्रगतिशील, आधुनिक आणि वास्तविकतेचे भान राखणारा हा रेल्वे अर्थसंकल्प आहे. मा. सुरेश प्रभूजींचे आभार !

प्रवासी आणि मालवाहतुकीला यातून चालना मिळणार असल्याने खऱ्या अर्थाने देशाच्या अर्थव्यवस्थेला गती प्राप्त होणार आहे.

थोर राष्ट्रभक्त स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतदिनी

आज स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी. यज्ञाच्या ज्वालेप्रमाणे तेजोमय जीवनाला माझे विनम्र अभिवादन !

राज्यातील टोलबाबत निश्चित धोरण ठरविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्यानंतर

Gave directions to PWD & MSRDC to workout a plan which will give relief to the common man from tolls, in review meeting held today.

१४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी केंद्र सरकारने स्वीकारल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करताना

Heartfelt gratitude to @narendramodi ji for accepting recommendations of 14th Finance Commission & historic decision of 10% increase in devolution.

This will empower & strengthen the states to march on the path of growth & development even faster, thereby making lives of citizens better.

१० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना

My Best Wishes to all Class XII & Class X students for the board examination! May you all excel with flying colours!

### प्रणाली धारिया हिचे कौतुक

Congratulated & felicitated Pranali Satej Dharia for winning Gold Medal at Asian Youth Chess Championship.



वडिलांच्या मृत्यनंतरही १२ वीची परीक्षा देणाऱ्या उज्वला पाटोळे या विद्यार्थीनीला आधार आणि शुभेच्छा देताना

My Salute to Washim's Ujwalla Patole for her courage & commitment towards education and fulfilling her father's dream.

बोईंग इंडियाचे अध्यक्ष दिनेश केसकर यांच्या भेटीनंतर

Met @Boeing India President Shri Dinesh Keskar and had a discussion on Boeing's plans about MRO plant in MIHAN.

अमेरिकेचे राजदूत रिचर्ड वर्मा यांच्या भेटीनंतर

Had a very good meeting with US Ambassador to India Mr Richard Verma and assured all help needed for US investors.

संत गाडगे महाराज यांच्या जयंती दिनी



ग्रामसमृद्धीसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचणारे, संत गाडगे महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन! चला ग्रामोद्धाराचा संकल्प करू या.


महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप
४० लाख वाचक
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२२१४
لوک راجیہ
उर्दू लोकराज्य
जय महाराष्ट्र
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
नाबाद...७३२ भाग
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महा न्यूज
@१ कोटी ५५ लाख
MAHARASHTRA
Ahead
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
https://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th March 2015
Date of Publication : 10th of every Month


# वाचनीय आणि संग्राह्य

- जाणकारांचे लेख
- यशस्वितांच्या कथा
- तज्ज्ञांच्या मुलाखती
- उपयुक्त सूचना

संग्राह्य विशेषांक :
एखाद्या विषयाचा सर्वांगीण आढावा घेणारे

आज आणि उद्यासाठीही
**लोकराज्य**




वार्षिक वर्गणी रु.१००


प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक/ From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक **चंद्रशेखर ओक**, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक